# एम. ए. मराठी

## सत्र - III (CBCS)

## अभ्यासपत्रिका क्र. ११.२

# लोकसाहित्य

# (FOLK LITERATURE)

## विषय कोड : 99200

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. सुहास पेडणेकर**
कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
प्र-कुलगुरू
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. प्रकाश महानवर**
संचालक
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक** : **अनिल बनकर**
कला व मानव्य शाखा प्रमुख,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**अभ्यास समन्वयक व संपादक** : **डॉ. सीमा मुसळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूर व मुक्त अध्ययन संस्था (आयडॉल), मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**लेखक** : **प्रा. डॉ. जगदीश अनंत संसारे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
सेंट जोसेफ कला आणि वाणिज्य महाविद्यालय,
सत्पाळा, विरार (पश्चिम).

: **प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर**
मराठी विभाग प्रमुख,
गुरु नानक खालसा कॉलेज,
माटुंगा, मुंबई.

**प्रथम मुद्रण, एप्रिल २०२२, ISBN Number 978-93-91735-33-3**

**प्रकाशक**
संचालक,
दूर व मुक्त अध्ययन संस्था, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई.

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | लोकसाहित्य : स्वरूपमीमांसा - प्रा. डॉ. जगदीश अनंत संसारे | १ |
| २. | लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती - प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर | ३७ |
| ३अ. | लोककथा : परंपरा व स्वरूपविचार - प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर | ५२ |
| ३आ. | 'मराठवाड्यातील लोककथा' - प्रा. डॉ. सूर्यकांत आजगांवकर | ७३ |


*****

# सत्र:३
# अभ्यासपत्रिका क्रमांक ११ :२
# लोकसाहित्य (Folk Literature)

**उद्दिष्ट :** भाषा, साहित्य आणि संस्कृती यांच्या घडणीत लोकसाहित्याचा फार मोठा सहभाग असतो. ललित साहित्यआणि लोकसाहित्य यांच्या निर्मितिप्रेरणा, संकल्पना, संकेतव्यवस्था आणि आविष्काररूप यांमध्ये अर्थातचभेद आहेत. असे असले तरी ललित साहित्यात लोकसाहित्याचे काही गुणविशेष, संकेत आढळून येतात, तसेच लोकसाहित्यातही ललित साहित्याचे काही गुणविशेष, लक्षणे व संकेत दिसून येतात. या दोहोंचे घनिष्टसंबंध असून त्यांच्यामध्ये सतत देवघेव होत असते.

या पार्श्वभूमीवर भाषा-साहित्याच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठीय स्तरावर लोकसाहित्याचा अभ्यास करणे प्रस्तुत ठरते. या दृष्टीने (१) लोकसाहित्याची संकल्पना, स्वरूप व निर्मितिप्रेरणा, (२) लोकसाहित्याची संकेत व्यवस्था (३) लोकसाहित्याची व्याप्ती व विविध प्रकार, (४) लोकसाहित्य आणि ललित साहित्य यांचे परस्परसंबंध आदी गोष्टींचे परिचयपर ज्ञान विद्यार्थ्यांना करून देणे, तसेच लोकसाहित्याचे वाचन/आस्वाद व अभ्यास करण्याची त्यांना यथोचित साहित्यदृष्टी देणे हे प्रस्तुत अभ्यासविषयपत्रिकेचे उद्दिष्ट आहे.

## घटक १) व्याख्याने-२०, श्रेयांकन-०२

लोकसाहित्य : स्वरूपविचार

१) ‘लोक’ आणि ‘लोकमानस’

२) ‘लोकधर्म’ आणि ‘लोकदैवत’

३) ‘लोकतत्त्व’ आणि ‘लोकसंस्कृती’

४) ‘लोकवाङ्मय’ आणि ‘लोकसंस्कृती’

या संकल्पनांचे स्पष्टीकरण आणि स्वरूपदिग्दर्शन, लोकसाहित्याच्या विविध व्याख्या व लक्षणे, लोकसाहित्याची संकेतव्यवस्था, लोकसाहित्यामागील निर्मितिप्रेरणा.

## घटक २) व्याख्याने-२०, श्रेयांकन-०२

लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

१) समाजजीवनाच्या संदर्भात लोकसाहित्य कोणते कार्य करते हे पाहण्याच्या उद्देशातून कार्यान्वयी पद्धती (functional method)

२) लोकसाहित्यातील विचारप्रणाली व लोकसाहित्याचे कार्य तपासण्याच्या उद्देशातून विचारप्रणालीपर पद्धती (ideologiceal method)

३) क्षेत्रीय अभ्यास करून लोकसाहित्याचा विशिष्ट समाजाशी, संस्कृतीशी असलेला संबंध तपासणे, विधी-प्रयोग-संहिता यांचा अभ्यास करणे या उद्देशातून ‘संदर्भान्वयापद्धती’ (contextual method)

४) शब्द (verbal) लोकसाहित्याच्या संरचनेचे विश्लेषण करणे या उद्देशातून संरचनापद्धती (structural method)

५) मौखिक आविष्काराच्या स्वरूपविशेषाचे विश्लेषण करण्याच्या दृष्टीतून मौखिक आविष्कारसूत्रपद्धती (oral formatic method)

**घटक ३) व्याख्याने-२०, श्रेयांकन-०२**

**लोककथा**

१) लोककथा : परंपरा व स्वरूपविचार

२) लोककथांतील आशयसूत्रे व अनुभवविश्व

३) लोककथांतील कल्पनाबंध

४) लोककथा : संरचना कथाबीज - कथानक - पात्र - वातावरण - निवेदक - निवेदनपद्धती -भाषा इत्यादी.

५) लोककथेचे कथात्म ललित साहित्याला योगदान

६) लोककथाकथन -सादरीकरणाच्या अंगाने विचार

७) समाजाशी अंतर्लक्ष्यी व बहिर्लक्ष्यी संबंध.

८) लोकशैलीतील एका साहित्यकृतीचा प्रकारलक्ष्यी अभ्यास (लोककथा, 'मराठवाड्यातील लोककथा', यु० म० पठाण)

**अंतर्गत परीक्षा-एकूण गुण ४०**

१. लेखी परीक्षा २० गुण

२. प्रकल्प लेखन २० गुण (पैकी - प्रकल्प लेखन : १० गुण व प्रकल्पावर आधारित तोंडी परीक्षा : १० गुण)

**सत्रान्त परीक्षा-एकूण गुण ६०**

वरील अभ्यासक्रमावर १५-१५ गुणांचे चार प्रश्न पर्यायांसह विचारण्यात येतील.

*****

**संदर्भग्रंथ:**


१. फडके, य० दि०; विसाव्या शतकातील महाराष्ट्र.

२. मालशे, स० गं०; गतशतक शोधताना.

३. वाळिंबे, श० रा; महाराष्ट्रातील सामाजिक पुनर्घटना.

४. जोग, रा० श्री०, मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड ४.

५. वैद्य, सरोजिनी; संक्रमण.

६. क्षीरसागर, श्री.के. समाजविकास.

७. भोळे, भा. ल.; साहित्यप्रत्येय.

८. बेडकिहाळ, किशोर व भोळे, भा. ल. (संपा.); बदलता महाराष्ट्र.

९. कोतापल्ले, नागनाथ; ज्योतीपर्व.

१०. कुलकर्णी, गो० म०; आधुनिक मराठी साहित्याची सांस्कृतिक पाश्र्वभूमी.

११. दि० य० देशपांडे, युक्तिवादाची उपकरणे.

१२. सदानंद मोरे.


*****

# १

# लोकसाहित्य : स्वरूपमीमांसा

**घटक रचना**


१.१ उद्देश

१.२ प्रस्तावना

१.३ लोकसाहित्य म्हणजे काय?

१.४ लोकसाहित्याची लक्षणे

१.५ लोकसाहित्याच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या

१.६ लोकसाहित्याची संकेतव्यवस्था

१.७ लोकसाहित्यामागील निर्मितीप्रेरणा

१.८ लोकसाहित्य स्वरूपविवेचन:

- १.८.१ 'लोक' आणि 'लोकमानस'
- १.८.२ 'लोकधर्म' आणि 'लोकदैवत'
- १.८.३ 'लोकतत्त्व' आणि 'लोकसंस्कृती'
- १.८.४ लोकवाङ्मय

१.९ सारांश

१.१० पूरक वाचनासाठी संदर्भ

१.११ संदर्भग्रंथ सूची

१.१२ संभाव्य प्रश्न


## १.० उद्देश

प्रस्तुत घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येईल:

१. लोकसाहित्य ही संकल्पना ध्यानात येईल.

२. लोकसाहित्याच्या विविध अंगांच्या परिचयासोबतच त्याचे स्वरूप, त्याची वैशिष्टे लक्षात येतील.

३. लोकसाहित्य म्हणजे काय हे त्याच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यातून स्पष्ट होईल.

४. तसेच लोकसाहित्यातील संकेतव्यवस्था व लोकसाहित्य निर्मितीमागील प्रेरणा ध्यानात येईल.

५. लोकसाहित्यातील लोकमानस, लोकदैवत, लोकसंस्कृती, लोकवाङ्मय, लोकतत्त्व या संकल्पना समजून घेता येतील.

## १.२ प्रस्तावना

लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले साहित्य ते लोकसाहित्य. हे निर्माण केलेले साहित्य म्हणजे समूहनिर्मिती असते. त्यामुळे त्याला समूहापासून विभक्त करता येत नाही. मौखिक व अलिखित स्वरूपात हा दस्तऐवज एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे हस्तांतरित होत असतो.

लोकसाहित्य हा मानवी जीवनाचा सांस्कृतिक ठेवा असतो. ती एक मानवी जीवन जगण्याची रीत असते. लोकसाहित्यातून समाज जीवनाचा आविष्कार होत असतो; तर समाज जीवनाला एकसंध ठेवण्याचे काम लोकसाहित्य करत असते. त्यामुळे या दोन्ही गोष्टी परस्परावलंबी असतात. जीवन जसजसे परावर्तीत होईल तसतसे बदल लोकसाहित्याच्या आशय आणि अभिव्यक्तीतही होत असतात. या साहित्यातून मानवाच्या निसर्गप्राप्त शहाणपणाचे बोल सांगितलेले असतात. हे शहाणपण लोकसाहित्यातील वेगवेगळ्या प्रकारातून अभिव्यक्त होत असते. यातील सर्वात लहान घटक असणाऱ्या म्हणी, वाक्प्रचार, उखाणे पासून ते लोककथा, लोकगीत, लोककथागीत, लोकनाट्य, लोकविधी अशा सर्वातून ते अभिव्यक्त होत असते. कलावंताच्या वकुबानुसार प्रत्येक पिढी आपल्या ज्ञानाची भर त्यामध्ये टाकत असते. तसेच आपल्या संस्कृतीचे, जीवनपद्धतीचे सारही अशा साहित्यातून गोवण्याचा प्रयत्न करत असते. त्यामुळे एका अर्थाने लोकसाहित्याचा अभ्यास हा मानवी जीवनाचा, संस्कृतीचा अभ्यास ठरत असतो. पण लोकसाहित्य ही जेव्हापासून अभ्यासाची शाखा बनली तेव्हापासून संस्कृतीचा अभ्यास म्हणून लोकसाहित्याकडे न पाहता वाङ्मय, साहित्य म्हणून त्याकडे कसे पहावे हा विचार मध्यवर्ती आला. त्यातून लोकसाहित्याच्या विविध प्रकारांची वर्गवारी करून मौखिक व लिखित (संकलित) साहित्य प्रकारांचा अभ्यास होऊ लागला. त्यातील आशय, अभिव्यक्ती विशेष, सादरीकरण अशा विविध अंगांनी तो परिपूर्ण होऊ लागला.

सदर अभ्यासपत्रिकेच्या अनुषंगाने आपण लोकसाहित्याच्या या स्वरूपाची प्रथम माहिती करून घेणार आहोत. तसेच लोकसाहित्यातील लोककथा हा प्रकार अभ्यासून मराठवाड्यातील संकलित कथांचा अभ्यास करणार आहोत. तत्पूर्वी त्यातील लोकसाहित्याचे स्वरूप, घटक आपण अभ्यासणार आहोत.

## १.३ लोकसाहित्य म्हणजे काय?

### १.३.१ लोकसाहित्य हा शब्दाविष्कार आहे:

'लोकसाहित्य हा शब्दबद्ध आविष्कार आहे.' असे मत प्रख्यात लोकसाहित्य विशारद जोनास बॅलीस यांनी व्यक्त केले. त्यांचा हा विचार आदिम आणि सुसंस्कृत समाजाच्या संदर्भात आलेला दिसतो. त्यांच्या मते, "लोकसाहित्य ही आदिम मानवाबरोबर सुसंस्कृत मानवाची ध्वनी आणि शब्दाद्वारा गद्य व पद्य स्वरूपात झालेली परंपराप्राप्त निर्मिती होय. "लोकसाहित्य ही संकल्पना प्रचंड विस्तृत आहे. तो केवळ शब्दबद्ध वाङ्मय विचार ठरूच शकत नाही. लोकविश्र्वास, लोकरुढी, परंपरा, रूढ कलाप्रकार, नृत्य, नाट्य इ. अनेक घटक लोकसाहित्यात समाविष्ट असतात. लोकसाहित्य एकाच व्याख्येत बंदिस्त करणे

कठीण आहे. मुळात लोकसाहित्य हा एक सामाजिक शब्द आहे. लोक + साहित्य अशी शब्दाची फोड करता येते. वेद न मानणाऱ्या समूहाला भारतीय परंपरेत 'लोक' समजले जाते. असे लोकसाहित्य लोकसंस्कृतीचा भाग ठरते. संस्कृती ही परंपरागत असल्याने लोकसाहित्य देखील परंपरागत ठरते. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा लोकसाहित्यात समाविष्ट होतात. लोकसाहित्य हे नेहमी लोकांचे असते; ते समष्टीचे असते. लोकसाहित्यात परंपरेने आलेले शहाणपण आणि लोकवृत्ती यात लोक समूहातील घटक व्यक्तींना एकत्र ठेवण्याचे सामर्थ्य असते. सामाजिक जीवनात एक प्रकारची एकरूपता येऊन व्यक्ती-व्यक्तीत एक नवं नातं निर्माण होतं. लोकसाहित्य समाजाला बांधण्याचे आणि एकसंध ठेवण्याचे अत्यंत बहुमोल कार्य करते. लोकसाहित्य हा शब्द लवचिक आहे त्यात अलिखित आणि मौखिक भाषाविष्कार असतो.

### १.३.२ लोकसाहित्य लोकप्रतिभेचा ठसा:

बी.ए.बॉटकिनच्या मते, लोकसाहित्याची निर्मिती लोकप्रतिभेमुळे शक्य असते. या संस्कृतीत कोणताही लिखित व्यवहार होत नाही केवळ मौखिक व्यवहार असतात. परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले विशेषांच्या स्वरूपात विकसित समाजात राहिलेले ज्ञान ते लोकसाहित्य होय. लोकसाहित्य हे प्रगत विकसित समाजाकडे देखील असते. लोकसाहित्याची निर्मिती लोकसमूहाच्या भ्रमातून आणि आभासातून झालेली असते.

### १.३.३ लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले:

लोकसाहित्य हे लोकांच्या संस्कृतीचा एक महत्त्वाचा घटक असून तो लोकांकडून काळजीपूर्वक, विचारपूर्वक किंवा अजाणतेपणे संरक्षिला जातो. लोकसाहित्य हे लौकिक परंपराचा निधी असते. लोकजीवनाच्या कला व वाङ्मयाचा तो मूलाधार आहे. थिओडोर एच. गास्टरच्या मते, लोकसाहित्य लोकांचे लोकांनी निर्माण केलेले लोकांसाठी असते. त्यात व्यक्तिविशिष्ठता नसून सार्वजनिक सर्जनशीलता समाविष्ट असते. जगातील कोणत्याही भूप्रदेशातील मानवाच्या निर्मितीपासून आजपर्यंतच्या त्यांच्या परंपरा, श्रद्धा-विश्वास, आचार-विचार आणि त्यांचे कलाविष्कार समजावून घ्यावयाचे झाल्यास अभ्यासकाला त्यांच्या लोकसाहित्याकडेच यावे लागते. लोकांच्या समग्र जीवनाचा अभ्यास लोक साहित्यातच होऊ शकतो. त्यात मानवाच्या सर्व अंगांना स्पर्शिले जाते.

### १.३.४ आदिम मानवाचे मन:

लोकसाहित्य हे मानवाने युगानुयुगे घेतलेल्या अनुभवांचे आणि शिक्षणाचे साररूप असते. लोकसाहित्यातील संस्कृतीपूर्ण ज्ञान हे अशिक्षित माणसांकडून गोळा केलेले असते. मानववंशशास्त्राचा अभ्यासक स्पिनोजा यांना "लोकसाहित्य हे आदिम मानवाच्या मनाचा यथार्थ आविष्कार वाटतो." हे लोक आधुनिक काळात जीवन जगत असले तरी ते प्राचीन, परंपरागत जीवनच व्यतित करीत असतात. म्हणून त्यांना स्पिनोजा 'आधुनिक प्राचीन' ही बिरूदावली लावतो. लोकसाहित्याची मुळे खूप खोलवर गेलेली असतात. ती अत्यंत विकसित, सुसंस्कृत समाज जीवनातही आढळतात. असेच मत जॉन मिश यांनीही व्यक्त केले आहे.

### १.३.५ लोकसाहित्य एक अलिखित कलाप्रकार:

लोकसाहित्य हे लोकाविष्काराचं संचित ज्ञान असतं. चित्र, शिल्प, वास्तू, नाट्य इ. अनेक स्वरूपात ते परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत आलेलं असतं. लोकसाहित्याचा महत्त्वाचा विशेष म्हणजे ते सुसंस्कृत समाजातही मौखिक स्वरुपातच असते. विल्यम बॅस्कम यांच्या मते, लोकसाहित्य म्हणजे दैवतकथा, आख्यायिका, लोककथा, म्हणी, कोडी आणि मौखिक माध्यमातून व्यक्त होणारे कलात्मक आविष्कार होय. म्हणी, उखाणी पाखाणी, गीते इ. असंख्य घटकांचा लोकसाहित्यात समावेश करता येतो.

### १.३.६. लोकसाहित्य हे हाडामांसाचे लोकशिक्षक होय:

लोकसाहित्याच्या कार्याचा विचार करताना लोकसाहित्यातून लोकांना अप्रत्यक्षपणे ज्ञान, शिक्षण दिले जाते; हे लक्षात घ्यावे लागते. उदा. 'मादळ' या नाट्यात नव वधू-वरांनी कसे वागावे याचे अनौपचारिकरित्या दर्शनच घडविले जाते. ह्यातून ओथंबिणारे ज्ञान हे शास्त्रीय ज्ञानापेक्षा भिन्न असते. ते अनुभवाचे साररूप ठरते. लोकसाहित्याद्वारे लोकसमूहाच्या नीतिकल्पना, सामाजिक संकेत, समाजमान्य कृती, समाज विधिनिषेध, धर्माचार इ. असंख्य घटकांचा बोध लोकसमाजाला दिला जातो. लोकसाहित्य सकळ जनांस शहाणे करून सोडते. लोकसाहित्यामुळे व्यावसायिक कला, कौशल्य देखील एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होतात. लोकसाहित्य सहज निर्माण होते. विकसित होते. आणि तितक्याच सहजतेणे ते लोकमानसाकडून स्वीकारले जाते. लोकसाहित्यामध्ये समाजाच्या नीतिकल्पना अभिव्यक्त होतात. कोणते कृत्य समाजमान्य, कोणते अमान्य, चांगले काय-वाईट काय, श्रेयस आणि प्रेयस, सदाचार आणि दुराचार असे अनेक विषय लोकसाहित्य प्राणिकथा, नीतिकथा यांच्यामार्फत हाताळत असते. समाजात कसे वागावे याचे साक्षात दर्शन लोकसाहित्य घडवित असते.

### १.३.७. लोकजीवन हा लोकसाहित्याचा गाभा:

लोकजीवन हा लोकसाहित्याचा मूलाधार आहे. लोकसमूहाचा भावनिक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. एकतेची भावना समाजामध्ये केवळ लोकसाहित्यामुळे जागृत होते. लोकजीवनाच्या आधाराशिवाय लोकसाहित्य हे जिवंत राहूच शकत नाही. डॉ. प्रभाकर मांडे म्हणतात, "लोकजीवनाला आकार देण्याचे कार्य लोकसाहित्य करत असते." लोकजीवनाच्या प्रवाहाबरोबरच लोकसाहित्य वाहत असते.

### १.३.८. लोकसाहित्याचा प्राणवायू – लोकमानस:

लोकसाहित्यामधून आत्माविष्कार होत नसतो. त्यात समाजमन बोलत असतं. लोकसाहित्याच्या क्षेत्रात समाजमन डोलत असते. प्रा. द. ग. गोडसे या संदर्भात म्हणतात, "एखाद्या अनुभवाची ऊर्जा समूहामध्ये असते. ती एकदा चेतविली गेली की लोकसमूहातील एका व्यक्तीकडून निर्मितीची प्रक्रिया होऊ लागते. ती व्यक्ती जी निर्मिती करीत असते ती समष्टीची असते. फ्रान्स बोआस म्हणतात, "लोकसाहित्य निर्मिती टिकून राहणे याला लोकमानसच कारण ठरते." लोक समूहातील सर्व व्यक्ती समूहाशी तादात्म्य पावतात. लोकसाहित्याच्या निर्मिती मागे एक कर्ता असला तरी तो विरघळून जातो आणि ती

समाजनिर्मिती होते. लोकसाहित्यात व्यक्त होणाऱ्या भावभावना, इच्छा-आकांक्षा, विधी निषेधाच्या कल्पना व्यक्तिगत राहात नसून त्या समूहमानसाच्या ठरतात. लोकसाहित्य हे व्यक्तीचे जीवन संपन्न आणि समृद्ध करायला मदत करते. व्यक्तीला लोकसमूहाचे संचित प्राप्त होते. त्याला मागील पिढीचा वारसा प्राप्त होतो. लोकसाहित्य हा लोकप्रतिभेचा आविष्कार असे बी .ए .बॉटकीन यांनी म्हटले आहे.

### १.३.९. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा झरा:

लोकसाहित्यातून लोकसंस्कृती पाझरते. लोकसाहित्याला लोकसंस्कृतीचा आरसा म्हटले जाते. लोककथा, लोकगीते इ. केवळ लोकांची वाङ्मयीन अभिव्यक्ती नसते; तर त्यापेक्षा अधिक काहीतरी त्यातून अभिव्यक्त होत असते. लोकसाहित्याद्वारे लोकसंस्कृतीचे सातत्य टिकविले जाते. दुर्गाबाई भागवत म्हणतात, "लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे संस्कृतीचा अभिसरणाचा अभ्यास होय." लोकसाहित्यातील संकेत हे देखील सांस्कृतिक नियम असतात. त्यांचे काटेकोर पालन करण्याची प्रवृत्ती त्या त्या समूहाची असते अशा प्रकारे लोकसमाज याचं आकलन पुरेपूर व्हायचं असेल तर लोकसाहित्याची कास धरायलाच हवी. लोकसाहित्यातून अशाच प्रकारे लोकसंस्कृती अखंडपणे वाहत असते.

### १.३.१०. लोकसाहित्य सामाजिक निर्देशाचे घटक:

लोकसाहित्य विधी निषेधांनी युक्त असते. लोकसाहित्यातून नीती शिक्षण दिले जाते. समाजमान्य कृत्यांसंबंधी जाणीव त्यातून व्यक्त केली जाते. "लोकसाहित्य हे सामाजिक विधीनिषेधाचा सुवाहक आहे." असे मत बॅटी वेग यांनी नोंदविले आहे. एक व्यक्ती एखाद्या घटनेचा किंवा एखाद्या व्यक्तीचा जाहीर निषेध करून धजावणार नाही परंतु लोकसाहित्य ही समूह मनाची निर्मिती असल्यामुळे लोकगीते, लोकनाट्य, लोककथा, चित्र, शिल्प, विनोदी चुटके इत्यादी मार्फत ते शक्य ठरते. अशा साहित्यात कोणीही आक्षेप घेत नाही कारण ते साहित्य संपूर्ण समाजाचे असते. अन्याय, दडपण, छळणूक, पिळवणूक इ. जीवनसंबंधित अनेक जाणिवा लोकसाहित्यातून प्रकट होत असतात.

### १.३.११. लोकसाहित्य प्रचारकी होडी:

लोकसाहित्यरुपी नावेत बसून त्या त्या समाजाला प्रचार करणं, आपल्या भावना, जाणीव, प्रश्न, समस्या, विविध आचार-विचार, रुढी-परंपरा उर्वरित समाजापर्यंत किंवा सगळ्यांपर्यंत पोहचविणे सहजध्याय बनते. लोकसाहित्यातून साक्षात समाजमनचं बोलत असते. लोकसाहित्य सदैव लोकसमूहाला आकृष्ट करून घेते. लोकसाहित्य समाजाला साकारीत असते. लोकसाहित्य स्वतः प्रचारकी नसले तरी त्याच्या प्रचाराचे साधन म्हणून उपयोग केला जातो. प्राचीन काळात अध्यात्मिक विचारांचा प्रचार करण्याहेतूने महाराष्ट्रातील संतांनी लोकसाहित्याचा प्रभावी वापर केलेला आढळून येतो. लोकसाहित्य समाज मनाशी हितगुज साधते. हे लक्षात घेऊन संत एकनाथांनी भारुडे रचली.

### १.३.१२. लोकसाहित्य : जीवनातील दुःखावर लेप:

लोकसाहित्य हा संपूर्ण समाजाचा आविष्कार आहे. शास्त्राच्या भाषेत बोलावयाचे झाल्यास लोकसाहित्य हे चुंबक आहे. ते समाजरूपी लोखंडाला आपल्याकडे सतत खेचून घेते.

दुःखा मागोमाग दु:ख भोगायला लागून लोक अक्षरशः मोडून पडतात. लोकसाहित्य मात्र त्यांच्या भकास, उदास आयुष्यात आनंदरुपी अमृताचा शीडकावा करते. लोकसाहित्य अशा दुभंगलेल्या लोकांना उभारी आणते. लोकसाहित्यातील कल्पनाविश्व वास्तव जीवनापासून दूर असते. ते लोकप्रतिभेने निर्माण केलेले असल्यामुळे त्यात प्रवेश केल्यावर दैनंदिन जीवनातील दुःखाचा पार निचरा होतो. येथे ॲरिस्टॉटलच्या भाषेत बोलायचे झाल्यास लोकसाहित्यामुळे भावनांचा 'कॅथॉर्सिस' (विरेचन) घडून येतो. लोकसाहित्यातील आभाससृष्टीमध्ये प्रवेश केल्यामुळे काही काळ का होईना माणसांची वैयक्तिक काळजी, चिंता, दुःख यातून सुटका होते.

### १.३.१३ लोकसाहित्यामुळे स्वप्नरंजन होते:

लोकसाहित्य समाजातील आबालवृद्ध, स्त्री-पुरुष या सर्वांना सारखेच आनंददायी ठरते. वृद्धांना तर लोकसाहित्य नवतारुण्यच बहाल करते. त्यांना त्यांचे जुने दिवस आठवतात आणि म्हातारपण विघळून जाते. लोककथा, म्हणी, उखाणे यात रंजन सामग्री ठासून भरलेली असते. पर्यायातून लोकसाहित्य समाजप्रबोधन करण्यासाठी मनोरंजनाची कास धरते.

### १.३.१४ लोकसाहित्य साक्षात कल्पवृक्ष:

लोकसाहित्य आतापर्यंत उल्लेखिलेल्या घटकांपेक्षा अजून बरेच काही आहे. लोकसाहित्य हा एक अथांग सागर आहे. त्याच्या मंथनातून केवळ समाजोपयोगी ज्ञानरूपी अमृतच बाहेर पडेल. लोकसाहित्य हा साक्षात कल्पवृक्ष आहे. कल्पवृक्षाकडे जे जे मागावे, अपेक्षावे ते ते मिळते. लोकसाहित्यही असेच आहे. लोकसाहित्य समूहनिष्ट अस्मितेची जागृती करते. उदा. ऐतिहासिक कथागीतातून समाजामध्ये वीरवृत्ती निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

### १.३.१५ लोकसाहित्य ही विविध कला प्रकारांची गंगोत्री आहे:

परंपरेने चालत आलेली गीते, कथा, चित्रकला, शिल्पकला, लेणी इ. सारे आविष्कार लोकसाहित्यात समाविष्ट केले जातात. लोकसाहित्याला केवळ शब्दबद्धतेचा आविष्कार मानणे हे याच अर्थाने सर्वस्वी चुकीचे ठरते. लोकसाहित्य हे शब्दांच्या पलीकडे बरेच काही असते. लोकसाहित्य कला जिवंत ठेवणारे एक अजब रसायन असते. लोकसाहित्य हे विविध कलांची खाणच असते असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. लोकसाहित्यमुळे निरनिराळ्या कलाप्रकारांना संजीवक शक्ती मिळून अधिक बळकटी येते. शब्दकला, शिल्पकला, रंगकला, दृककला, श्राव्यकला इ. सर्वच कलांचा उगम हा लोकसाहित्यातूनच झालेला आहे. लोकसाहित्य हा असा प्रिझम आहे, की ज्यातून नानाविध कलांचे अपस्करण होते. जेव्हा या कलाप्रकारांमध्ये साचलेपण येते त्यावेळी लोकसाहित्य त्याला नवसंजीवनी देते.

### १.३.१६ लोकसाहित्य हे समाजाचे भौतिक गरज भागविण्याचे साधन:

विविध व्यवसायांचे ज्ञान, अनुभूती, शहाणपण, कौशल्य आणि सवयी इ. सर्व घटकांचे प्रतिबिंब साहित्यातच पडत असते. एका पिढीकडील संचित ज्ञान हे केवळ शब्दातूनच नव्हे तर कृती-उक्तीतून दुसऱ्या पिढीकडे स्थानांतरित होत असते. सूत कातणे, विणणे, शिवणे,

भरतकाम करणे इ. अनेक दैनंदिन लोकव्यवहार लोकसाहित्यातूनच प्रसवत असतात. ग्रामीण वा शहरी भागातील असाक्षर किंवा अल्पसाक्षर कारागीर जसे लोहार, कुंभार, चांभार, सोनार इ. चालत आलेले पारंपरिक व्यवसायविषयक कौशल्येसुद्धा लोकसाहित्यामुळेच एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे चालत येतात. लोकवैद्याकडील उपचाराचे ज्ञान, विविध वनस्पतींचे गुण, हवामानाचे आखाडे बांधण्याविषयीचे ज्ञान इ. अनेक अंगाचे ज्ञान सध्याच्या पिढीला केवळ लोकसाहित्यामुळे प्राप्त होते.

**सारांश:** लोकसाहित्य हे जसे वैश्विक आहे तसे ते जीवनाच्या सर्वांगाला स्पर्श करणारे सर्वव्यापी ज्ञान आहे.

## १.४ लोकसाहित्याची लक्षणे

लोकसाहित्याच्या अशा विविध शक्यता लक्षात घेताना आपण मारिया लीच यांनी सांगितलेली लोकसाहित्याची लक्षणे लक्षात घ्यायलाच हवी. या लक्षणांवरून लोकसाहित्याचे निश्चित स्वरूप आकलन होण्यास मदत होईल. त्यांनी आपल्या 'स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोअर' या ग्रंथात ही लक्षणे नमूद केली आहेत.

**लोकसाहित्य लक्षणे:**

१) लोकसाहित्य हे मौखिक किंवा अलिखित स्वरूपात असते.

२) लोकसाहित्य हे एका पिढीकडील संचित ज्ञान असते ते पुढील पिढीस सोपविले जाते.

३) 'पारंपरिकता' हा लोकसाहित्याचा प्रभावी गुण आहे.

४) लोकसाहित्याचा काळ हा कालातीत वर्तमान असतो. पर्यायाने तो नेहमीच सजीव वाटतो.

५) लोकसाहित्य ही समूहमनाची निर्मिती असते. त्याचा कर्ता अज्ञात असतो. लोकसाहित्य हे व्यक्तिविशिष्ट न राहता समष्टीचे होते. येथेच ते ललित साहित्याहून वेगळे ठरते.

६) लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा आरसा असल्याने लोकसंस्कृतीच्या अध्ययनासाठी लोकसाहित्य सुलभ ठरते.

७) लोकसाहित्य हा लोकमानसाचा आविष्कार आहे.

८) लोकसाहित्यात परंपरा टिकविणे आणि त्या पुनरुज्जीवित करणे या क्रिया घडतात. लोकसाहित्य हे परिवर्तनशील असते, लवचिक असते.

९) लोकसाहित्य हे लोकभ्रमातून किंवा आभासी सृष्टीतून निर्माण झालेले असते.

१०) लोकसाहित्य हे कला आणि वाङ्मय यांचा प्रभावी स्त्रोत आहे.

११) लोकसाहित्य हे कोणत्याही संस्कृतीच्या अभिसरणाबरोबर त्याच्या अभ्यासाचेही साधन बनते.

१२) लोकसाहित्य संपादन, विकसन आणि संक्रमण हे पिढान्‌पिढ्या सहज आणि स्वाभाविकपणे चाललेले असते.

१३) लोकसाहित्यात टिकून राहण्याची प्रवृत्ती दिसते. लोकसाहित्य समाज जीवनात होणारे नवनवीन बदल आत्मसात करते.

१४) लोकसाहित्य हा लोकसमूहाचा भावनिक आविष्कार आहे. लोकसाहित्य हा केवळ शाब्दिक आविष्कार ठरू शकत नाही.

लोकसाहित्य हे लोकमानस असते. लोकसाहित्य हा लोकसंस्कृतीचा आरसा असतो. लोकसाहित्यात व्यक्त होणारे लोकमानस हे चित्र, शिल्प, गीत, कथा, म्हणी, उखाणे यांनी नटलेले असते. लोकजीवन आणि लोकसंस्कृतीतील असंख्य घटना लोकसाहित्यात जागोजागी पेरलेल्या असतात. त्या झाडावर येणाऱ्या फळांची चव अनेक पिढ्या चाखत असतात. लोकसाहित्य ही लोकांचे जीवन जगण्याची एक सतत परिवर्तनशील असणारी लवचिक पद्धत आहे. या विषयी लोकसाहित्य विशारद श्री. प्रभाकर मांडे म्हणतात, "लोकसमूहातील घटक व्यक्तींचे परस्परांतील भावसंबंध कायम राहतात. चिंता, भय, आनंद हे भाव एकत्रितपणे अनुभवले जातात आणि व्यक्त केले जातात. त्यामुळे व्यक्तीची एका अर्थाने मानसिक आणि भावनिक गरज भागविली जाते. लोकसाहित्याचा बहुतांश भाग हा परंपरेने व्यापलेला असतो. लोकसमूहामार्फत अनेक विधी पार पाडले जातात तो त्यांच्या जीवनाचा एक भाग असतो. आपला वंश अखंडपणे पुढे जावा, स्वसंरक्षणासोबतच समाजाचे, गावाचे, पाड्याचे रक्षण व्हावे असे अनेक हेतू लक्षात घेऊन हे विधी केले जातात. सटवी पूजा, पित्र शांती, कुलदेवता विधी, पाऊस मागण्याचा विधी या सर्व घटकांसाठी गावदेवीची यात्रा भरविणे, जागरण, गोंधळ इ. कार्यक्रमांतून लोकसाहित्य आकारास येते. थोडक्यात लोकसाहित्य हे लोक जीवनातील अनेक घटकांचे एकजीव मिश्रण आहे. लोकसाहित्यात अनेक जीवनरंग असे बेमालूमपणे मिसळलेले असतात की, रंगसंगती होऊन जाते.

## १.५ लोकसाहित्याच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या

पारंपरिक लोक जीवनाचे संदर्भ असलेले साहित्य म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्यामधून लोकमानसाचा, लोकमनाचा, लोकसंप्रदायाचा, आविष्कार होत असतो. लोकमानस हे नेहमीच गीत, संगीत, कथा, नृत्य, नाट्य, उखाणे, आखाणे, पाखाणे, म्हणी, लोकोक्ती, चित्र, शिल्प, अशा विविध रूपातून व्यक्त होत असते. लोकसाहित्यामध्ये अफाट ताकद असते ती लोकांना परंपरागत बदलत्या जीवन मूल्यांचे दर्शन घडविण्याची. कोणत्याही समाजाचे सांस्कृतिक व सामाजिक संचित लोकसाहित्यातून मौखिक शब्दरूपातून साठवून ठेवता येते.

लोकसाहित्य विशारद दुर्गाबाई भागवत म्हणतात, 'लोककसाहित्याचा अभ्यास म्हणजे लोकसंस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास होय'. कोणत्याही समाजाच्या रूढी, परंपरा, श्रद्धा, विश्वास, आचार - विचार, लोकोक्ती, जीवन रहाटी, त्या समाजाची वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करायचा असेल तर लोकसाहित्याकडेच अभ्यासकाला जावे लागते. हे लोकसाहित्याच्या

दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. असे अतिव्याप्त असलेले लोकसाहित्य कोणत्याही एकाच व्याख्येत बांधून ठेवता येईल का?

लोकसाहित्याच्या व्याख्या मानसशास्त्राच्या अंगाने मानसशास्त्रज्ञांनी सर्वप्रथम सांगितल्या. या व्याख्यांमध्ये मानवी जीवनातील परंपराधिष्टीत प्राचीन अवशेष यांना विशेष प्राधान्य देण्यात आले आहे. समाजशास्त्रीय दृष्टीने लोकसाहित्याची चर्चा समाजशास्त्रज्ञांनी केली आहे. असे करताना त्यांनी समाजाच्या भौतिक परंपरेचे महत्त्व विशेष ध्यानी घेतले. लोकसाहित्याचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांनी लोकमानसावर विशेष भर दिला आहे.

### १.५.१ पाश्चात्त्य लोकसाहित्य अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या केलेल्या व्याख्या:

'स्टँडर्ड डिक्शनरी ऑफ फोकलोअर' या मारिया लीच यांच्या ग्रंथात दिलेल्या लोकसाहित्याच्या विविध व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येतील.

#### १) थिओडोर गास्टर (Theodre Gaster):

'It is a repository of popular traditions and an integral element of the popular climate.' लोकसाहित्य हे लोकसमाजाच्या लौकिक परंपरांचा निधी व लोकजीवनाचा सर्वसंग्राहक घटक असते. लोकसाहित्य हे लोकांनी, लोकांसाठी आणि लोकांकडून निर्माण केलेले पूर्णपणे लोकांचे साहित्य असते.

#### २) बी. ए. बॉटकीन (B.A.Botkin):

In purely oral culture everything is folklore.

'ज्या संस्कृतीत कोणत्याही स्वरूपाचा लिखित व्यवहार होत नाही. त्यातील सारेच मौखिक व्यवहार लोकसाहित्यात असतात. बॉटकिनने लोकसाहित्याचे स्वरुप अधिक स्पष्ट करताना म्हटले आहे, की परंपरेने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे आलेले व विशेष यांच्या स्वरूपात विकसित समाजात राहिलेले ज्ञान म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्यात लोकगीते, लोककथा, लोकरूढी, लोकसमजुती इत्यादीचा समावेश होतो. अविकसित, अर्धविकसित लोकांबरोबर प्रगत, सुसंस्कृत लोकांतही लोकसाहित्य प्रचलित असते. बॉटकिन यांनी केलेली लोकसाहित्याची व्याख्या 'लोकप्रतिभे'वर भर देते.

#### ३) विल्यम बास्कम (William Bascom):

'In anthropological usage the term folklore has come to mean myths, legends, folktales, proverbs, riddles, verse and variety of other forms of artistic expression whose medium is the spoken word."

'लोकसाहित्य म्हणजे दैवतकथा, आख्यायिका, लोककथा, म्हणी, कोडी आणि मौखिक माध्यमातून व्यक्त होणारे कलात्मक आविष्कार होय.' बास्कम यांच्या मते, लोकसाहित्य सुशिक्षित वा अशिक्षित समाजातही मौखिक शब्दरूपातच अस्तित्वात असते. बास्कम यांचे लोकसाहित्यासंदर्भातील विचार बॉटकीन यांच्या लोकसाहित्यस्वरूप विचारांशी साधर्म्य साधतात.

**४) जॉन मिश (John Mish):**

'विद्यमान शिष्ट समाजातील अल्पशिक्षित वर्गात अस्तित्वात असलेले प्राचीन लोकविश्वास, रीतिरिवाज आणि परंपरा यांचा समावेश लोकसाहित्यात असतो.'

परिकथा, धर्मगाथा, उत्सव प्रथा, पारंपरिक क्रीडा, क्रीडाप्रकार, लोकगीते, लोकसुभाषित, नृत्ये, शिल्पे व कला इत्यादी त्याची अंगे आहेत. जॉन मिश यांनी लोकसमाजाच्या परंपरावशेषांना विशेष महत्त्व देऊन लोकसाहित्याचा विचार केला आहे.

**५) ओरेलिओ स्पिनोजा (Aurelio Espinoza):**

Folklore may be said to be a true and direct expression of the mind of primitive man.

'लोकसाहित्य म्हणजे आदिम मानवाच्या मनाचा यथार्थ आविष्कार होय.'

स्पिनोजा हे लोकसाहित्याचा विचार लोकसंस्कृतीच्या आणि मानव-शास्त्रीय दृष्टीने करतात. "आधुनिक प्राचीन आणि अगदीच अशिक्षित लोकसमाजात मौखिक स्वरूपात ज्या परंपरा अस्तित्वात असतात. उदाहरणार्थ, लोकविश्वास, लोकरूढी, लोकभ्रम, म्हणी, वाक्प्रचार, उखाणी, गीते, कथागीते, कथा, विधी, दैवतकथा इत्यादी. त्यांचा समावेश लोकसाहित्यात होतो. लोक हे आधुनिक प्राचीन लोक असतात". स्पिनोजा लोकसाहित्याचा एक शास्त्र म्हणूनच विचार करतात त्यांच्या मते, लोकजीवनचा अभ्यास करण्याचे लोकसाहित्य हे श्रेष्ठ साधन आहे.

**६) जोनास बॅलीस (Jonas Balys):**

'Folklore comprizes traditional creation of people, primitive and civilized.'

'लोकसाहित्य ही आदिम मानवाबरोबर सुसंस्कृत मानवाचे ध्वनी आणि शब्दाद्वारा गद्य वा पद्य स्वरूपात झालेली परंपराप्राप्त निर्मिती होय'. लोकविश्वास, लोकरूढी, लोकभ्रम, लोककलाप्रकार, नृत्य, नाट्य आदींचा समावेश लोकसाहित्यात होतो. बॅलीस यांनी आदिम आणि सुसंस्कृत समाजाच्या संदर्भात लोकसाहित्याचा विचार केला आहे.

**७) फ्रान्सीस उतली (Francis Utley):**

"आदिम आणि सुसंस्कृत शिष्ट समाजात मौखिक स्वरूपात असणा-या लोकाविष्कारांना लोकसाहित्य असे म्हणतात."

लोकसाहित्याच्या उपरोक्त व्याख्या लोकसाहित्याचे स्वरूप विशद करण्यास पुरेशा आहेत. लोकसाहित्याच्या विविध लोकसाहित्य विशारदांनी केलेल्या व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर असेच आपण म्हणू शकतो की, लोकजीवनाची सर्वंकष व्याख्या करता येत नाही; म्हणूनच लोकजीवन हा ज्याचा पाया आहे अशा लोकसाहित्याची देखील एकच एक व्याख्या करता येत नाही.

### १.५.२ भारतीय लोकसाहित्य अभ्यासकांनी केलेल्या लोकसाहित्याच्या व्याख्या:

#### १) डॉ. ना. गो. नांदापूरकर:

'लोकवाङ्मय म्हणजे, लोकांनी निर्माण केलेले आणि मौखिक परंपरेने प्राप्त झालेले जे वाङ्मय तेच लोकवाङ्मय होय'.

लोकवाङ्मयाचा कर्ता लोकसमाजातील अज्ञात व्यक्ती असते. लोकवाङ्मयात लोककथा, लोकगीते, कहाण्या, उखाणे इत्यादींचा समावेश होतो.'

#### २) डॉ. प्रभाकर मांडे:

'लोकांमध्ये प्रचलित असलेल्या मौखिक परंपरा म्हणजेच लोकसाहित्य होय.'

लोकसाहित्य हे परंपरागत असते. लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसाहित्य हे लोकांचे असते.

#### ३) डॉ. वासुदेवशरण अग्रवाल:

लोकवार्ता (लोकसाहित्य) हे एक जिवंत शास्त्र आहे. 'लोक का जितना जीवन है, उतनाही लोकवार्ता का विस्तार है. लोकमें बसनेवाला जन, जन की भूमी और भौतिक जीवन तथा तीसरे स्थानसे उस जन की संस्कृति इतने तीनों क्षेत्रमें लोक के पूरे ज्ञान का अंतर्भाव होता है।'

#### ४) डॉ. कृष्णदेव उपाध्याय:

'लोकसंस्कृती हे अंतर्गत जनजीवनसे संबंधित जितने आचार-विचार, विधिनिषेध, विश्वास, परंपरा, धर्म, मूढाग्रह, अनुष्ठान आदि है वे सभी आते हैं।'

#### ५) डॉ. श्याम परमार:

'लोक की अपरिमित शक्ती, साहस, मनोभाव, मान्यताएं, विश्वास, रागद्वेष, परंपराएं, अडाके, टोनेटोनके, अनुष्ठान, रीतिरिवाज, गीतकथाएं, वेशभूषा आदि संयुक्त रूपसे लोकवार्ता के चेतन अस्तित्व की घोषणा करते हैं।'

लोक साहित्य हे एकसंघ समाजजीवनाचे असते. साक्षर, निरक्षर, ग्रामीण, शहरी, सर्व स्तरातील लोकजीवनाचा लोकसाहित्यात समावेश होतो.

#### ६) दुर्गाबाई भागवत:

'लोक साहित्य म्हणजे संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास होय.'

#### थोडक्यात लोकसाहित्य म्हणजे...:

१. लोकप्रतिभेचा आविष्कार असते.

२. आदिम मानवाच्या मनाचा यथार्थ आविष्कार असते.

३. परंपरेने प्राप्त झालेले ज्ञान आहे.

४. मौखिक परंपरेमुळे झालेली निर्मिती होय.

५. रुढी परंपरांचे संचित असते.

६. लोकजीवनातील एकंदर लोकाविष्कारी कलापरंपरा जसे लोकविश्वास, लोकरूढी, लोककथा, लोकगीते, नृत्य, नाट्य, नृत्यनाट्य इत्यादींचा समावेश असतो.

७. संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास असतो.

## १.६ लोकसाहित्याची संकेतव्यवस्था

लोकसाहित्य हे लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले असते. म्हणजेच हे साहित्य समूहाचे असते आणि त्याची निर्मितीही समूहाची असते. त्यामुळे समूहातील अनेक गोष्टींचे प्रकटन या लोकसाहित्यातून होत असते आणि या सर्वाच्या मागे एक समूहमन म्हणजेच लोकमन कार्यरत असते. जेव्हा लोकसाहित्यातील विशिष्ट एका लोककला प्रकाराची निर्मिती होत असते तेव्हा त्या निर्मितीच्या मागे या समूहातील अनेक संकेतांचे पालन होताना दिसते. विशिष्ट समाजाच्या विशिष्ट अशा रूढी, समजुती, प्रथा, परंपरा ह्या सबंध समाजामध्ये स्थिर रुपाने अस्तित्वात असतात. म्हणजेच समूहातील एका कुटुंबातील एका व्यक्तीपासून ते अनेक व्यक्तींपर्यंत या गोष्टींचे अस्तित्व असते. जेव्हा एखादी व्यक्ती ही कोणत्याही गोष्टीची अभिव्यक्ती करत असते तेव्हा त्या अभिव्यक्तीच्या मागे त्या समूहातील या घटकांचे संबंध जोडलेले दिसतात. हे संबंध जोडण्याचे अजून एक कारण म्हणजे समूहांमध्ये असलेल्या या रूढी, परंपरा, समजुती या सर्वांवर त्या विशिष्ट व्यक्तीचा आणि समूहाचा विश्वास असतो. यालाच लोकविश्वास असे म्हटले जाते. उदाहरणार्थ एखाद्या समूहातील एक व्यक्ती विशिष्ट एखाद्या देवतेची उपासना करत असेल, त्या देवतेसंबंधीचे संकेत, त्यांचे आचरण करत असेल तेव्हा निव्वळ ती एकटीच व्यक्ती असे करते आहे असे असत नाही; तर सर्व समाजच त्याचे पालन करत असतो. ती व्यक्ती ज्या समूहातून येते त्या संबंध समूहाच्या धारणा या त्या देवतेसोबत जोडलेल्या असतात. म्हणजेच एखाद्या देवतेची विशिष्ट पद्धतीने पूजा-अर्चा केल्यानंतर किंवा विशिष्ट गोष्टींचा त्याग केल्यानंतर संरक्षण, धनसंपत्ती किंवा यासारख्या गोष्टी प्राप्त होतात असा संकेत असेल तर त्या संकेताचे पालन समाजातील अनेक व्यक्ती करत असतात. यातून त्या व्यक्तीबरोबरच संपूर्ण समाजाचे अस्तित्व टिकून राहत असते. वेगळेपण दिसत असते आणि त्यासोबतच त्याचे आणि समूहाचे संरक्षण होत असते. या अशा संकेतातून समूहातील एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे त्याचे हस्तांतर होत असते आणि असे हे संकेत प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत टिकून राहिलेले दिसतात. त्यांचे हे टिकणे हे लोकविश्वासातून होत असते.

असे संकेत आपल्याला समाजामधून सहजतेने शोधता येतात. उदा. लोकनृत्य, लोकनाट्य किंवा विविध प्रकारचे विधी यातून असे संकेत दिसतात. विशिष्ट देवतेची पूजा करताना विशिष्ट रंगाचे वस्त्र वापरणे, विशिष्ट विधी करताना विशिष्ट प्रकारचे विधी क्रमाने करणे, तसेच विषम संख्या असणाऱ्या गोष्टींची सरबराई असणे, विशिष्ट ठिकाण, देवता, उपास-तापास, नाचण्याचे किंवा सोंग घेण्याचे प्रकार यातूनही असे संकेत दिसतात. विशिष्ट

विधींच्या वेळी विशिष्ट वाद्ये वाजविली जातात. दशावतार यासारख्या लोककला प्रकारातून देवतांच्या मुखवट्यांची पूजा, असे मुखवटे स्त्रियांनी स्पर्शू नयेत असे संकेत आपल्याला अनेक ठिकाणी शोधता येतात. अशा संकेतांना संस्कृतिक नियम असे म्हटले जाते. तर सुप्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ जीन्स बर्ग यांनी त्याला “मानवी वर्तनाचे आदर्श” असे म्हटले आहे. या सांस्कृतिक नियमांचे, संकेतांचे पालन हे काटेकोरपणे केले पाहिजे अन्यथा त्या गोष्टीतून मिळणाऱ्या लाभापेक्षा तोटे होण्याची शक्यता वर्तविली जाते. त्यामुळे असे संकेत हे लोकविश्वासासोबतच भीतीपोटीही नियमितपणे, काटेकोरपणे पाळले जातात. अनेक लोककथा, लोकनाट्य यातून असे संकेत दिसतात. पण हे संकेत विचारात न घेता केवळ कथा म्हणून, मनोरंजन म्हणून लोककथेकडे पाहिले असता त्याचा अर्थ खूप ढोबळ स्वरुपाचा निघतो. अर्थात सर्वच कथांमध्ये असे संकेत असत नाहीत. तसेच लोकनृत्यामध्ये विशिष्ट पद्धतीने केला जाणारा नाच किंवा विशिष्ट प्रकारची वाजविली जाणारी वाद्ये हे देखील वेगळ्या अर्थाचे सूचन करणारी असतात. तसेच चित्रकला, शिल्पकला, वेशभूषा, रंगभूषा यासाठी वापरले जाणारे रंग यामध्ये देखील रंगसूचना असतात. त्यामुळे त्यातून वेगळा अर्थ ध्वनित होत असतो.

**लोक कथेबाबतचे संकेत:**

१. लोककथेचा शेवट हा नेहमी सुखाचा असून बोध देणारा असतो.

२. लोककथेच्या शेवटामध्ये सुष्ट आणि दुष्ट यांच्यातील संघर्षात चांगल्या स्वभावाच्या व्यक्तीचाच विजय होत असतो.

३. त्यामुळे चांगल्या गुणांचा पुरस्कार व दुर्गुणांचा धिक्कार कथाशयातून केलेला असतो.

४. लोककथेत वास्तविक जीवनामध्ये शक्य नसणाऱ्या इच्छा, कल्पना पूर्ण होत असतात.

५. कथेतील नायकाच्या अंगी सर्व चांगले गुण असतात. जे ऐकणाऱ्यांना प्रेरणादायी असतात. इ.

**लोक विधी बाबतचे संकेत:**

१. विधी करण्यापूर्वी कुलदेवतेची प्रतिष्ठापना करणे.

२. विधी व्यवस्थित पार पडण्यासाठी सर्व देवताना आमंत्रण देऊन त्यांचे पूजन करणे.

३. विधीच्या प्रारंभी परंपरागत वाद्यांचा गजर.

४. विधीसाठी विशिष्ट लोकांनाच हजर राहण्याची मुभा. काही विधींना स्त्रियांना प्रवेश निषिद्ध असणे.

५. विधीसाठी विशिष्ट वस्त्रेच घालणे. इ.

## १.७ लोकसाहित्यामागील निर्मितीप्रेरणा

लोकसाहित्य हे लोकांनी लोकांसाठी निर्माण केलेले असले तरी या निर्मितीमागे काही विशिष्ट प्रेरणा कार्यरत असलेल्या दिसतात.

### १. आनंद, उत्साह व मनोरंजन:

साहित्यशास्त्रामध्ये साहित्य निर्मितीच्या प्रेरणा अनेक अभ्यासकांनी चर्चिल्या आहेत. त्यातील एक महत्त्वाची निर्मितीप्रेरणा म्हणजे आनंद होय. ही ललित साहित्याची मुख्य निर्मिती प्रेरणा असली तरी ती लोकसाहित्याचीही मुख्य प्रेरणा असल्याचे दिसते. याच्या सोबतच उत्साह आणि मनोरंजन याही प्रेरणा कार्यरत असतात. मुळात लोकसाहित्याची निर्मिती लोकांसाठी असते आणि अनेक लोक जेव्हा अनेकविध कारणांनी एकत्र येत असतात तेव्हा त्यांना मनोरंजनासाठी, उत्साह आणि आनंदासाठी अशा लोकसाहित्याची निर्मिती होत असते. अनेक विधी, त्यातून पार पडणारी अनेक लोकनृत्ये, लोकगीते, लोकसंगीत यात एक उत्साह असतो. तसेच या उत्साहाच्या सादरीकरणामध्ये आनंद आणि मनोरंजनाचाही सहभाग असतो. अनेक लोककलाकार याचे सादरीकरण करत असतात. त्यांच्या कलागुणांमुळे लोकसमूह आनंदित होत असतो; तसेच या सादरीकरणादरम्यान सादर करणारे कलाकार आणि पाहणारा किंवा ऐकणारा प्रेक्षक अशा दोघांनाही आनंदप्राप्ती होत असते. एखाद्या व्यक्तीचे वैयक्तिक किंवा सामाजिक स्वरूपाचे दुःख, वेदना लोकसाहित्यातील साहित्यप्रकारातून उत्कटतेने व्यक्त होत असते. त्यामुळे अशा दुःखाला, वेदनेला साहित्यातून मांडल्यानंतर दुःखाचा भार हलका होत असतो. लोकसाहित्य ही केवळ एका व्यक्तीची निर्मिती नसल्यामुळे त्याच्यामध्ये समूहमनाची संवेदनशीलता आविष्कृत होत असते. त्यामुळेच यामध्ये समष्टीभावाचा समावेश होतो आणि म्हणूनच अशा साहित्याच्या निर्मितीमागे केवळ एकाच व्यक्तीपेक्षा लोकसमूहाचा आनंद सामावलेला असतो. याच प्रयोजनातून लोकसाहित्याची निर्मिती होत असते.

### २. स्वसंरक्षण करणे व वंशसातत्य टिकवणे:

लोकसाहित्याच्या निर्मितीमागे अनेकदा स्वसंरक्षण व वंशसातत्य टिकवणे ही कारणेही दिसतात. एखादी व्यक्ती किंवा लोकसमूह कधीनाकधी कोणत्यातरी वाईट अनुभवाला सामोरा जात असतो. असे संकट म्हणजे रोगराई, अतिवृष्टी किंवा दुष्काळ किंवा अनेक विनाशकारी घटना. या घटना म्हणजे सृष्टीचा प्रकोप मानला जातो. एकाच व्यक्तीबरोबर अनेकांच्या आयुष्यात त्या घडत असतात. तेव्हा त्याला सामूहिकतेचे रूप प्राप्त होत असते. अशा घडणाऱ्या घटना होऊ नयेत यासाठी संकेतांचे पालन व्यक्ती स्वतः व समूहासाठी करत असतात. यांचे पालन भय किंवा निष्ठा या भावनेतून होत असतात. याच्या पाठीमागे श्रद्धा-अंधश्रद्धा, कल्पना असतात. सृष्टी व्यवहारातील बलिष्ठ, अनियंत्रित शक्तींवर विशिष्ट विधींच्या, लोकगीतांच्या सादरीकरणातून, संकेतांच्या पालनातून विजय मिळवता येतो. तसेच त्या शक्तींना प्रसन्न करता येते. असा एक विश्वास माणसाच्या ठिकाणी वाढीस लागतो आणि हा लोकविश्वास समूहामध्ये देखील स्थिर होतो. विविध आचारधर्म, व्रत-वैकल्य, चित्र, शिल्प, कथा, गीत, नृत्य, उपासना या सर्वांचे अवलंबन एका व्यक्तीकडून व समूहाकडून होत असते. तसेच निपुत्रिकासाठी वंशप्राप्ती व्हावी यासाठीही विविध व्रत-उपवास, विधी पार

पाडले जातात. या गोष्टी स्वत:चे आणि समूहाचे संरक्षण व वंश सातत्य टिकवते ही लोकांची धारणा वाढीस लागून लोकसाहित्याची निर्मिती होत असते.

### ३. चरितार्थ चालवणे:

साहित्यशास्त्रामध्ये साहित्याच्या निर्मिती मागे यश-अर्थप्राप्ती असे देखील प्रयोजन सांगितले आहे. तद्वतच लोकसाहित्याच्या निर्मितीमागेही अर्थकारण असते. इथे अर्थकारण म्हणजे केवळ पैसा असे नाही तर त्याचा अर्थ चरितार्थाचे पालन असे होते. लोकसाहित्यातील बहुतांश साहित्यप्रकार हे सादरीकरण या तत्त्वात मोडणारे असतात. त्यामुळे त्यांची निर्मिती आणि त्यासोबतच त्याचे सादरीकरण होत असते. हे सादरीकरण करणारे लोककलावंत असतात. या लोककलावंतांना त्यांच्या सादरीकरणासाठी लोकसमूहातून काहीएक प्राप्ती होत असते. ज्याच्या आधारावर ते स्वतःची कलाउपासना तर करतातच पण त्यासोबतच स्वतःचा चरितार्थही चालवत असतात. महाराष्ट्रातील विविध कथागीते, स्तुतीगीते-पोवाडा, अभंग अशा अनेक प्रकारातून व त्याच्या सादरीकरणातून लोककलावंत आपला चरितार्थ चालवत असतात. तसेच गोंधळ, जागरण, बहुरूपी, तमाशा, आख्यान, भारुडे, वासुदेव, पिंगळा जोशी अशा अनेक लोककला प्रकारात लोककलावंत आपली नवनिर्मिती करतात. गावोगावी फिरून त्याचे सादरीकरण लोकांसमोर ठेवतात. कित्येकदा अशा निर्मितीत ते आपले नावही गोवत असतात. यातून ते आपला चरितार्थ चालवत असतात. या प्रेरणेमुळेही लोकसाहित्याची निर्मिती होत असते.

### ४.असफल इच्छा-आकांक्षाची परिपूर्ति:

लोकसाहित्यातील विशिष्ट लोककलाप्रकारातून लोकसमूह आपल्या प्रत्यक्ष जीवनामध्ये असफल झालेल्या इच्छा-आकांक्षांची परिपूर्ती करून घेण्याचा प्रयत्न करत असतो. मानवाच्या वास्तव जीवनात अपार असे दुःख, संकटे, हतबलता असतात. त्या दुःखावर मात करण्याचे बळ किंवा परिस्थिती कित्येकदा मानवाच्या हातात असत नाही. अशा परिस्थितीवर विजय मिळविण्याचे हरेक प्रयत्न त्याच्याकडून होत असतात. पण त्यात यश मिळत नाही तेव्हा मात्र मनोमन स्वरुपाचे प्रतिजग निर्माण करून त्यामध्ये असे सुख मिळवण्याचा प्रयत्न त्याच्याकडून होऊ लागतो. उदा. लोककथा, लोकगीते, लोककथागीते. यासारख्या प्रकारातून प्रत्यक्ष जीवनात न घडू शकणारी, कल्पनेवर आधारित पात्रे, त्यांचे जगणे, त्यांच्याकडे असणाऱ्या अद्वितीय शक्ती, विविध घटना, कथानकाचा शेवट यातून या इच्छा पूर्ण केलेल्या दिसतात. कथांमधील विविध प्रतिमा, स्वप्ने, लोकभ्रम, लोकविश्वास यातून या इच्छांचा अर्थ लावता येतो. तसेच विविध प्रकारची व्रत-वैकल्य, पूजाअर्चा, विधी यातूनही विशिष्ट गोष्टींची प्राप्ती यातून होते असा लोभही यात असतो. लोकसाहित्यातील अशा गोष्टींचा अभ्यास हा मानसशास्त्रीय पद्धतीत केला जातो. त्यामुळे काल्पनिक स्वरुपाचे जग निर्माण करून त्यामध्ये जगण्याची आदिम मानवी इच्छा ही लोकसाहित्याच्या निर्मितीला कारणीभूत ठरते.

## १.८ लोकसाहित्य स्वरूपविवेचन

लोकसाहित्याचे स्वरूप पाहत असताना लोकसाहित्यातील काही महत्त्वपूर्ण संकल्पना समोर येतात. या संकल्पना समजून घेणे खूप महत्त्वाचे ठरते. त्याचा विचार आपण इथे करू.

## १.८.१ 'लोक' आणि 'लोकमानस'

### १.८.१.१ लोकसाहित्यातील 'लोक' हा शब्द:

'लोकसाहित्य' हा एक सामासिक शब्द आहे. 'लोकसाहित्य' हा शब्द 'लोक' आणि 'साहित्य' या दोन पदांचा मिळून बनला आहे. 'लोकसाहित्य' म्हणजे लोकांचे साहित्य असा संदर्भ आपण लोकसाहित्याचे स्वरुप लक्षात घेताना अभ्यासला आहे. अर्थात यात 'लोक' हा शब्द अनेकार्थी आहे. मराठी व्युत्पत्तिकोशात- संस्कृतातील 'लुक्' या धातूपासून लोक या शब्दाची व्युत्पत्ती सांगितली आहे. 'लोक' हा शब्द जन, मनुष्य, समाज या अर्थाने वापरला जातो.

**'लोक' हा विश्वाचा विभाग:**

'भारतीय संस्कृतीकोश' या भारतीय संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या ग्रंथाचे संपादन पंडित महादेवशास्त्री जोशी यांनी केले आहे. सदर ग्रंथात 'लोक' हा विश्वाचा विभाग आहे असे मानले आहे. 'स्वर्ग लोक', 'पृथ्वी लोक' आणि 'पाताळ लोक' असे त्रिलोक कल्पिले आहेत. सूर्य, विष्णू आणि शिव हे त्रिलोकांचे अधिपती म्हणजे त्रिलोकेश आहेत असे सांगितले आहे. या त्रिलोकबरोबर पृथ्वी, अंतरिक्ष, स्वर्ग, मध्यविभाग, जन्मस्थान, पुण्यप्रसाद व सत्यलोक अशा सप्तलोकाचीही कल्पना मांडली आहे.

'लोक' समाज एक विराट कल्पना आहे असे वेदवाङ्मयात मानले आहे. ऋग्वेदात 'लोक' आणि 'जन' या शब्दांचा उल्लेख अनुक्रमे 'लोकव्यवहार' व 'स्थान' या अर्थांनी आढळतो. अवघ्या विश्वाच्या निर्मितीमागे ईश्वर आहे, हे वेदवाङ्मयाचे मत आहे.

**लोक: विविध अर्थी ते विशिष्ट अर्थी:**

प्राचीन काळापासून भारतीय परंपरेत 'लोक' हा शब्द विविध अर्थांनी वापरला जातो.

**नाभ्यां आसीदंतरिक्ष शीष्र्णो द्यौः समवर्तत् ।**

**पद्भ्यां भूमिर्दिशः श्रोत्रा तथा लोकां अकल्पयत ।। (ऋग्वेद, १०:१०:१४)**

या श्लोकाचा अर्थ समजून घेणे आवश्यक आहे.

'भगवंताच्या नाभीतून अंतरिक्ष, मस्तकातून स्वर्ग आणि चरणातून भूमी, कानातून दिशा आणि अखिल लोकाची निर्मिती झाली.' वेदोपनिषदांपासून ते "महाभारत", "गीता", भरतमुनींचे-"नाट्यशास्त्र", पाणिनीची-"अष्टाध्यायी" आणि वररुचीचे "वार्तिक" या ग्रंथांतूनही

'लोक' शब्दाचा विविधार्थी वापर आढळतो. या सर्वांचा विचार करता 'एका विशिष्ट सूत्रात ओवला गेलेला मानवी समूह' असा 'लोक' या शब्दाचा अर्थ हाती लागतो.

'लोकसाहित्य' या संकल्पनेत मात्र 'लोक' या शब्दाचा विशिष्ट अर्थी वापर होतो. तो 'समाज' वा 'मानव समूह' या अर्थी होय.

### इंग्रजीतील Folk:

मराठी भाषेत वापरला जाणारा 'लोक' हा शब्द इंग्रजी भाषेतील folk या शब्दावरून आलेला आहे. अव्वल इंग्रजी काळात लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झाला. तेव्हाच अभ्यासकांना folk-lore' या शब्दाशी आपला प्रथम परिचय झाला. मराठीत या शब्दाला 'लोकविद्या', 'लोकवाङ्मय', 'लोकसाहित्य' असे पर्यायी शब्द वापरले गेले. इंग्रजीत folk या संकल्पनेच्या स्पष्टीकरणातही मतभिन्नता आढळते. बव्हंशी व्याख्यांमध्ये 'लोक' या शब्दांचा अर्थ 'वेगळी परंपरा, वेगळी जीवनपद्धती असणारा जनसमूह' असा आढळतो. मराठी लोकसाहित्याभ्यासकांनी या स्पष्टीकरणाच्या अधिक जवळ जाण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

### मराठीतील 'लोक' विषयक भूमिका:

डॉ. ना. गो. कालेलकरांच्या मते, 'लोक' म्हणजे एका वेगळ्या संस्कृतीचे दर्शन घडविणारा वर्ग होय. हा वर्ग स्वाभाविक जीवन जगत असतो. त्यांची संस्कृती निसर्गाला अधिक जवळची असते. ही आद्य संस्कृती नसली तरी तिची जुन्यात जुनी उपलब्ध होऊ शकणारी अवस्था आहे. ही अवस्था समाजातील काही माणसांच्या जीवनविषयक सवयींतून, रूढींतून, परंपरागत नृत्ये, गीत इत्यादी कलाकृतींतून प्रकट होऊ शकते.'

**'लोकसाहित्य:** एक स्वतंत्र अभ्यासक्षेत्र' या ग्रंथात डॉ. गंगाधर मोरजे यांनी 'लोक' संकल्पनेचा विचार वेगळ्या पद्धतीने केला आहे. त्यांच्या मते, 'समाजशास्त्रातील 'लोकसमूह एकत्र येण्यामागे समाजधारणेची विशिष्ट तत्त्वे असतात उदा. समान भाषा, समान भूपरिसर इत्यादी. लोकसाहित्यातील 'लोक' अशा समान तत्त्वांनी, भूप्रदेशाने, समान भाषा याच्या आधारे एकत्र आलेले असतात. हे काही प्रमाणात खरे असले तरीही लोकसाहित्यातील 'लोक' समूहापेक्षा वेगळा असतो. त्यांच्या एकत्र येण्यामागे समान सौंदर्यभावनेचे महत्त्वाचे सूत्र असते. गंगाधर मोरजे यांच्या मते, समान सौंदर्यभावना, भाषा, नीतिकल्पना, तत्त्वज्ञान या तत्त्वांनी एकत्र आलेला समूह म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक' होय. समान सौंदर्यभावनेमुळे लोकसाहित्य हे कलारूप धारण करते आणि मग लोकसाहित्य हे वाङ्मय व कला असते हे लक्षात येते. मौखिक आविष्कार आणि कृती यांच्या प्रयोगातून लोकसाहित्य 'जीवनाचा आविष्कार' कलात्मकरित्या घडवीत असते.

### 'लोक' संकल्पनेचा एकांगी विचार:

'लोक' या संकल्पनेचा विचार करताना कोणत्यातरी एकाच अंगाचा विचार केला जातो म्हणून लोक ही संकल्पना बहुतेक अभ्यासकांच्या विवेचनात एकांगी ठरते.

१. केवळ नैसर्गिक किंवा निसर्गाधिष्ठित जीवन जगणारा मानवी समूह म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक' मानणे.

२. अप्रगत, असंस्कृत, अविकसित लोकसमूह म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक' मानणे.

३. 'एन्सायक्लोपीडिया ऑफ सोशल सायन्सेस' या कोशात म्हटल्याप्रमाणे, 'केवळ आदिम, असंस्कृत जमातीतील लोकभ्रम, रुढी इत्यादींचे अवशेष पुढे सभ्य समजल्या जाणाऱ्या लोकसमूहात राहातात असे लोकसमूह; ज्यात या अवशेषांचे प्रमाण विशेष असते त्यांना 'लोक' मानणे.

**'लोक': व्यापक संकल्पना:**

अप्रगत अवस्थेकडून प्रगत अवस्थेकडे प्रवास करणे, हे मानवी जीवनाच्या विकासाचे परंपरागत सूत्र आहे. आजचा शहरवासी किंवा नगरवासी प्रगत मानवसमूह एकेकाळी वन्यजीवन जगणारा, रानावनात राहणारा आणि कंदमुळे खाऊन जगणारा किंवा शिकार करून आपली उपजीविका करणारा मानव होता. कालांतराने तो ग्रामवासी झाला. पुढे भौतिक प्रगतीमुळे तो शहरवासी झाला. वनवासी - > ग्रामवासी - > शहरवासी मानवाच्या स्थित्यंतराचे हे टप्पे आहेत. स्थित्यंतराच्या या प्रवासात मानवाच्या 'यात्वात्मक' (Spiritual) धारणेत बदल होत ती 'भावनात्म' (Emotional), 'तर्काधिष्ठित' (Rational) अशी पर्यवसीत होत गेली. परंपरागत मौखिक परंपरेने त्याच्यापर्यंत चालत आलेले शहाणपण उरले. नीतिविषयक प्राचीन कल्पना आजही त्याला काही प्रमाणात सोडता आलेली नाही. वंश, भाषा, प्रदेश, देशनिष्ठा आजही त्याच्यात जागी राहिली. असा जो जनसमूह, जो आजही खेड्यात वा शहरात राहातो. स्वतःच्या सांस्कृतिक परंपरेचे, वैशिष्ट्यांचे जतन करतो. प्रगत जीवनाबरोबरच परंपरेने चालत आलेल्या भाषा, आचार, विचार, नीती, परंपरांचे भान ठेवतो. स्वतःच्या वेगळ्या सौंदर्यभावनेची, मूल्यभावनेची जपणूक करतो असे समूह म्हणजे लोकसाहित्यातील 'लोक' होय, असे म्हणता येईल. अशा लोकसमूहाचे साहित्य ते लोकसाहित्य होय. हे लोकसाहित्य व्यक्तिनिष्ठ निर्मिती नसते. ती समूहनिष्ठ निर्मिती असते. 'लोक' या संकल्पनेचा व्यापक विचार होणे लोकसाहित्याच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते.

### १.८.१.२ लोकमानस:

**लोकसाहित्य: लोकमानसाचा आविष्कार:**

फ्रान्सिस बोआस यांनी "द माईंड ऑफ प्रिमिटिव्ह मॅन' मध्ये- 'लोकसाहित्याची जी निर्मिती होते व हे लोकसाहित्य एका पिढीकडून दुस-या पिढीकडे संक्रमित होते, आणि टिकून राहाते ते केवळ लोकमानसामुळे!' असे म्हटले आहे. कोणत्याही समाजातील वा प्रदेशातील लोकसाहित्याचा कर्ता एकच एक नसतो. लोकसाहित्याचा निर्माता अनामिक असतो. लोकसाहित्य ही कोण्या एकाची निर्मिती नसून ती लोकमानसाची निर्मिती असते. लोकसाहित्यातून लोकमानस प्रकट होत असते म्हणून लोकसाहित्य लोकमानसाचा आविष्कार मानले जाते. याच सूत्राचा आधार घेऊन लोकमानसाची संकल्पना स्पष्ट करता येईल.

**समूहमनात व्यक्तिमनाचे विरघळणे:**

आपली प्रत्येकाची एक विचारधारा असते, व्यक्तिगत जीवनजाणीव असते. तसेच समूहाच्या सहवासाने तयार झालेली सामूहिक जाणीवही असते. लोकसमूहातील प्रत्येक व्यक्ती समूहाशी एकरूप असते, समूहात मिसळलेली असते. आपण व्यक्ती म्हणून वेगळे असलो तरी लोकसमूहात वावरताना आपले निराळेपण वा वेगळेपण उरत नाही. समूहमनात व्यक्तिमन विरघळते आणि स्वतंत्र व स्वायत्त समूहमन तयार होते. यालाच 'लोकमन' असे म्हणतात. समूहमनाशी एकरूप झालेल्या लेखकाने केलेली निर्मिती एका व्यक्तीची न राहाता ती समूहाची, लोकमनाची म्हणजेच लोकमानसाची निर्मिती बनते.

**सांघिक पुनर्निर्मिती:**

लोकसाहित्याच्या आविष्कारात कुणा एका व्यक्तीच्या भावभावनांना महत्त्व नसते तर समूहाला महत्त्व असते.

प्रत्येक व्यक्तीचे व्यक्तित्व समूहात सिद्ध होत असते. ती व्यक्ती ज्या समूहाचा भाग आहे, त्याच्या कल्पना, विचार, सवयी, रूढी तो समूह नियंत्रित करत असतो. प्राचीन काळापासून चालत आलेले परंपरागत मानस सुद्धा त्या व्यक्तीला प्राप्त होत असते. समूहमनाशी एकरूप होऊन केलेल्या 'कृती' व 'उक्ती'मधून ते प्रकट होते. लोकसाहित्यात व्यक्त होणाऱ्या भावभावना, इच्छा-आकांक्षा, विधिनिषेधाच्या कल्पना व्यक्तिगत राहात नसून त्या समूहातील प्रत्येक व्यक्तीच्या म्हणजेच समूहमानसाच्या होतात. ब्रूनो नेटल यांनी लोकगीत निर्मितीसंबंधी आपल्या 'फोक अँड ट्रॅडिशनल : म्युझिक ऑव्ह द वेस्टर्न कंट्रीज' या ग्रंथात लोकगीताची निर्मिती 'सांघिक पुनर्निर्मिती' (communal creation) असते असे मत नोंदवले आहे. ती कोणत्याही एका व्यक्तीची नसते. ती अनेकांची असते. ही निर्मिती अनेक लोक एकाच वेळी करतात. ही पूर्वविचारसरणी नाकारून, 'सांघिक पुनर्निर्मिती'चा सिद्धान्त मांडला. नेटल यांचा सांघिक पुन:निर्मितीचा सिद्धान्त लोकगीत यासंबंधी असला तरी तो एकंदर लोकाविष्काराच्या दृष्टीने उपयुक्त आहे.

**सर्वव्यापी व सर्वसाक्षी लोकमानस:**

लोकमानसाविषयी अनेक गैरसमज आहेत जसे, लोकमानस हे अशिक्षित, अप्रगत, वन्य आदिवासी जमाती किंवा अप्रगत ग्रामीण लोकांतच असते. अर्थात ही समजूत निराधार आहे. कारण ‘लोकमानस’ वन्य, ग्रामीण संस्कृतीबरोबर शहरी संस्कृतीतील व्यक्तिमनातही अस्तित्वात असते, असे दिसून येते. बुद्धिवादी व लौकिक साहित्यिकांच्या निर्मितीतही लोकधर्मासंबंधी अनेक गोष्टी येतात. डॉ. मधुकर वाकोडे यांनी 'लोकप्रतिभा आणि लोकतत्त्वे' या ग्रंथात बहिणाबाईंच्या कवितेत, माहिमभट्टाच्या 'लीळाचरित्रा'त लोकमानस कसे व्यक्त झाले आहे, याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

लोकमानस नेहमीच अलौकिकाची ओढ बाळगणारे असते. अद्भुताची सृष्टी पाहाण्यात रंगून जाणारे असते. श्रीचक्रधरांचे उत्तरापंथे गमन झाल्यावर माहिमभट्टांनी त्यांचे चरित्र सिद्ध केले ते 'लीळाचरित्र'. या चरित्रकथेत लोकमानसाचे प्रतिबिंब स्पष्टपणे उमटलेले आढळते. श्रीचक्रधरांच्या चरित्रातील काही घटना लोकमानसाने अद्भुताच्या पातळीवर अनुभवलेल्या आहेत असे लीळाचरित्रातील अनेक लीळांतून जाणवते.

**अभिव्यक्तीची समूहविशिष्टता:**

लोकसाहित्यात समूहविशिष्टता उठावदार असते. प्रभाकर मांडे म्हणतात त्याप्रमाणे, आदिम अवस्थेत व्यक्तीच्या मनातील व्यक्तिविशिष्ट भाग अतिशय अल्प असतो. प्रत्येक व्यक्तीवर समूहाचा प्रभाव असतो. व्यक्ती शिक्षित झाली की, तिला स्वतःचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. तरी सुद्धा तिच्या व्यक्तिमनात समूहमन, लोकमानस असतेच. अशा व्यक्तीने केलेल्या अभिव्यक्तीत व्यक्तिविशिष्टता येण्याऐवजी समूहविशिष्टता येते आणि लोकमानसाशी एकरूप असलेल्या व्यक्तिमनाची ती निर्मिती वाटते. बहिणाबाईंच्या निर्मितीत असा अनुभव येतो आणि बहिणाबाईंची कविता हा व्यक्तिनिष्ठ आविष्कार असूनही तो लोकमानसाचा आविष्कार वाटायला लागतो. तर परशरामाच्या 'असा का केलास माझा त्याग' या लावणीतील गोपी कृष्णाला एक विरहिणी विचारते,

**'असा का केलास माझा त्याग' । कुण्या गोष्टीत धरिला राग ।। धृ।।**

वरवर पहाता जरी ही परशरामाची लावणी असली तरी त्यातील पुढच्या प्रश्नामुळे

**बाहेर काही लई दिसले । म्हणून मन पर ठई बसले?**

किंवा तिने केलेल्या लाडिक तक्रारीमुळे

**तू दगलबाज बैमाना दुश्मना । कापिल्यास कित्येकांच्या माना ।। अरे दुश्मना**

प्रस्तुत रचना केवळ परशरामाची न राहता समूहमनाचा आविष्कार ठरते.

**अनुभवाची सामूहिक ऊर्जा:**

'गाव करील ते राव करील काय?' ही लोकोक्ती गाव एकत्रितपणे खूप मोठे काम सहज तडीस नेऊ शकते, हेच अधोरेखित करते. एखाद्या अनुभवाची ऊर्जा समूहामध्ये असते. समूहाकडून ती चेतविली गेली की लोकसमूहातील कोणत्यातरी एका व्यक्तीकडून निर्मितीची क्रिया घडू लागते. या व्यक्तीच्या ठिकाणी निर्मितीक्षम अंगभूत गुण असतात. तो प्रतिभावान असतो. लोकसाहित्याची निर्मिती एका माणसाची नसतेच का कधी? डॉ. व्हेरियर एल्वीन यांनी लोकगीतनिर्मितीच्या संदर्भात या प्रश्नाची सोडवणूक करण्याचा प्रयत्न केला आहे. तो असा- 'लोकगीत हे कोणत्याही व्यक्तीने निर्माण केलेले असले तरी कालांतराने त्या व्यक्तीचा विसर पडून ते गीत समुदायाचे होते. आणि मुखपरंपरेने समाजात अस्तित्वात राहाते. प्रा. द. ग. गोडसे यांनी डॉ. एल्वीन यांच्या मताचे अधिक स्पष्टीकरण दिले आहे. ते असे, ही व्यक्ती जी निर्मिती करीत असते ती समष्टीच्या / समस्त समूहाच्या अनुभवाची असते. लोकगीत हा एका व्यक्तीने केलेला आविष्कार असतो. हा आविष्कार स्वयंस्रोत असतो, हे खरे असले तरी ती अनुभूती समष्टीच्या अनुभवांची असल्यामुळे ती 'सामूहिक पुनर्निर्मिती मानली गेली आहे. केवळ लोकगीताच्या संदर्भातच अशी सामूहिक पुनर्निर्मिती होते असे नाही. लोककथा, लोकनाटकातील काही प्रसंग, चित्र, शिल्प यासारखे आविष्कारही एकेक व्यक्ती स्वतःच्या मगदूराप्रमाणेच करीत असते आणि तरीही त्या निर्मितीतून समूहमनाचीच भावना अभिव्यक्त होत असल्याने ती निर्मिती व्यक्तिविशिष्ट न राहता समूहविशिष्टच होते. लोकमानसाची होते.

लोकसाहित्य हे समूहमनाची निर्मिती असते. लोकमानसाचा आविष्कार असते.

## १.८.२ 'लोकधर्म' आणि 'लोकदैवत'

### १.८.२.१ लोकधर्म:

**धर्म संकल्पना:**

लोकधर्म आणि लोकदैवत या संकल्पनांचा विचार करताना सर्वात प्रथम धर्म म्हणजे काय? हे लक्षात घेणे क्रमप्राप्त आहे. "धर्म म्हणजे माणूस आणि त्याच्या भोवतालचे पर्यावरण यांच्यातील संबंधित्वाच्या संकल्पनेला मूर्त स्वरूप देणारी व प्रत्येक संस्कृतीत आढळणारी श्रद्धा, आचार यांची व्यवस्था होय." धर्म ही एक व्यवस्था आहे. मनुष्यमात्रांवर आणि निसर्गावर अधिसत्ता गाजविणाऱ्या माणसापेक्षाही प्रबळ असणाऱ्या अशा शक्ती निसर्गात वर्तत असतात, त्यांची आराधना करणे, अनुनय करणे म्हणजे धर्म होय. अगदी प्राचीन काळापासून माणूस टोळी करून राहाताना आणि नंतरच्या काळात समाज करून राहाताना आपल्या बांधवांशी जखडला गेला तो धर्मामुळेच होय. धर्माचा आधार कोणताही समाज मजबूत आणि भक्कम करीत असतो.

**लोकधर्म:**

लोकसाहित्य आणि लोकजीवन यांचा अतूट संबंध असतो. त्यांच्या नात्यांची वीण घट्ट असते. लोकसाहित्याचा अभ्यास हा एक प्रकारे लोकजीवनाचाच अभ्यास असतो. लोकमानस विविध रूपांतून अभिव्यक्त होत असते. त्या रूपांचा अभ्यास करताना लोकजीवन, लोकसंकेत, लोकरूढी, लोकाचार-विचार, लोकविकास, विधिनिषेध, विधिविधाने यांचा शोध घ्यावा लागतो. लोकसाहित्याचा परिपूर्ण अभ्यास करायचा असेल तर लोकधर्म समजून घेणे ही, कोणत्याही अभ्यासकाची गरज आहे. श्रद्धेवर आधारित कर्मकांडाची व आचारविधींची व्यूहरचना म्हणजे 'लोकधर्म' होय.

**लोकधर्म हाच यातुधर्म:**

अवघे लोकजीवन गूढ अगम्य अशा शक्तींनी व्यापलेले असते. या शक्तींना प्रसन्न करण्यात लोकमानसाचे हित असते. अशा शक्तींची आराधना करणे, त्यांचा अनुनय करणे याचा एक सुविहित आचार दृष्टोत्पत्तीस येत असतो. हा आचार म्हणजे लोकधर्म होय. मानवाला आपल्या सभोवतालच्या पर्यावरणाशी जुळवून घेताना त्याला आजारपण, रोगराई, अवर्षण, दुष्काळ, अतिवृष्टी, पूर, महापूर, भूतपिशाच्च यासारख्या अनेक समस्यांना सामोरे जावे लागले. लोकमानसाला अशा अदृश्य शक्तींची कमालीची भीती वाटत असे. या शक्तींना शरण जाणे किंवा त्यांना काबूत ठेवणे एवढेच लोकमानसाला ठाऊक होते. अदृश्य शक्तींवर विजय मिळविण्यासाठी लोकमानसाने यात्वात्मकतेचा आधार घेतला. यालाच यातुधर्म म्हणतात. प्राचीन माणसाला सभोवतालच्या भौतिक विश्वातील सर्व वस्तुमात्रातील यात्वात्मक शक्तीची जाणीव झाली होती. ही शक्ती विशिष्ट मंत्र आणि विधी यांच्या साहाय्याने वाढविता वा कमी करता येते, अशी कल्पना केली. विधियुक्त मंत्रगायनाने आणि मंत्रोच्चारयुक्त कर्माने स्वतःच्या ठिकाणचे यात्वात्मक सामर्थ्य वाढविता येते व त्याद्वारे इष्टसिद्धी प्राप्त करून घेता येते. अशीही त्याची दृढ श्रद्धा बनली. या प्रकारची जादू विद्या, मंत्र-तंत्र जाणणारी अधिकारी व्यक्ती प्राचीन समाजात होती. तिला भगत / देवऋषी (Shaman) म्हणत. भगत हा प्राचीन

समाजाच्या दृष्टीने देवमाणूसच (Mangod) होता. या भगताच्या / देवमाणसाच्या साहाय्याने अनेक गोष्टी साध्य करता येतात यावर प्राचीन माणसाने विश्वास ठेवला. या विश्वासातून 'विधी', 'निषेध' यासंबंधीचे कर्मकांड निर्माण झाले. हा प्राचीन 'यातुधर्म' होय.

**आराधना हाच संकटनिवारणाचा उपाय:**

आपल्यावर वारंवार येणारी संकटे थोपवणे सहज शक्य नाही. आपल्यावर येणारी विविध संकटे आपल्या सभोवतालच्या सृष्टीत अलौकिक शक्ती व प्राणी आणतात, लोकमानसाने असे मानले होते. सृष्टीतील या शक्तींना व प्राण्यांना आपलेसे कसे करता येईल? त्यांना आपल्या अंकीत ठेवता येईल का? असे प्रश्न त्याला पडू लागले. शिवाय यातून मुक्त झाल्याशिवाय आपल्यावरची संकटमालिका दूर होणार नाही असे त्याला वाटले आणि त्यावरचा जो मार्ग त्याने शोधून काढला तो मार्ग सर जेम्स फ्रेझर म्हणतात त्याप्रमाणे 'आराधने'चा होता. यादृष्टीने त्याने काही मंत्र आणि विधी निर्माण केले आणि त्यानंतर श्रद्धेने त्यांचे पालन केले. अलौकिक शक्तींची प्रार्थना करून, त्यांना आमीष दाखवून, काही वेळा त्यांच्यावर जरब बसवून, पीकपाणी, सुखसमृद्धी इत्यादीची प्राप्ती करून घेता येते, अशीही प्राचीन माणसाची श्रद्धा ठरली. आराधना हाच संकटनिवारणाचा तरणोपाय ठरला.

**सामूहिक कर्म:**

यातुश्रद्धेतील अत्यंत महत्त्वाचे आणि लोकमानसावरील संकट निवारणाचे विश्वासार्ह तत्त्व, हे सामूहिक कर्माचे तत्त्व असते. वंश सातत्य आणि स्वसंरक्षणासाठी केले जाणारे विधी व्यक्तिगत पातळीवर असतात. असे कुलाचार कौटुंबिक असतात. त्या त्या कुळाचे असतात. तथापि संपूर्ण समाजावरील अरिष्ट टाळण्यासाठी सामूहिकरित्या विधी करावा लागतो. यातुशक्तीला आवाहन करून विधीद्वारे इष्टसिद्धी वा अनिष्ट निवारण करून घेता येते. 'सामूहिक कर्म' हे यातुश्रद्धेतील एक महत्त्वाचे तत्त्व होय. कोणतीही इष्ट घटना निसर्गात घडणाऱ्या घटनेचे अनुकरण करूनही घडविता येऊ शकते. अशी श्रद्धा पक्की करून त्यासंबंधी अनेक प्रकारचे विधी निर्माण झाले. पाऊस मागण्याचे विविध विधी आजही लोकसमाजात आढळतात. निपुत्रिक स्त्रीच्या हाताने झाडे लावू नयेत; किंवा विवाह, पुत्रजन्मोत्सव, धान्यपूजा आदी विधीत मातृत्व प्राप्त झालेल्या स्त्रीचा समावेश करावा. यासारख्या आचारामागे 'साधर्म्य' कल्पनेचे तत्त्व आहे.

दुर्गाबाई भागवत यांच्या मते, "माणसांनी देवाची कल्पना केवळ कल्पनेतूनच साकार केली नाही. त्यांनी देवांची कल्पना केली आणि नंतर सामाजिक तंत्राप्रमाणे त्यांना आकार दिला असेही नाही. सामाजिक भावनांशी देवादिकांचा संबंध येण्याचे कारण असे की, ज्या ज्या वस्तूंचा उपयोग माणसे करीत त्या त्या वस्तूंशी ते संबद्ध होत चालले होते. शरीराने व मनाने ज्या ज्या गोष्टींचा माणसांना उपद्रव होई. त्यांच्या बद्दलही माणसांना विशिष्ट भावना उत्पन्न होत व त्यात ती गुंतत. या भावनांमुळे माणूस आपल्या समाजबांधवांशी जखडला गेला. एक समाज दुसऱ्या समाजाशी जोडला गेला. 'मानवी विकासक्रमात माणसाच्या या सामूहिक जीवनाचे विघटन झाले. यातुश्रद्धा संपुष्टात आली. सर्वांनी मिळून सामूहिकरित्या अमूक एक विधी केला, की त्यांचे अमूक प्रकारचे फळ प्राप्त होते. श्रद्धेवर आधारित कर्मकांडाची व आचारविधींची व्यूहरचना अस्तित्वात आली. ही व्यूहरचना म्हणजे 'लोकधर्म' होय, या 'लोकधर्माच्या आचरणासाठी देवदेवतांचे सण, उत्सव, विधी, व्रते अस्तित्वात आले. सर्व

समाजाच्या सहभागातून व सहकार्यातून लोकधर्माचे आचरण होऊ लागले. देवाधर्माविषयीचा सेवाभाव या धर्माचरणात प्रबळ झाला. विज्ञानयुगातल्या आजच्या प्रगत माणसाच्या धार्मिक वर्तनात आजही धर्माच्या या दोन्ही कल्पनांची सरमिसळ आढळून येते.

### १.८.२.२ लोकदैवत:

#### श्रद्धेतून विविध लोकदैवतांचा विकास:

समाजजीवन आणि लोकसंस्कृती यांच्या अन्योन्य संबंधातून लोकदैवत या संकल्पनेचा उदय झाला. लोकांच्या मनांत असलेल्या श्रद्धेतून विविध लोकदैवतांचा विकास झाला. संपूर्ण जगात विविध संस्कृतीत लोकदैवत ही संकल्पना पूजनीय मानली गेली आहे. लोकदैवत हे मूर्तीच्या रुपात पुजले जात असले तरी झाड, काठी, समुद्र, नदी, डोंगर, शिळा इत्यादी रुपात देखील लोकदैवतांचे स्वरुप दिसते. प्रामुख्याने लोकमानसाला निसर्गात घडणा-या घटनांचे कुतूहल होते. त्यातूनच निसर्गाला देवत्व देऊन निसर्ग पूजा सुरू झाली. देवत्व कल्पना हा लोकधर्म कल्पनेचा मूलाधार आहे. लोकमानसाचे निरीक्षण केले असता अनेक प्रकारच्या देवदेवता लोकसमाजात, लोकपरिसरात अस्तित्वात असलेल्या आढळतात. यात प्रामुख्याने ग्रामदेवता, कुलदेवता, क्षुद्रदेवता, पितृदेवता, स्त्रीदेवता, वृक्षदेवता, जलदेवता, शिवेच्या देवता, प्राणिदेवता अशा विविध प्रकारच्या देवतांचा समावेश आहे. आजही ग्रामपातळीवर मानवी देवतांचाही आढळ होतो.

#### सृष्ट वस्तूंना दैवतांचा दर्जा:

यासंदर्भात थॅामन्सन यांनी मांडलेली देवत्वाविषयीची संकल्पना अभ्यासणे महत्त्वाचे आहे. आदी मानव प्राथमिक पातळीवरील जीवन जगत असताना, 'आपल्या कामनापूर्तीसाठी ईश्वर अगर तत्सम शक्तींना शरण जात नाही. किंबहुना देव, प्रार्थना, यज्ञ असे काही त्याच्या आचारात नसतेच. आपल्या मंत्रसामर्थ्यावरच त्याची पूर्ण श्रद्धा असते. विधियुक्त मंत्रगायनाने इष्ट फलप्राप्ती झालीच पाहिजे यावरच त्याचा विश्वास असतो.' जसजसा मानव निसर्गाच्या सान्निध्यात जाऊ लागला तसतशी माणसाला देव या कल्पनेची ओळख होऊ लागली. सूर्य, चंद्र, आकाश, ग्रह, तारे, दिशा, वृक्ष, पर्वत, औषधी वनस्पती या सर्व सृष्ट वस्तूंना त्यामुळे दैवतांचा दर्जा माणसाने प्राप्त करून दिला. या सर्व वस्तूंच्या ठिकाणी मानवी विकार असतात असे तो मानू लागला.

The lowest Savages known to us have no Gods and know nothing of prayer or Sacrifice. Similarly, whenever we can penetrate the prehistory of Civilized people's we reach a level at which again there are no gods no prayer or sacrifice what we find at this level is magic.' हे थॅामसन यांचे देवत्वाविषयीचे विचार महत्त्वाचे ठरावेत.

संस्कृतीच्या प्राथमिक पातळीवरील माणसाविषयी थॅामसन म्हणतात की,

The savages is a man of action. Instead of asking a god to do what he wants done, he does it or tries to do if himself instead of prayers he utters or spells. In a world he practices Magic.

**मंत्रयुक्त विधी हीच देवता:**

लोकमानसाचा असा दृढ विश्वास होता, की विश्वातील प्रत्येक वस्तू ही पूजनीय असते. आपल्या जीवनावर प्रत्येक वस्तूचा प्रभाव पडतो. विश्वातील सर्व वस्तुमात्रांमध्ये एक यात्वात्मक सामर्थ्य (Magical Potence) आहे. त्याची वाढ विशिष्ट कर्मकांडांनी आणि मंत्रोच्चारांनी होते आणि मानवाच्या इच्छा पूर्ण करण्याकरिता या यात्वात्मक शक्तीला भाग पाडता येते. जारणमारण विद्येचा उपयोग करून आपल्याला ईप्सित साधता येते. या पातळीवरील कल्पनेत मंत्रयुक्त विधी हीच शक्ती देवता मानली गेली असावी. यात्वात्मक विधीच्या ठिकाणी स्वयंभू सामर्थ्य आहे. त्यामुळे देव म्हणून अशी काही शक्ती कल्पून अमूक एक गोष्ट आमच्यासाठी कर, असे त्या देवाला सांगण्यापेक्षा ते स्वतःच करण्याकडे प्राचीन माणसाची मानसिकता आढळते. देवासाठी प्रार्थना वगैरे करण्यापेक्षा मंत्रगान करणे आणि यातुवर विश्वास ठेवणे त्याला पटते. यातूनच लोकमानसातील मंत्रोच्चाराचे महत्त्व वाढले. मंत्रयुक्त विधी-विधाने हा लोकमानसाच्या जीवनातील अविभाज्य भाग बनला.

**ईश्वराचे श्रेष्ठत्व मान्य:**

मानव हा उत्क्रांतीवादी प्राणी आहे. निसर्गातील प्रत्येक घटित, अघटिताचा अर्थ लावण्याचा प्रयत्न मानवाने अगदी आदीम काळापासून केला आहे. सर्व वस्तुमात्रात एकच यातुशक्ती आहे, ही मानवाच्या होत असलेल्या मानसिक विकासामुळे मागे पडली. विश्वातील अदृश्य शक्ती म्हणजे करुणाघन, सगुण, साकार असा परमेश्वर आहे, हे मानवाने मान्य करायला सुरू केले. त्या करुणाघनाला प्रार्थनेने प्रसन्न करून घेता येते, अशी देवत्वविषयक कल्पना परिवर्तित होत गेली. विश्वावर नियंत्रण ठेवण्याचे आपले सामर्थ्य दुर्बल आहे याविषयीची माणसाची जाणीव वाढत गेली. साहजिकच आपल्याहून प्रबळ अशी शक्ती विश्वात आहे. आणि त्याच्या कृपेनेच आपले जीवन यशस्वी होते. ईश्वराचे श्रेष्ठत्व मानवाने मान्य केले. ईश्वराबद्दल जसा आदर वाढला; श्रद्धा वाढली तशीच त्याच्याविषयीची भीतीची भावनाही वाढली. देवदेवतांचा प्रकोप झाल्यास मानव असहाय, हतबल होऊ शकतो यांचे अनेक अनुभव लोकमानसाने घेतले.

**देवतांना वश करून इष्टफलप्राप्ती:**

लोकमानसाने अनुभवाच्या आणि श्रद्धेच्या जोरावर हे निश्चित केले, की आपल्या सर्व इच्छा-आकांक्षा पूर्ण करण्याचा हमखास मार्ग म्हणजे देवतांची पूजाअर्चा होय. देवतांना प्रसन्न करून; वश करून इष्टफलप्राप्ती मिळविता येते. देवता रोगनिवारण करू शकतात. इतकेच नव्हे तर या विश्वातील आपले अस्तित्व, संरक्षण आणि वंशसंवर्धन याच सर्वशक्तीमान देवतांच्या म्हणजेच ईश्वराच्या अधीन आहे, असे माणसाला वाटू लागले.

यातुश्रद्धावस्थेत सूर्य, चंद्र, आकाश, वृक्ष, प्राणी या सर्व वस्तू मानवाने एकाच पातळीवर मानल्या होत्या. सचेतन अचेतनात भेद केला नव्हता. परंतु देवत्वकल्पनेत परिवर्तन झाल्याबरोबर या सर्व वस्तूंना देवत्व प्राप्त झाले. सूर्यदेवता, चंद्रदेवता, आकाशदेवता, पर्जन्यदेवता, वृक्षदेवता, प्राणीदेवता, अन्नदेवता अशा विविध देवता निर्माण झाल्या. देवतांच्या ठिकाणी विश्वचक्रात हस्तक्षेप करण्याचे सामर्थ्य आहे हा समज रुढ झाला.

यातुविधीत भावनेला स्थान नव्हते. प्रभावी व अचूक मंत्रोच्चार आणि विधियुक्त कर्म यांनाच महत्त्व होते. धर्मकल्पनेत बदल झाला. यातुधर्म लोकधर्मात रूपांतरित झाला. लोकधर्मात भावना, नैतिकता यांना महत्त्व आले. लोकधर्मात पारलौकिकाचा विचार रुजू लागला. विधी हाच धर्म असतो आणि प्रत्येक विधीची एक देवता असते. धर्मविधीचे मूळ देवत्वकल्पनेत आहे असे गृहीत धरावे लागते हे रेग्लान लॉर्ड यांचे याबाबतचे मत लक्षणीय आहे. (दी ओरिजिन्स ऑव्ह रिलीजन)

सर जेम्स जॉर्ज फेजर यांनी विविध देशांत भिन्न भिन्न कालखंडात अस्तित्वात असलेल्या यातुविधी आणि धर्मविधी यांचे स्वरूप तपासले तेव्हा अनेक यातुविधी धर्मविधीच्या पातळीवर आले असल्याचे त्यांच्या लक्षात आले. ('गोल्डन बो', सर जेम्स जॉर्ज फेजर).

भारतीय दैवतशास्त्राचा विचार करू लागलो की, वैदिक दैवते नजरेसमोर येतात आणि यज्ञविधींशी त्यांचा संबंध दिसून येतो. यज्ञाचे स्वरूप केवळ यात्वात्मकच आहे. माणूस वन्यजीवी असो, ग्रामजीवी असो, शहरवासी असो धर्म हा विधींच्या स्वरूपातच त्याच्या आचरणात असतो. महाराष्ट्रीय समाजजीवनाचे अवलोकन केले असता लोकमानसाचे असे संमिश्र स्वरूप आजही पाहावयास मिळते. आजही आदिवासी पाड्यांवर अनेक मुले शिकलेली असूनही मृग नक्षत्रावर येणारा पाऊस थोडा लांबला की पाऊस मागण्याचा विधी करून 'कामड' नृत्य करतात. कुटुंबाची वृद्धी व्हावी, धनधान्य विपुल प्राप्त व्हावे, आपल्या वस्तीला सुखशांती लाभावी या हेतूने आजही धान्यपूजा संपन्न होते. गावशिवेच्या देवतांच्या तुष्ट्यर्थ आजही कोकणात दशावतारी व नमन खेळ संपन्न होतात. विवाहानंतर संतती प्राप्त व्हावी म्हणून कुलदेवतेचा गोंधळ, जागरण केले जाते. 'बढण', 'हुईक' सारखे विधी मराठवाड्यात त्याच श्रद्धेने केले जातात. गावात रोगराईचा प्रादुर्भाव झाला आणि रोगराई आटोक्यात येत नाही असे आढळताच मरीआईच्या नावे टोपली उतरण्याचा विधी पार पडतो.

लोकदैवतांचे प्रकार व त्यांचे लोकसमूहजीवनातील महत्त्व यांचा परिचय करून घेऊ.

**अ. ग्रामदेवता:**

संपूर्ण गावाचे दैवत म्हणजे ग्राम दैवत होय. भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. आपल्या देशात ग्राम संस्थेला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक ग्रामाचे संरक्षक दैवत असते हेच ग्राम दैवत म्हणून ओळखले जाते. भारतात आर्यांच्या वसाहती होण्यापूर्वीपासून भारतातील मूळ रहिवासी ग्रामदेवतांची पूजाअर्चा करत असावेत. वैदिक देवता सात्विक आणि राजस आहेत तर ग्राम देवता तामस आणि उग्र आहेत. ग्राम देवतांची मंदिरे आणि मूर्त्या देखील ओबडधोबड, राकट आणि काळपट असतात. त्यांचा नैवेद्य सुद्धा पंचपक्वान्नांचा नसून बळी दिलेला कोंबडा, बकरा इ. असतात. प्रत्येक ग्रामदेवतेच्या नावामागे किंवा तिच्या निर्मितीमागे एक तरी आख्यायिका किंवा दंतकथा अस्तित्वात असते.

ग्रामदैवतांत जरी, मरी, म्हसोबा, जोतिबा कोकणातील रवळनाथ, सातेरी, भूमका, विदर्भातील आसरा, सुपोबा, शिवाभाया, भैरोबा (भैरव, बहिरोबा) पश्चिम महाराष्ट्रातील खामजाई, सोनजाई, मांढरदेवी, पांढरदेवी, काली, मातृका, दक्षिण भारतातील पेडुम्मा, पोलेरम्मा किंवा महाराष्ट्रातील इतर ठिकाणी आढळणारे मुंजा, वेताळ (आग्या व रुद्र) ही

ग्रामदैवते विशेष प्रसिद्ध आहेत. मातृदेवता ही सृजनाची देवता मानल्याने भारतात बहुतांश ग्रामदेवता स्त्रीरुपी आहेत.

गावातील वनस्पतीसृष्टीचे संरक्षण व संवर्धन करणे, संसर्गजन्य रोगांचे निवारण करणे, भूताखेतांपासून नैसर्गिक आपत्तीपासून गावाचे रक्षण करणे, ग्रामवासीयांचे संततीसंवर्धन करणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, अशी अनेक प्रकारची कार्ये या देवता करतात अशी समजूत आहे.

ग्रामदेवतांच्या पूजा, त्यांचे उत्सव, त्यांच्या यात्रा ठरावीक तिथींना होतात. या पूजनाप्रीत्यर्थ अनेक प्रकारचे कलाप्रकार सादर होतात. हे कलाप्रकारही या ग्रामदेवतांच्या भक्तीची साधने असतात. देवतेच्या भक्तीची लोकगीते, लोककथा, देवतेच्या सामर्थ्याच्या कथा असलेली लोकनाटके यांचा यात समावेश असतो.

ग्रामदेवतांची कृपा असेल तर रोगराई, दुष्काळादी नैसर्गिक आपत्ती येत नाहीत. तसेच धनधान्याची विपुलता होऊन सर्वांचे कल्याण होते, अशी भाबडी पण ठाम समजूत ग्रामीण जनतेत आहे. ग्रामदैवते ही तामस प्रवृत्तीची व शीघ्रकोपी आहेत, त्यांचा कोप झाला तर सर्वांनाच पीडा होते, असे समजले जाते. गावावर विघ्न, रोगराई किंवा नैसर्गिक आपत्ती येऊ नये, म्हणून ह्या ग्रामदैवतांना नवस बोलतात व तो फेडतात. दरवर्षी जत्रा-उत्सवादी करून त्यांना संतुष्ट करतात. ग्रामदैवतांपुढे पशू-पक्ष्यांचे बळी देण्यात येतात.

ग्रामदैवतांना लोक वेगवेगळ्या उद्दिष्टांनी नवस बोलतात व फेडतात. नवस बोलण्यात अघोरी व आत्मक्लेशपर प्रकारही असतात. उदा. विस्तवावरून चालत जाणे, साष्टांग नमस्कार किंवा लोळण घेत दैवतासमोर जाणे, स्वतःच्या केसास बांधून रथ ओढणे किंवा ‘बगाड’ घेणे इ. नवस ह्या दैवतांना बोलले जातात व फेडले जातात. संकटनिवारण, रोगनिवारण, पुत्रप्राप्ती, विवाह, पर्जन्यवृष्टी इ. हेतूंनी हे नवस बोलले जातात.

### ब. कुलदेवता:

आपल्या कुळाची देवता म्हणजे कुलदेवता होय. कुल आणि देवता या दोन शब्दांना मिळवून ‘कुलदेवता’ हा शब्द बनला आहे. कोणत्याही कुळाचा उद्धार, कुळाची आध्यात्मिक प्रगती, कुळाचे सातत्य इ. बाबींची परिपूर्ती करण्यासाठी कुलदेवतेची उपासना करणे लोकमानसाने मान्य केले आहे. कुळाचे पूर्वज ज्या ठिकाणी पूर्वापार वास्तव्यास होते, त्या प्रदेशातील देवता प्रामुख्याने त्या त्या कुळाची कुलदेवता असते. वर्षातून एकदा आपल्या कुलदेवतेचे दर्शन घ्यावे, असे लोकमानस सांगते. घरात होणा-या कोणत्याही मंगलकार्यासाठी कुलदेवतेस पाचारण करावे लागते, ही लोकपरंपरा आहे.

### क. वृक्षदेवता:

पुराण काळापासून आंबा, अश्वत्थ-पिंपळ, वड, तुळस, उंबर अशा अनेक झाडाझुडपांना लोकमानसाने देवता मानून त्यांची पूजा व आराधना केली आहे. वन्यजमाती तर अनादी काळापासून वनदेवतांची आणि वृक्षदेवतांची मनोभावे पूजा करत आहेत. कारण त्यांच्या मते, प्रत्येक वृक्ष सचेतन असतो आणि त्यात आत्मा वास करत असतो. लोकमानस वृक्षराजीकडे एका वेगळ्या सकारात्मक दृष्टीने पहात आला आहे. वृक्षात असलेल्या

आत्म्याची आराधना भक्ती-भावाने केल्यास इच्छित फलप्राप्ती होते, ही प्राचीन माणसाची धारणा होती.

वेदपूर्वकालीन संस्कृतीपासून निर्मीतीचे प्रतीक मानलेल्या अश्वत्थ वृक्षाला संतती प्राप्तीसाठी मनोभावे पूजले जाते. कोणत्याही धार्मिक कार्यात आणि धर्म विधींमध्ये आंब्याची पाच पाने असलेल्या डहाळीला, पानांना महत्त्वाचे स्थान असते. उंबर वृक्ष देववृक्ष मानला जातो, तर तुळस भारतीय संस्कृतीत मानाची ठरली आहे.

या देवतांबरोबर वनदेवता,जलदेवता लोकपरंपरेत पूजनीय आहेत.

## १.८.३ ‘लोकतत्त्व’ आणि ‘लोकसंस्कृती’

### १.८.३.१ 'लोकतत्त्व':

लोकजीवनाशी, लोकव्यवहारांशी संबंधित कृती-उक्ती म्हणजे लोकतत्त्वे होय. लोकमानसाचे अस्तित्व ज्या तत्त्वांनी दृग्गोचर होते, त्या तत्त्वांना लोकतत्त्वे म्हणणे सहेतुक वाटते. कोणतेही साहित्य लोकजीवनाशी कितपत निगडित आहे, हे ठरविण्यासाठी त्या साहित्यात किती लोकतत्त्वे प्रतिबिंबीत झाली आहेत याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते. प्राचीन साहित्यात लोकतत्त्वे मोठ्या प्रमाणात सापडतात कारण तत्कालीन साहित्यनिर्मिती ही समूह भावनेतून झालेली असे. आपण लोकसाहित्याचा अभ्यास करतो म्हणून एक गोष्ट आवर्जून लक्षात घ्यायला हवी की, लोकतत्त्वांमुळे लोकसाहित्य हे लौकिक साहित्याहून वेगळे ठरते. तात्पर्य- “लोकतत्त्वांचा आणि लोकसमूहाचा अगदी जवळचा संबंध आहे.” लोकतत्त्वे म्हणजे समाजामध्ये रुढी, परंपरेप्रमाणे काही तत्त्वे ठरलेली असतात. समाजातील प्रत्येक घटक निमूटपणे ती तत्त्वे मान्य करून जगत असतो, यालाच ‘लोकतत्त्व’ असे म्हणतात. लोकतत्त्वाची सदर व्याख्या प्रा. डॉ. धोंडीराम वाडकर यांनी केली आहे. प्रा.धोंडीराम वाडकर यांनी अगदी स्पष्टपणे नमूद केले आहे, की लोकतत्त्वांचा स्वीकार संपूर्ण समाजाकडून केला जातो. समाजाच्या भावभावनांचा आधार लोकतत्त्व आहे.

**लोकतत्त्व म्हणजे काय?:**

डॉ. रा. चिं. ढेरे यांनी 'लोकसाहित्य' या संकल्पनेला पर्याय म्हणून सर्वप्रथम 'लोकतत्त्व' ही संज्ञा वापरली. 'पुरातत्त्व' ही संज्ञा जशी पुराणवस्तुसंशोधनशास्त्रासाठी सर्रास रूढ झालेली आहे, तशीच 'लोकतत्त्व' ही संज्ञाही रूढ व्हायला हरकत नाही, असे डॉ. ढेरे यांचे प्रतिपादन आहे. वस्तुत: 'लोकसाहित्य' ही संज्ञा 'folklore’चा मराठी पर्याय माणून अभ्यासकांनी स्वीकारलेली आहे. त्यामुळे लोकसाहित्यासाठी पुन्हा 'लोकतत्त्व' अशी संज्ञा वापरणे प्रस्तुत वाटत नाही. 'folklore’चा मराठी अर्थ जरी 'लोकविद्या' असला तरी लोकविषयक आणि लोकप्रचलित बाबींच्या अभ्यासाचे शास्त्र या अर्थाने लोकसाहित्य हा तिचा मराठी पर्याय रास्त वाटतो.

**१) सामूहिकता:**

लोकसाहित्य हा लोकमानसाचा आविष्कार आहे. लोकसाहित्याची निर्मिती समूहाकडून केली जाते. लोकसाहित्याचा कर्ता अनामिक असतो. लोकसाहित्याची निर्मिती एका

व्यक्तीची नसते. एका व्यक्तीने निर्माण केलेल्या वाङ्मयकृतीत त्याच्या व्यक्तिमनाचा आविष्कार होतो. त्यामुळे अशी वाङ्मयकृती ललित वा लौकिक वाङ्मयकृती ठरते. व्यक्तिनिष्ठ वाङ्मयात लोकमानसाचा आविष्कार संभवत नाही. लोकसाहित्याचे आवाहन समूहाला असते. ते कुणा एका व्यक्तीला किंवा व्यक्तिगत भावनांना नसते. साहजिकच लोकसाहित्यातील एखाद्या कृतीची निर्मिती जरी एका व्यक्तीकडून झालेली असली तरी त्या व्यक्तीचे मन समूहाशी वा लोकमनाशी एकरूप झालेले असते. त्यामुळे एका व्यक्तीने निर्माण केलेल्या या रचनेत त्याच्या व्यक्तिमनाचा आविष्कार होत नाही. ती निर्मिती ‘व्यक्तित्वहीन व्यक्तिमना'ची निर्मिती ठरते. कोणत्याही एका व्यक्तीला या निर्मितीचे श्रेय देता येत नाही. सामूहिकता हे महत्त्वाचे लोकतत्त्व आहे.

**२) व्यक्तित्वहीनता:**

आपण वर म्हटल्याप्रमाणे लोकसमूहातील एखादी व्यक्ती आपल्या वैयक्तिक भावभावनांचा आविष्कार निश्चितपणे करू शकत असेल. त्यात त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब उमटलेले असते, समूहमनाचे प्रतिबिंब संभवत नाही. व्यक्ती स्वतःला समाजापासून वेगळे काढून स्वतःचे म्हणून निराळे असे भावविश्व, एखाद्या गीतात वा कथेत व्यक्त करीतही असेल, परंतु त्याचे हे वेगळे व्यक्तिमत्त्व, समस्या समाजात विरघळून जात असल्यामुळे गीतात वा कथेत आढळणारी आत्मनिष्ठ भावना ही व्यक्तित्वहीन व्यक्तिमनाची होते. ती सार्वत्रिक स्वरूपच घेते.

**३) परिवर्तनशीलता:**

परिवर्तन हा माणसाचा स्थायी भाव आहे. माणसाच्या आचार-विचारात, त्याच्या वृत्ती-प्रवृतीत कालानुरूप बदल होत असतात. लोकमानसाचे प्रतिध्वनी असणारे लोकसाहित्य हे परिवर्तन स्वीकारते. बदलत्या परिस्थितीत सतत परिवर्तन पावत जाणे हे लोकसाहित्यातील महत्त्वाचे लोकतत्त्व मानायला हवे. प्रतिभावंताच्या निर्मितीचा स्वभाव देखील परिवर्तन पावत जाण्याचा असतो. परिवर्तनशीलतेला त्या त्या काळातील प्रतिभावंत हातभार लावत असतात. म्हणजे एखादी कथा, एखादे गीत एखादा माणूस रचतो. दुसरा त्यात आणखी भर घालतो. एखादे गीत वारंवार विधी, उत्सवात परंपरेने म्हटले जात असते. पण काळ बदलत जातो तस तसे त्या गीतातील संदर्भही बदलत जातात. त्यात नवी भर पडत जाते. वसई परिसरात लग्नसराईत गायल्या जाणाऱ्या गीतात पूर्वी 'चूल', चुलीत पेटणारी लाकडे यांचे संदर्भ येत. नंतरच्या काळात चुली ऐवजी शेगडी आली. नंतर स्टोव्ह आला. त्यानंतर गॅसशेगडी आली.

वसईतून मुंबईत पाने, फुले, भाजी, दूध घेऊन विक्रीला जाणाऱ्या पतीदेवांना उद्देशून म्हटल्या जाणाऱ्या पारंपरिक गीतात बदल होत गेले. नऊवारी साडी आणायला सांगणारी स्त्री पाचवारी पातळ आण म्हणायला लागली. कालांतराने ड्रेस आणायला सांगू लागली. सामाजिक परिस्थितीत व भौतिक संस्कृतीत जे बदल झाले त्याचे प्रतिबिंब लोकवाङ्मयातही उमटले. या तत्त्वामुळेच लोकसाहित्य हे केवळ 'काल'चे नसते. ते नेहमीच 'आज'चे होत असते.

### ४) गूढता:

लोकमानस रहस्याने भरलेले आहे. लोकजीवनातील अनेक गूढ रहस्य उलगडण्यात लोकमानस नेहमीच व्यस्त असते. मानवाच्या सभोवताली असणाऱ्या निसर्गाने देखील अनेक रहस्य आपल्या पेटाऱ्यात लपवून ठेवली आहेत. लोकमानसाने या सगळ्या गूढ रहस्यांची उकल करण्याचा प्रयत्न कधी थेट तर कधी आडमार्गाने केलेला दिसून येतो. लोकमानसाने या गूढतेचा आढावा लोकसाहित्यातून घेतला नसता तर नवलच! लोकसाहित्यात सतत गूढ शक्तींचा उल्लेख येतो. अद्भुत शक्ती सतत माणसांच्या अवतीभवती वावरत असतात. त्यांच्या मदतीला येत असतात. त्यामुळे लोकसाहित्यात गूढरम्य वातावरण निर्माण होत असते. जादूच्या कथा या गूढतेतूनच जन्मल्या. 'अलादीनचा जादूचा दिवा', 'जादूचा अंगरखा', 'जादूची छडी' इत्यादी. तसेच पाण्याखाली राज्य असणे, माणसे आकाश मार्गे गमन करू शकणे, माणसाला गुप्त करू शकणाऱ्या अद्भुत वस्तू असणे, इत्यादी. काही कथांतून मोत्यांच्या माळेचा संदर्भ येतो. ती गळ्यात घातली असता माणूस गुप्त होतो. 'सिंहासन बत्तीशी'त राजा विक्रमाच्या मंतरलेल्या खडावा वर्णिलेल्या आहेत.

### ५) स्वप्न हेच सत्य मानणे:

मुळातच माणूस हा स्वप्नात जगत असतो. तो स्वप्नाळू प्राणी आहे. त्याला स्वप्न पाहायला आणि स्वप्नात रमायला फार आवडते. पर्यायाने लोकसाहित्यात स्वप्नतत्त्व वारंवार आढळते. राजा हरिश्चंद्र आणि तारामती यांच्या कथेत स्वप्नाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. जे स्वप्नात दिले ते वास्तवातही देणे क्रमप्राप्त ठरते. जे स्वप्नात आहे ते प्रत्यक्ष वास्तवातच आहे असे मानले गेले.

## १.८.३.२ लोकसंस्कृती:

### संस्कृती म्हणजे काय?:

लोकसंस्कृती ही संकल्पना लक्षात घेण्यापूर्वी आपण 'संस्कृती'चा थोडक्यात परिचय करून घेऊ.

जगप्रसिद्ध मानववंश शास्त्रज्ञ आणि संस्कृतीच्या गाढ्या अभ्यासक व संशोधक इरावती कर्वे यांच्या मते, संस्कृती म्हणजे, 'मनुष्य समाजाचे डोळ्यांसाठी दिसणारी भौतिक वस्तूरुप निर्मिती व डोळ्यांसाठी न दिसणारी पण विचारांना आकलन होणारी मनोमय सृष्टी म्हणजे संस्कृती होय.' इरावती कर्वे यांच्या मते, 'संस्कृती नेहमी परंपरागत असते. ती दिक्काल निर्बंधित अशी असते.' संस्कृती संपूर्णपणे समाजाची असते परंतु ती व्यक्तींमधून आकारास येते; जिवंत होते; नव्याने निर्माण होते; लय पावते. संस्कृती ही कोणत्याही माणसाची जीवनशैली बनते. संस्कृती संपूर्ण मानवी समाजाला व्यापून टाकते. ती समाजाच्या जाणिवेत आणि नेणिवेत असते.

### लोकसंस्कृती: लोकसाहित्याचा मूलाधार:

लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा अत्यंत निकटचा संबंध असतो. लोकसंस्कृती हा लोकसाहित्याचा मूलाधार आहे. लोकसाहित्य हे लोकजीवनाशी निगडित असते.

लोकजीवन हे नेहमीच लोकसंस्कृतीशी नाते सांगते. म्हणजे लोकसाहित्य हे लोकजीवनाशी लोकसंस्कृतीशी निगडित असते. सामूहिक पातळीवर वावरणाऱ्या धारणा, सामाजिक व्यवहार, रूढी, परंपरा, प्रथा या साऱ्या गोष्टींचा समावेश संस्कृतीत होतो. आपले विचार, प्रयोजन, जीवन मूल्य या सर्व गोष्टींचा समावेश संस्कृतीत होतो. लोकसाहित्याच्या अभ्यासकांनी लोकसाहित्याला लोकसंस्कृतीचा आविष्कार म्हटले आहे. कारण लोकसाहित्याचा विचार त्यातील लोक या संकल्पनेशिवाय करताच येत नाही. लोकांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीची नोंद लोकसाहित्यात घेतली जाते. एखाद्या समाजाची जगण्याची रीत म्हणजे संस्कृती श्रद्धा, प्रेम, आदर, वात्सल्य, परोपकार होय. ही संस्कृतीची मूल्ये आहेत. जीवनाच्या या भावनात्मक अंगाचा विचार लोकसाहित्यात केला जातो. लोकसाहित्य व लोकसंस्कृती या दोन संकल्पना व त्यांचे परस्पर संबंध लक्षात घेणे क्रमप्राप्त ठरते. कोणत्याही समूहाच्या गरजांपैकी अन्न, वस्त्र, निवारा व वंश सातत्य या शारीरिक गरजा आहेत. कला आणि साहित्य या लोकांच्या मनाच्या अर्थात भावनिक गरजा आहेत. लोकमानसाच्या या भावनिक गरजा सांस्कृतिक लोकाविष्कारातून पूर्ण होतात. लोकाविष्काराची समग्रता हे लोकसाहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

**लोकसंस्कृती एक सार्वकालिक प्रक्रिया:**

कोणत्याही भूप्रदेशात राहणारा व कोणत्याही समाजाचे प्रतिनिधित्व करणारा मनुष्य हा संस्कृती निर्माण करणारा प्राणी आहे, असे मानले जाते. भौतिक वा अध्यात्मपर संस्कृती ही मानवाची स्वतःची निर्मिती आहे. या जगात संस्कृतीविहीन मानव, अशी कल्पना करताच येत नाही. मनुष्य हा बुद्धिजीवी प्राणी असल्यामुळे बुद्धिमत्तेच्या जोरावर तो जीवनाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो. तो आपल्या जीवनाला एक निश्चित आकार देतो. असा आकार देत असताना त्याच्या कृती-उक्तीतून कळत नकळत संस्कृती निर्माण होते. ही संस्कृती मानवी व्यक्तित्व आणि जीवन यांना समृद्धता देते. ती चिंतन आणि कलात्मक सृजनाची निर्मिती असते. मानवी मूल्यांना अधिष्ठान प्राप्त करून देण्याचे काम संस्कृती करते. लोकसंस्कृती अभ्यासक टायलर या अभ्यासकाच्या मते 'ज्ञान, विश्वास, कला, आचार, विधी, रिती आणि जिच्यात अनेक गोष्टी सामावून घेण्याची कला असते ती संस्कृती होय.' परंपरेकडून स्वीकारलेले संचित, अनुभव व मानसिक आणि क्रियात्मक व्यवहार या सर्वांचा समावेश संस्कृतीत होतो. संस्कृतीमध्ये वंश परंपरेने आलेले कल्पित वास्तव, वस्तू, तंत्रकौशल्य, रूढी, धारणा, ज्ञान आणि मूल्यांचा अंतर्भाव होतो. लोकसंस्कृती मानवाच्या सर्व इच्छा-आकांक्षा सामावून घेणारी, सर्व रुढी-परंपरांना सन्मान देणारी, मानवी जीवनाच्या सर्व पैलूंना स्पर्श करणारी एक सर्वसमावेशक, सार्वत्रिक आणि सार्वकालिक प्रक्रिया आहे.

**लोकसंस्कृती: समाजसापेक्ष आणि परिवर्तनशील:**

'संस्कारपूर्ण व संस्कारमय जीवन जगण्याची देशकाल विशिष्ट रिती, जीवन पद्धती व जीवन मूल्य म्हणजे संस्कृती होय.' संस्कृतीची ही व्याख्या डॉ. कर्वे यांनी केली आहे. संस्कृती संकल्पना बदलती असते. ती स्थिर नसते. संस्कृती ही संकल्पना स्थल, काल आणि समाजसापेक्ष आहे. याविषयी सविस्तर विवेचन करताना डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात, 'संस्कृती ही मानवी जीवनाला व्यापून राहिलेली गोष्ट आहे. या संस्कृतीद्वारे मानव आपल्या भोवतालच्या सर्व घटकांशी समायोजन करत असतो. सभोवतालच्या काही गोष्टींचा

अंगीकार करून नव्या संस्कृतीची तो जडणघडण करतो. संस्कृती ही प्रक्रिया अखंडपणे सुरू असते. कदाचित त्याला आपण नव्या संस्कृतीचा स्वीकार करत आहोत, याची जाणीव होत नसेल. जेव्हा तो भिन्न संस्कृतीच्या संपर्कात येतो तेव्हा त्याच्या लक्षात येते, की आपण बदलत्या काळाबरोबर खूप बदलून गेलो आहोत. संस्कृती ही एक व्यापक संकल्पना आहे.' संस्कृती ही समूहानुरूप बदलते. ती मानवी जीवनाला व्यापून टाकणारी संकल्पना आहे. समूहाच्या पातळीवर ती एकच एक असत नाही तर तिचे स्वरूप भिन्न असते. ती सतत बदलणारी प्रकिया आहे अशा या संस्कृतीच्या सांस्कृतिक जीवनाची कल्पना लोकसाहित्यातून येते.

**लोकसंस्कृती: नागर संस्कृतीची प्रयोगशाळा:**

वैदिक काळापासून अ-नागर संस्कृतीला 'लोकसंस्कृती' मानण्याचा समज रुढ आहे. लोकसाहित्याच्या अभ्यासक तारा भवाळकर म्हणतात, 'ग्रामीण जीवनशैलीचा मुख्य कणा निसर्ग आणि कृषीसंस्कृती हाच राहिल्याने त्या आधारेच ग्रामीण स्थिर समूहांची भौगोलिकतेनुसार वेगवेगळी जीवनशैली आकारत गेली. लोकसंस्कृतीत विविधता आली. पुढे हीच नागर संस्कृतीशी संबंध न आलेली अ-नागर संस्कृती लोकसंस्कृती म्हणून ओळखली जाते. लोकसंस्कृतीबद्दल डॉ. शरद व्यवहारे म्हणतात, लोकसंस्कृतीच्या प्रवाहात अनेक अंत:प्रवाह सहजपणे मिसळलेले आहेत. कृषीवलांची जीवनधारा, भटक्या लोकसमूहाची जीवनधारा, पारंपरिक लोकसंस्थांचे जीवन विशेष, ग्रामरचनेतील पारंपरिक व्यवसायांची जीवनधारा, मौखिक वाङ्मयाचा अंत:प्रवाह त्याचप्रमाणे लोककला इत्यादी अंत:प्रवाह लोकसंस्कृतीत आपले वेगळेपण आणि रंग मिसळून प्रवाहीत राहिले आहेत.

लोकसाहित्य हे समूह मनाच्या भाव-भावनांची व विचारांची अभिव्यक्ती असते. त्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसाहित्यात बदलत्या जीवनधारणांमध्येही टिकून राहण्याची प्रवृत्ती असते. एखादा लोकसमूह त्यांचे पारंपरिक व सांस्कृतिक विशेष यांचे जतन करतो. सांस्कृतिक, पारंपरिक विशेषांच्या आधारेच लोकसाहित्य, लोकसंस्कृतीचे दर्शन घडविते म्हणूनच ते लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे एक महत्त्वाचे साधन बनते. लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे शब्दरूप आहे, ही जाणीव ठेवून लोकसाहित्याचा अभ्यास आता विशेषत्वाने होऊ लागला आहे. लोकसंस्कृती प्रकृतीशी अधिक संबंध राहून वाढणारी संस्कृती असते. ती नागर संस्कृतीच्याही अधिक निकट नांदणारी संस्कृती असते. नागर संस्कृती ही लोकसंस्कृतीतील अनेक लोकप्रिय गोष्टींवर आपल्या विशेषांचे संस्कार करून त्यांना आपल्यात सामावून घेण्याची धडपड करत असते. लोकसंस्कृती आणि नागर संस्कृती अशा उभयविध संस्कृतींची देवाणघेवाण सतत चालू असते. त्यांचे शब्दरूप म्हणजे लोकसाहित्य. म्हणूनच रा. चिं. ढेरे यांनी "लोकसंस्कृतीचे उपासक" या पुस्तकात "लोकसंस्कृती ही नागर संस्कृतीची प्रयोगशाळा आहे," असे म्हटले आहे.

**लोकसाहित्य हेच लोकसंस्कृतीचे सर्वस्व:**

लोकसंस्कृतीशी लोकसाहित्याचा इतका घनिष्ठ संबंध आहे की जन्मापासून मृत्यूपर्यंतचे जीवन संस्कार, सण-उत्सव, यात्रा-जत्रा, कला-क्रिडा, देव-धर्म या लोकजीवनाच्या सर्व

अंगोपांगांशी त्याचा अंगभूत असा संबंध असतो. लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे सर्वस्व आहे. लोकसाहित्य हे लोकजीवनाला समग्रपणे गवसणी घालणारे असल्यामुळे त्यात लोकांच्या भाव-भावना, इच्छा-आकांक्षा, सुख-दुःखे, श्रद्धा-धारणा, राग-द्वेश, आचार-विचार अनावृत्त स्वरूपात व्यक्त होत असतात. भारतीय संस्कृतीच्या पूजकांनी लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे प्रमुख गमक मानले आहे. अर्थात येथे लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा सहसंबंध लक्षात घेत असताना एक गोष्ट आवर्जून लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे लोकसाहित्यातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असले तरी लोकसाहित्य म्हणजे लोकसंस्कृती नव्हे लोकसाहित्याशिवाय इतरही अनेक आविष्कारातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडत असते.

रा. चिं. ढेरे यांच्या मते, ‘लोकसाहित्य आणि लोकाचार हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाचे प्राथमिक व प्रमुख साधन आहे. लोकधर्माचे, लोकसंस्कृतीचे अभ्यासक डॉ.वासुदेवशरण अग्रवाल यांनी ‘लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचा सहसंबंध तपासत असताना लोकसाहित्याची व्याख्या, व्यापकता स्पष्ट केली आहे. त्यांच्या मते, “लोकवार्ता एक जिवीत शास्त्र हैं। लोग का जितना जीवन हैं उतना ही लोकवार्ता का विस्तार है। लोक के बनानेवाला जन, जन की भूमी और भौतिक जीवन तथा तिसरे स्थान में उस जन की संस्कृती इन तीनों क्षेत्रो में लोकके पूरे ज्ञान का अंतर्भाव होता हैं और लोकवार्ता का संबंध भी उनीके साथ हैं।”

प्रस्तुत सर्व विवेचनावरून हे आपल्या लक्षात येते, की लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीचे एक अंग आहे. लोकसंस्कृतीच्या अभ्यासाचे ते एक साधन आहे. लोकसाहित्य आणि लोकसंस्कृती यांचे एकास एक नाते आहे. लोकसंस्कृतीच्या प्रदीर्घ व्यवहाराचे ते दर्शन घडविते यात शंका नाही.

## १.८.४ लोकवाङ्मय

जे जे वाणीने युक्त असते त्याला वाङ्मय असे म्हणतात. लिखित स्वरूपातील शब्दबद्ध आविष्कार म्हणजे साहित्य होय. याचा अर्थ लोकवाङ्मय हा लोकसाहित्याचा मौखिक शब्दाविष्कार आहे, असे म्हणता येईल. लोकवाङ्मय ही लोकसाहित्याची मौखिक परंपरा आहे. लोकसाहित्यातील महत्त्वपूर्ण आविष्कार म्हणजे लोकवाङ्मय होय. सर अलेक्झांडर क्राप यांनी लोकगीत, लोककथा, लोकनाट्य, लोकोक्ती, म्हणी, उखाणे-पाखाणे, कोडी इ. लोकाविष्कारांना लोकवाङ्मय ही संकल्पना वापरली आहे. लोकमानसाच्या भावभावना, रुढीपरंपरा, आचारविचार, सणसमारंभ, जीवनजाणिवा, धार्मिक रितीरिवाज, लोकसंस्कृती इ. गोष्टी लोकवाङ्मयात प्रगट होतात. अगदी सहज आणि उस्फूर्तपणे अत्यंत गतिमान असणा-या लोकजीवनाला गवसणी घालण्याचे अफाट सामर्थ्य लोकवाङ्मयात असते.

**लोकवाङ्मयाचा विशाल परिसर:**

संपूर्ण लोकजीवनाला आपल्या कवेत घेणा-या लोकवाङ्मयाचा परिसर विशाल आणि बहुरंगी आहे. कोणत्याही भाषेतील व कोणत्याही लोकसंस्कृतीतील लोकवाङ्मय हे ‘गीतरुप’, ’कथारुप’ आणि ‘संवादरुप’ असे अभिव्यक्तीच्या पातळीवर तीन प्रकारात विभागलेले

असते. 'गीतरूप' लोकवाङ्मयात विविध लोकगीतांचा समावेश होतो. उदा. विधीगीते, पुरुषांची गीते, स्त्रियांची गीते, फुगडी गीते, श्रमगीते, बडबडगीते, सणवारांची गीते इ. गीतांचा यात समावेश होतो. लोककथा, दंतकथा, परिकथा, दैवत कथा, आख्याने इ. यांचा समावेश 'कथारुप' लोकवाङ्मयात होतो. मंत्र, लोकजागर, म्हणी, उखाणे, चुटके, लोकनाट्य इ. लोकाविष्कारांचा अंतर्भाव 'संवादरूप' लोकवाङ्मयात होतो.

**लोकवाङ्मय आणि लौकिकवाङ्मय:**

लोकसाहित्य विशारद यांच्या मते, 'अभिजात ललितसाहित्य आणि लोकसाहित्य यांना जोडणारा दुवा म्हणजे लौकिक साहित्य होय.' लौकिकगीतांचा संबंध लोकजीवनाशी कवीकृतीपेक्षा अधिक येत असल्यामुळे लोकगीते आणि लौकिकगीते यांच्यात नेहमी देवघेव चालू असते, असे प्रतिपादन देखील त्यांनी केले आहे. लौकिकगीतात कवीच्या नाममुद्रा असल्या तरी लोकजीवनातील संकेतव्यवस्था असलेल्या सर्व रचनांचा समावेश लोकवाङ्मयात करणे उचित ठरते. लोकवाङ्मय आणि लौकिकवाङ्मय यातील भेद आपण इथे पाहू.

१. लोकवाङ्मय ही समूहाची निर्मिती असते. त्याचा कर्ता अनामिक असतो. लौकिक साहित्य ज्ञात कर्त्याची व्यक्तीनिष्ठ निर्मिती असते.

२. लोकवाङ्मय हे मौखिक परंपरा असलेले निरक्षर समूहाचे वाङ्मय आहे. लौकिक साहित्यात देखील लोकपरंपरा असली तरी ते साक्षर व शिष्ट समाजाचे व्यक्तीनिर्मित साहित्य आहे.

३. लोकवाङ्मयाचा लोकपरंपरेशी व लोकजीवनीशी घनिष्ट संबंध असतो. लौकिक साहित्याचा संबंध लोकजीवनाशी असतोच असे नाही.

४. लोकवाङ्मयातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लौकिक साहित्यात लोकसंस्कृती नावापुरतीच असते.

**लोकवाङ्मयाचे स्वरूप:**

१. व्यक्तिमन समूहात विलीन झाल्यानंतर लोकवाङ्मयाची निर्मिती होते म्हणून लोकवाङ्मय समूहमनाची निर्मिती असते.

२. लोकवाङ्मय मौखिक परंपरेने चालत आलेले असते.

३. लोकवाङ्मय लोकजीवनाचा आविष्कार आहे. लोकवाङ्मयात लोकजीवनाची अंग-प्रत्यंग दृग्गोचर होत असतात. लोकजीवनातील अनेक घटना-प्रसंगांचे संदर्भ लोकवाङ्मयात शोधता येतात. एखाद्या विशिष्ट काळातील सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, भौगोलिक अगदी राजकीय देखील परिस्थितीचा अभ्यास लोकवाङ्मयाच्या आधाराने करता येतो.

४. समूहजीवनातून निर्माण होणारे लोकवाङ्मय समूहजीवनाला आवाहन करण्यासाठी अत्यंत उपयुक्त ठरते.

५. लोकवाङ्मयातून लोकसंस्कृतीचा आविष्कार होत असतो. लोकवाङ्मयातून लोकसंस्कृतीचे दर्शन घडते. लोकसंस्कृती प्रवाही करण्यासाठी, एका पिढीकडून दुस-या पिढीकडे सोपविण्यासाठी व समृद्ध व संपन्न करण्यासाठी लोकवाङ्मय हातभार लावीत असते.

६. लोकवाङ्मय ही विशिष्ट काळात निर्माण झालेली निर्मिती असूनही ती कालमानपरत्वे नित्यनूतन होत असते. लोकवाङ्मय ही वर्तमान काळाचीच प्रतिकृती वाटत असते. लोकवाङ्मय लोकजीवनाचे आणि लोकसंस्कृतीचे संचित अक्षरधन असून त्यात भूतकालीन लोकजीवनाचे संदर्भ शोधता येतात. पण म्हणून काही लोकवाङ्मय, लोकसंस्कृतीचे केवळ भूतकालीन 'अवशेष' ठरत नाही.

७. लोकवाङ्मय लोकभाषेची निर्मिती असते आणि ती अनेक लोकशास्त्रांशी संबंध राखते.

८. विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक विधी इत्यादीशी लोकवाङ्मय संबंधित असते.

९. लोकवाङ्मयाचे स्वरूप प्रयोगसिद्ध कलेसारखे असते. लोकनाट्य, लोककथा, लोककथागीते, आख्याने लोकसमूहासमोर सादर होत असतात.

१०. लोकवाङ्मय लोकसंकेतांना धरून असते.

११. लोकवाङ्मयाचा आविष्कार लोकभाषेचा असल्याने त्यात नेहमीच्या जीवनाचा उत्साह (vigour) जोश आणि ताजेपणा प्रकट होत असतो.

१२. लोकवाङ्मय हे समाजजीवनाचे सार्थ रूप असते.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न: तुमच्या प्रदेशातील कोणत्याही एका लोककथेचे किंवा लोकगीताचे स्वरूप व वैशिष्ट्य स्पष्ट करा.**

## १.९ सारांश

एकूणच लोकसाहित्य म्हणजे काय, त्याच्या व्याख्या, निर्मितीप्रेरणा, संकेतव्यवस्था तसेच लोकसाहित्यातील विविध संकल्पनांचा विचार सदरील घटकामध्ये आपण केला. या स्वरूपातून लोकसाहित्य हे मानवी जीवनाशी अनेक अंगानी समरस झाल्याचे लक्षात येते. मानवाच्या जन्मापासून ते त्याच्या मृत्यूपर्यंत अनेक टप्प्यावर लोकसाहित्य कार्यरत असलेले दिसते. मानवी संस्कृतीचा परिपाक म्हणजेच लोकसाहित्य ठरते. हा संस्कृतीचा ठेवा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे मौखिक आणि अलिखित स्वरूपात हस्तांतरित होत असतो. त्यामुळेच लोकसाहित्याचे अस्तित्व आधुनिक युगातही जाणवते. लोकसाहित्यातील विशिष्ट कलाकृती, विशिष्ट प्रदेशाची भाषा, पेहराव, संकेत, परंपरा यांचे प्रतिनिधित्व करत असते. आणि म्हणूनच लोकसाहित्य हे मानवी जीवनाचा अविभाज्य घटक ठरते.

## १.१० पूरक वाचनासाठी संदर्भ

१. ‘लोकसाहित्य : उद्‌गम आणि विकास’- शरद व्यवहारे

२. ‘लोकसंस्कृतीचे उपासक’ - रा. चिं. ढेरे

३. ‘भारतीय रंगभूमीच्या शोधात’ - रा. चिं. ढेरे

४. ‘संत, लोक आणि अभिजन’ - रा. चिं. ढेरे

## १.११ संदर्भग्रंथ

१. ‘मौखिकता आणि लोकसाहित्य’ - संपादक- मधुकर वाकोडे/सुषमा करोगल (साहित्य अकादेमी)

२. ‘लोकरंगभूमी’ (परंपरा, स्वरुप आणि भवितव्य) – डॉ. प्रभाकर मांडे (मधुराज पब्लिकेशन्स)

३. ‘लोकसाहित्य: बदलते संदर्भ - बदलती रुपे’ – डॉ. गंगाधर मोरजे (पद्मगंधा प्रकाशन)

४. ‘लोकसाहित्याचे अंतरंग’ – डॉ. रमेश कुबल (शब्दालय प्रकाशन)

५. ‘सामवेदी बोलभाषा लोकसाहित्य’ - रे. फा. फ्रान्सिस कोरिया (सप्तर्षी प्रकाशन)

६. ‘पश्चिम खानदेशातील आदिवासी लोकसाहित्य’ – प्रा. डॉ. पुष्पा यशवंत गावीत (प्रशांत पब्लिकेशन्स)

७. ‘लोकसंस्कृतीचे प्रातिभा दर्शन’ - संपादन- अरुणा ढेरे / वर्षा गजेंद्रगडकर (पद्मगंधा प्रकाशन)

८. ‘पालघर जिल्हा: लोकजीवन व लोकसाहित्य’ - भगवान रजपूत (अर्थव पब्लिकेशन्स)

९. 'लोकसाहित्यशास्त्र : संस्कृतीदर्शन' – डॉ. बापूराव देसाई (नवल प्रकाशन)

१०. 'मराठी लोककथा' – संपादक-मधुकर वाकोडे (साहित्य अकादमी)

११. 'लोकसाहित्य : सिद्धांत आणि रचनाप्रकारबंध' – डॉ.गंगाधर मोरजे (पद्मगंधा प्रकाशन)

१२. 'कोकणातील लोककथा' - सूर्यकांत आजगावकर (शब्दालय प्रकाशन)

## १.१२ संभाव्य प्रश्न

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) लोकसाहित्य म्हणजे काय व त्याची लक्षणे सांगा.

२) लोकसाहित्याच्या काही व्याख्या सांगून लोकसंस्कृती म्हणजे काय ते सांगा.

३) लोकसाहित्याची संकेत व्यवस्था सांगून लोकतत्त्वे म्हणजे काय ते स्पष्ट करा.

**ब) टीपा द्या.**

१) लोकसाहित्य निर्मिती प्रेरणा

२) लोकमानस

३) लोकसाहित्यातील संकेतव्यवस्था

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) folklore या इंग्रजी शब्दाचा मराठी अर्थ काय आहे?

२) 'बढण', 'हुईक' सारखे विधी महाराष्ट्रातील कोणत्या भागात केले जातात?

३) ब्रूनो नेटल यांनी लोकगीत निर्मितीसंबंधी काय म्हटले आहे?

*****

# २

# लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

**घटक रचना**:

२.१ उद्देश

२.२ प्रास्ताविक

२.३ लोकसाहित्याच्या अभ्यासाचा ऐतिहासिक आढावा

२.४ लोकसाहित्याचे संप्रदाय

 २.४.१ भाषाशास्त्रीय संप्रदाय

 २.४.२ निसर्गरूपवादी संप्रदाय

 २.४.३ भ्रांतकल्पनावादी संप्रदाय (Euhemerist School)

 २.४.४ स्पष्टीकरणवादी संप्रदाय (हेतुकथावादी)

 २.४.५ संप्रसरणवादी संप्रदाय

 २.४.६ उत्तरजीवित्ववादी किंवा अवशेषवादी संप्रदाय (Survival Theory)

 २.४.७ विसरणवादी संप्रदाय (Diffusionist Theory)

 २.४.८ ऐतिहासिक - भौगोलिक संप्रदाय

 २.४.९ मानवशास्त्रीय संप्रदाय (Psychaological School)

२.५ लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

 २.५.१ कार्यान्वयी अभ्यासपद्धती

 २.५.२ ध्येयनिष्ठ अभ्यासपद्धती

 २.५.३ विचारप्रणालीपर अभ्यासपद्धती

 २.५.४ संदर्भान्वयी अभ्यासपद्धती

 २.५.५ संरचनात्मक अभ्यासपद्धती

 २.५.६ वर्णनात्मक अभ्यासपद्धती

 २.५.७ तुलनात्मक अभ्यासपद्धती

 २.५.८ मौखिक आविष्कार सूत्रपद्धती

२.६ लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतीचे महत्त्व

२.७ सारांश

२.८ संदर्भग्रंथसूची

२.९ नमुना प्रश्न

लोकसाहित्य ही एका विशिष्ट लोकसमूहाची मालमत्ता नसून ती अखिल मानव जातीचे जीवन दर्शन आहे. त्यामुळे लोकसाहित्य कोणत्याही देशाचे असो, त्याचा अभ्यास हा समन्वय पद्धतीने करता येतो. काळ जसा बदलत जातो, तसतसे लोकसाहित्याच्या

स्वरूपात परिवर्तन होत गेलेले दिसते. त्यामुळे लोकसाहित्य हे जुनेही नसते व नवेही नसते. ते सतत आपली आविष्कार रूपे बदलत असते. म्हणून लोकसाहित्याचा अभ्यास म्हणजे बदलत्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनाचा आणि संस्कृतीच्या अभिसरणाचा अभ्यास आहे. लोकसाहित्य नेहमी वर्तमान काळी असते.

## २.१ उद्देश

१. लोकसाहित्याच्या अभ्यासाचा इतिहास कथन करणे.

२. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे संप्रदायाचे स्वरुप थोडक्यात स्पष्ट करणे.

३. संप्रदायांच्या अभ्यासपद्धती विशद करणे.

४. आधुनिक काळातील लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतीची माहिती करुन देणे.

५. लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतीचे महत्त्व स्पष्ट करणे.

## २.२ प्रास्ताविक

एकोणीसाव्या शतकात लोकसाहित्याची प्रतिष्ठित अभ्यासामध्ये गणना होऊ लागली आहे. युरोपातील नामांकित अभ्यासकांनी लोकसाहित्याच्या सामग्रीचे स्वरुप स्पष्ट करणे, त्यामागील सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ लक्षात घेऊन त्यांचे वर्गीकरण करुन विश्लेषण, अर्थनिर्णयन करणे, लोकसाहित्याच्या प्रेरणा, परंपरा यांचा शोध घेणे हे या अभ्यासात महत्त्वाचे असते.

लोकजीवनाचे वास्तविक रुप समजून घ्यावयाचे असेल तर लोकसाहित्य हे खात्रीशीर साधन आहे. लोकसाहित्यामध्ये भावनिक आविष्कार असला तरी त्यातून प्रकट होणारे वास्तव हे खरे असते. म्हणून समाजजीवन समजून, उमजून घेण्यासाठी लोकसाहित्य उपयोगी ठरते. तसेच एखाद्या देशाचा सामाजिक, राजकीय, धार्मिक, ऐतिहासिक, भौगोलिक इतिहास समजून घेण्यासाठी लोकसाहित्याचा अभ्यास हा उपयुक्त ठरतो.

साहित्याच्या अभ्यासामध्ये साहित्यपरंपरा, साहित्यप्रकार, साहित्य स्वरूप आदींचे आकलन करून घेताना लोकसाहित्य फायदेशीर ठरु शकते. मानवी जीवन संपन्न बनविणे आणि साहित्य समृद्ध करण्याचे सामर्थ्य लोकसाहित्यामध्ये असल्याने लोकसाहित्याच्या अभ्यासाला खूप महत्त्व आहे.

महाराष्ट्रात लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात फारच उशिरा झाली. सुरुवातीला हा अभ्यास संकलनाच्या पातळीवर होता. गेल्या तीन दशकांपासून विद्यापीठीय पातळीवर लोकसाहित्याच्या अध्ययनाला सुरुवात झालेली दिसून येते. त्यामुळे शास्त्र म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाची जुनी, समृद्ध परंपरा महाराष्ट्रात नव्हती.

## २.३ लोकसाहित्याच्या अभ्यासाचा ऐतिहासिक आढावा

भारतात लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरुवात १९व्या शतकात इंग्रजांची सत्ता स्थिरस्थावर झाल्यानंतरच झाली. इंग्रज अधिकाऱ्यांप्रमाणे ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भारतीय लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या अभ्यासाला प्रारंभ केला.

कर्नल जेम्स टॉड याने १८२९ मध्ये “अनॉल्स अँड ॲन्टिक्विटीज ऑफ राज्यस्थान" या नावाचा ग्रंथ प्रकाशित करुन त्यात राज्यस्थानचा इतिहास, रुढी, परंपरा, वेषभूषा असा सांस्कृतिक अभ्यास मांडला. तसेच तिथल्या लोककथा, लोकगीते, पोवाडे यांचा आपल्या लेखनात उपयोग करुन घेतला. तर मिस मेरी फियर यांनी दक्षिण भारतातील लोककथांचा “ओल्ड डेक्कन डेज” या नावाने ग्रंथ प्रकाशित केला. सन १८७२ साली डाल्टन याने “डिसक्रिप्टिव्ह ॲथोलॉजी ऑफ बेंगॉल” या ग्रंथात विविध जाती-जमातीची माहिती संकलित केली होती. लाल बिहारी डे यांनी बंगालमधील लोकगीते, दंतकथा, यांचे संकलन करुन ते पुस्तकरुपाने प्रसिद्ध केले. ‘रिचर्ड टेम्पल याने’ ‘लेजंडस् ऑफ पंजाब’ हा पंजाबमधील कथागीतांचा संग्रह १८८४ मध्ये प्रसिद्ध केला. तर सर जॉर्ज ग्रियर्सन यांनी ‘लिग्विस्टीक सर्व्हे ऑफ इंडिया’ ह्या ग्रंथात लोकसाहित्याचा भाषाशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला. सन १८८४ साली विल्यम क्रुक यांनी ‘नॉर्थ इंडियन नोटस् अँड क्युरिज’ नावाच्या नियतकालिकातून लोककथा आणि लोकगीते प्रकाशित केली. तसेच १८९६ मध्ये ‘पॉप्युलर रिलीजन अँड फोकलोर ऑफ नॉर्थन इंडिया’ हा ग्रंथ प्रकाशित करुन त्यात रितीरिवाज, देवदेवता, भुतेखेते आदी गोष्टींचे सविस्तर विवेचन केले. क्रुकच्या प्रेरणेने रामगरीब चौबे यांनी उत्तरप्रदेशातील लोकगीतांचा संग्रह प्रसिद्ध केला.

लोकसाहित्याच्या अभ्यासाला १९२० नंतर एक नवे वळण प्राप्त झाले. बंगालमध्ये दिनेशचंद्र सेन, बिहारमधील रामचंद्रराय, उत्तरप्रदेशात पंडित रामनरेश त्रिपाठी, गुजरातमध्ये झंवरचंद मेघाणी, देवेंद्र सत्यार्थी, वासुदेव शरण अग्रवाल यांनी लोकसाहित्याचा केलेला अभ्यास महत्त्वपूर्ण आहे.

महाराष्ट्रात १८७७ साली लोकसाहित्याच्या अभ्यासाला चालना मिळाली. राजारामशास्त्री भागवत, विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी लोकगीते, लोककथा या विषयांवर चर्चात्मक लेख लिहिले. वा. गो. आपटे यांनी १९०७ साठी “अदभूत कथा” यावर लेख लिहिला. १९२४ एन्थोबेन यांनी लिहिलेल्या “फोकलोर ऑफ बॉम्बे” या ग्रंथाचे गो. वि. कालेलकर यांनी १९३४ साली भाषांतर केले.

काका कालेलकर, वामन चोरघडे, कमलाबाई देशपांडे यांनी लोकगीतांचे संकलन व विवेचनात्मक लेखन केले. लोककथा, लोकगीत यांचा चिकित्सक आढावा घेणारे वामन चोरघडे यांचे “साहित्याचे मूलधन” हे पुस्तक १९३८ मध्ये प्रसिद्ध झाले. तर ‘घाटावरील लोकगीतांचे अपौरुषेय वाङ्मय’ हे कमालाबाई देशपांडे यांचे पुस्तक १९४४ साली प्रकाशित झाले. तसेच ना. रा. शेंडे व ना. गो. नांदापूरकर यांनी लोकसाहित्याची तात्त्विक व विवेचनात्मक मांडणी केली.

वि. का. राजवाडे यांनी १९२० साली 'सज्जनगडचे लोकगीत' हा लेख व १९२५ साली 'सूर्यनारायणाची कहाणी व सूर्यव्रत' हा लेख लिहून लोकगीत व लोककथा या प्रकारांची वैशिष्ट्ये स्पष्ट केली आहेत.

सामाजिक इतिहास, परंपरा, संस्कृती जाणून घेण्यासाठी लोकसाहित्याच्या संकलनाचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात झालेले दिसून येतात. तसेच चित्रमय जगत, शाळापत्रक, पारिजात, सह्याद्री, सत्यकथा, साहित्य, नवयुग, यशवंत, धनुर्धारी, मौज, अभिरुची अशा नियतकालिकांतून लोककथा, लोकगीते या संदर्भातील लेख प्रसिद्ध झालेले आहेत. महाराष्ट्र लोकसाहित्य समितीने लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या दृष्टीने चर्चा-सभांचे आयोजन, ग्रंथसंपादन असे भरीव कार्य केलेले आहे.

दुर्गा भागवत यांनी सन १९५६ साली "लोकसाहित्याची रुपरेखा" हा ग्रंथ प्रकाशित करुन लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ केला. त्यात अनेक बाबींचे तर्कशुद्ध विश्लेषण केले. त्यानंतर रा. चिं. ढेरे यांनी लोकसाहित्याचा शास्त्रशुद्ध अभ्यास केलेला आहे. 'लोकसंस्कृतीची क्षितिजे', 'लोकसंस्कृतीचे उपासक', 'लोकसाहित्य : काही अनुबंध' असे मौलिक ग्रंथलेखन केले आहे.

डॉ. प्रभाकर मांडे यांनी 'लोकरंगभूमी', 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह' असे ग्रंथलेखन करून त्यांनी लोकसाहित्याच्या अभ्यासात भर टाकलेली आहे.

भारतातील आणि महाराष्ट्रातील अभ्यासकांनी लोकसाहित्याचा जो अभ्यास केला आहे त्याचा धावता आढावा आपण इथे घेतला. या अभ्यासाबरोबर पाश्चात्त्य अभ्यासकांनी लोकसाहित्याचा अभ्यास केलेला आहे. त्याचाही आढावा इथे घेणे प्रस्तुत ठरेल.

युरोप अमेरिकेत विद्यापीठीय स्तरावर लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ होण्यापूर्वी सांस्कृतिक मानवशास्त्राचा एक भाग म्हणून लोकसाहित्याच्या अभ्यासाला प्रारंभ झालेला होता.

लोकसाहित्याचा एक स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून सगळ्यात आधी युरोपीय देशात लोकसाहित्याला मान्यता मिळाली. प्रा. एन्. के. चिडविक यांनी "साहित्यातील अनेक काव्यरुपांचा उगम आणि विकास लोकसाहित्यातून झाला" असे प्रतिपादन 'दी ग्रोथ ऑफ लिटरेचर' या ग्रंथातून मांडलेला आहे. १८व्या शतकात युरोपातील तत्त्ववेत्यांचे लक्ष लोकसाहित्याने वेधून घेतले. परंपरेच्या दृष्टीने आपण अधिक प्राचीन आहोत हे सिद्ध करण्यासाठी पुरावशेषांचा संग्रह करण्यास सुरुवात केली. त्यामुळे लोकसाहित्याची सामुग्री गोळा होऊ लागली.

लोकसाहित्याची सामुग्री गोळा करण्याचे श्रेय जेकब ग्रीम (१७८५-१८६३) विल्हेम ग्रीम (१७८६-१८५६) या जर्मन बंधूकडे जाते. त्यांनी जर्मन लोकगीते, लोककथा यांचा संग्रह गोळा केला तसेच जर्मन भाषा, धर्मगाथा यांचाही अभ्यास केला. त्यांचे संशोधन सार्वजनिक स्वरुपात लोकांना वाचण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात आले. प्राचीन धर्मग्रंथांचे मूळही लोककथांमध्ये आहे. समान सांस्कृतिक परिस्थितीत उगम पावल्याने वेगवेगळ्या प्रदेशात सापडणाऱ्या लोककथांमध्ये समानता दिसते, असे विचार ग्रीम बंधूंनी मांडले. त्यानंतर

जर्मनीच्या रिचर्ड वॅागनर, फ्रान्सच्या एफ. मायकेल, इटलीच्या निकाले तोमासियो यांनी लोकसाहित्याच्या सामुग्री संकलनाकडे अधिक लक्ष दिले.

इंग्लडमध्ये १८६६ साली फोकलोर सोसायटीची स्थापना झाल्याने लोकसाहित्य विषयक सामग्रीच्या अभ्यासाचे केंद्र निर्माण झाले. १९व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपचा अन्य राष्ट्रांशी संपर्क आल्याने आदिम जाती-जमातीच्या मौखिक, तौलनिक अभ्यासाची कल्पना पुढे आली. यातून लोकसाहित्याच्या विविध अभ्यासपद्धती निर्माण होऊ लागल्या.

युरोपीय लोकसाहित्याच्या अभ्यासाचा काळ म्हणजे इ.स. १८७० ते १९९० हा होय. या काळात लोकसाहित्याच्या संदर्भात महत्त्वपूर्ण काम झाले. सन १८६१ साली लंडनमध्ये आंतरराष्ट्रीय लोकसाहित्य परिषद भरली होती. तर १८८८ साली अमेरिकन फोकलोर सोसायटीची स्थापना झाली. १९व्या शतकातील ॲन्ड्र्यू लँग, जेम्स फ्रेझर, एडवर्ड बी टायलर यांनी केलेले कार्य हे उल्लेखनीय आहे. समाज आणि संस्कृतीच्या संदर्भात त्यांनी लोकसाहित्याचा केलेला अभ्यास हा महत्त्वाचा आहे. टायलर यांचे 'प्रिमिटिव्ह कल्चर' हे पुस्तक त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. फ्रेझर यांचा 'दी गोल्डन बारु' हा ग्रंथ मौलिक स्वरुपाचा आहे. मॅक्सम्युलरने तर ग्रीक आणि भारतीय दैवतकथांचा तौलनिक अभ्यास करुन सूर्यसिद्धान्त मांडला. तर जॉर्ज कॉक्सने 'द मायथॉलॉजी ऑफ आर्यन नेशन' यात धर्मशास्त्राचा तुलनात्मक अभ्यास मांडला आहे. तर जर्मन मनोविश्लेषण तज्ज्ञ विल्यम वुंट यांनी फोक सायकॉलॉजीमध्ये केलेले संशोधन अतिशय महत्त्वपूर्ण आहे. मानसशास्त्र अभ्यासक फ्रॉईड व युंग यांनी स्वप्नसिद्धांताची मांडणी करुन लोकसाहित्य अभ्यासाला नवे वळण दिले.

ऐतिहासिक दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाची सुरूवात ही 'थिओडोरे बेनफे' याने केली. पंचतंत्रातील गोष्टींचा जर्मन भाषेत अनुवाद केला व लोककथेची जन्मभूमी भारतच आहे, असे सांगणारा 'भारतमूलक सिद्धान्त' १८५६ मध्ये मांडला. पाश्चात्त्यांनी केलेला लोकसाहित्याचा अभ्यास धर्मगाथा, लोकविश्वास, आचार-विचार यांचा संग्रह करुन त्याचा अभ्यास करण्यावर भर दिलेला होता. तुलनेत लोकगीते, म्हणी इत्यादी शाब्द सामुग्रीकडे दुर्लक्ष केलेले दिसून येते.

आतापर्यंत आपण भारत, महाराष्ट्र आणि पाश्चात्त्य देशात झालेल्या लोकसाहित्याच्या अभ्यासाचा ऐतिहासिक अंगानी संक्षिप्त आढावा घेतला आहे.

## २.४ लोकसाहित्याचे संप्रदाय

प्रारंभीच्या काळात लोकसाहित्याचा अभ्यास करणारे हे लोकसाहित्याचे अभ्यासक नव्हते तर ते वेगवेगळ्या सामाजिक शास्त्रांचे अभ्यासक होते. त्यांनी आपल्या दृष्टिकोणानुसार अभ्यास करुन सिद्धान्त मांडले. त्यांनी जे सिद्धान्तन केले होते त्यातून लोकसाहित्याच्या अभ्यासाचे वेगवेगळे संप्रदाय निर्माण झाले. त्याचे स्वरुप समजावून घेऊ.

### २.४.१.भाषाशास्त्रीय संप्रदाय:

सामान्यत: १८१२ ते १८७१ ह्या काळात लोकसाहित्याचा अभ्यास करणारे हे बहुतेक भाषाशास्त्रज्ञ होते. त्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासावर भाषाशास्त्रीय अभ्यासाचा प्रभाव

असलेला दिसून येतो. या संप्रदायाची उभारणी आर्यन, मिसरी, फीट, कोल्टिक व टयूटॅनिक या जुन्या जगातल्या मानववंशावरती झालेली आहे.

भाषाशास्त्रीय संप्रदायातील सर्वांत प्रमुख व आर्यन सिद्धान्ताला प्रेरक ठरलेले मॅक्सम्यूलरचे नाव प्रसिद्ध असले तरी त्याची सुरुवात ग्रीम बंधुंपासून होते. जेकब ग्रीम व विल्येम ग्रीम यांनी जर्मन मायथॉलॉजीचा अभ्यास केला. ग्रीम नंतर ब्रेल, कुहन, मॅक्सम्युलर डासेन्ट व कॉक्स अशी अभ्यास परंपरा आहे. तौलनिक भाषाशास्त्राच्या आधारे तौलनिक काव्यशास्त्रापर्यंतचे कार्यक्षेत्र या संप्रदायाने व्यापले होते. साऱ्या दैवतकथा एका ठिकाणी निर्माण झाल्या आहेत. त्यांचा आत्मा सूर्यकथा होय, असे भाषाशास्त्रीय संप्रदायाच्या प्रतिपादनाचे सार आहे. भाषाशास्त्रीय संप्रदायाचा प्रभाव १८५९ पर्यंत टिकून होता.

### २.४.२. निसर्गरुपवादी संप्रदाय:

भाषाशास्त्रीय संप्रदायाने दैवतकथेत आढळणाऱ्या निसर्गातील घडामोडींच्या आधाराने झालेल्या प्रतीकरुप चित्रणाला अधिक महत्त्व दिले. त्यातूनच निसर्गरुपवादी संप्रदाय आकारास आला. मॅक्सम्युलरने दंतकथांचे निदान करुन लोककथांकडे बघण्याचे दोन पर्याय सांगितले होते. त्यातला दुसरा पर्याय म्हणजे निसर्गरुपवाद. हा मॅक्सम्यूलरला व इतरांना प्रतीत झाला होता. दैवतकथांत निसर्गदृश्यांचीच विविध प्रतीके असतात, या विधानावरच या संप्रदायची उभारणी झाली होती.

निसर्गातील वास्तव घटनांच्या आधाराने आध्यात्मिक रुपकांची मांडणी दैवतकथेत केलेली असते असे निसर्गरुपवादी मानतात. निसर्गात घडणाऱ्या घटनांच्या कारणांचा उलगडा न झाल्याने त्यांनी निसर्गालाच देव मानले. वैदिक वाङ्मयातील दैवतकथांमध्ये रुपकात्मक चित्रण असते. म्हणून वृत्र म्हणजे मेघ, सरमा म्हणजे वाऱ्याची झुळूक, अदिती म्हणजे आकाश, पावसाळा म्हणजे इंद्रवृत्रांचे युद्ध असे निसर्गवाद्यांना वाटते. निसर्गरुपवादी संप्रदायाचे जनकत्व हे मॅक्समूल्यरला दिले जाते. त्यानेच दैवतकथांमध्ये रुपकांची रेलचेल असते असे विचारसूत्र मांडले आहे.

### २.४.३. भ्रांतकल्पनावादी संप्रदाय (Euhemerist School):

बानियर आणि लांप्रिअर हे भ्रांतवादी संप्रदायाचे पुरस्कर्ते आहेत. भ्रांतकल्पनावादी संप्रदायात अवास्तव कल्पनेला सर्वात जास्त महत्त्व दिले गेले आहे. भ्रांतकल्पनावादी संप्रदायाचे असे म्हणणे आहे की, दैवतकथा म्हणजेच अवास्तव किंवा भ्रांत कल्पनेचा (Fantasy) ऐतिहासिक सत्याशी झालेला मिलाफ होय. या ऐतिहासिक सत्याचा शोध घेण्यावर ते लक्ष केंद्रित करतात.

ऐतिहासिक पुरुषांना कल्पनेच्या साहाय्याने देवत्व बहाल केले जाते. त्यातून मिथ्स् किंवा दैवतकथा निर्माण होतात, असा भ्रांतकल्पनावाद्यांचा दावा आहे. उदा. इंद्राला ऋषींनी देव करणे.

जेम्स फ्रेझरच्या मते, मिथ्स् या विश्र्व व मानव यांच्या उत्पत्तिकथा असतात. त्या विश्वातील शक्तींचा, ईश्वराचा शोध घेण्यासाठी जन्मतात. तसेच महनीय व्यक्तींच्या कथा ही मिथ्स् बनतात. उदा. परशुराम, राम, कृष्ण. इ.

पुराणकथा ही भ्रांतकल्पनेतून जन्मलेली असते. तिच्यात वास्तव व कल्पित असते. पुराणकथा म्हणजे अवास्तव किंवा भ्रांत कल्पनेचा ऐतिहासिक सत्याशी मिलाफ असतो. या पुराणकथेभोवतीचे भ्रामक, अद्भुततेचे अवगुंठन दूर केले की त्यातील ऐतिहासिक सत्य हाती लागते, म्हणूनच पुराणकथेतील घटना दृश्यात्मक असल्या तरी त्यांच्या पाठीशी वास्तव जग असते असे भ्रांतकल्पनावादी मानतात.

### २.४.४. स्पष्टीकरणवादी संप्रदाय (हेतुकथावादी):

दैवतकथावादी लोकांनी, अभ्यासकांनी निसर्गातील घडामोडींचे प्रतीकात्मक चित्रण दैवत कथांमध्ये झालेले असते, अशी भूमिका मांडली. परंतु सर्व दैवतकथांचा अर्थ लावता येईना. त्यामुळे संप्रदायाची मर्यादा लक्षात आली. दैवतकथा या हेतूकथा असतात. त्यात कोणतातरी गर्भित हेतू असतो, असे त्यांना वाटू लागले. त्यातूनच हेतूकथावादी वा स्पष्टीकरणवादी संप्रदाय निर्माण झाला. दैवतकथांमध्ये कोणते तरी गूढ लपलेले असते. या गूढाचा, अनाकलनीयतेचा शोध घेताना असे लक्षात आले की, निसर्गातील कोणत्यातरी गोष्टीचे स्पष्टीकरण देण्यासाठी या कथा जन्माला आलेल्या असतात. त्या दृष्टीने शोध घेण्याचा प्रयत्न सुरु झाला. त्या अभ्यासाला हेतुकथावादी वा स्पष्टीकरणवादी संप्रदायाचे स्वरूप प्राप्त झाले. या संप्रदायाचा पुरस्कर्ता डाहनहार्डट याने स्पष्टीकरणात्मक कथांचे विवेचन करताना त्याचा स्पष्टीकरणाच्या कृतीतून उगम झाला आहे असे म्हटले आहे.

दुर्गा भागवत यांनी स्पष्टीकरणात्मक अंगाने उत्पत्तिकथांचा अभ्यास केला आहे. उदा. गाईचे वासरु जन्मत:च चपळ का असते याचे स्पष्टीकरण देणारी कथा लिहिली आहे.

स्पष्टीकरणवादी सिद्धान्त महत्त्वाचा असला तरी त्याला मर्यादा आहेत. कारण कोणत्याही कथेचे एकच एक स्पष्टीकरण नसते. स्थळ-काळ व व्यक्तीपरत्वे ही स्पष्टीकरणे बदलतात.

### २.४.५.संप्रसरणवादी संप्रदाय:

मानवशास्त्राचा पहिला पुरस्कर्ता म्हणजे ॲन्ड्र्यु लँग होय. ॲन्ड्र्यु लँग आणि एडवर्ड टायलरचा १८७१ साली ‘प्रिमिटिव्ह कल्चर’ हा ग्रंथ यादृष्टीने महत्त्वाचा आहे. या दोघांनी मानववंशशास्त्रीय दृष्टीने लोकसाहित्य सामुग्रीचा अभ्यास करुन निष्कर्ष काढले. जगातील अनेक जमाती, त्यांच्या जीवनप्रणाली, त्यांच्या रुढी, परंपरा, समजुती, विधी, लोककथा यात साधर्म्य आढळते. ते मानसिक एकतेमुळे निर्माण झालेले असते. मानवी संस्कृतीची बीजे आदिमानवाच्या संस्कृतीत आढळतात असे काही निष्कर्ष मांडले. तसेच समान मानसिक अवस्थेत दैवतकथा निर्माण झाल्याने जगभराच्या दैवतकथांमध्ये साम्य आढळते. ह्या ॲन्ड्र्यु लॅगच्या विचाराने दैवतकथांच्या अभ्यासाला नवी चालना मिळाली. इग्लंडमध्ये १८७८ साली फोकलोर सोसायटी स्थापन झाली. त्या संस्थेद्वारे लोकसाहित्याच्या मानवशास्त्रीय अभ्यासाला सुरुवात झाली.

### २.४.६ उत्तरजीवित्ववादी किंवा अवशेषवादी संप्रदाय (Survival Theory):

मानवशास्त्र संप्रदायाची मुख्य शाखा ही उत्तरजीवित्ववादी किंवा अवशेषवादी संप्रदायाची आहे. टायलर व लँग हे या संप्रदायाचे प्रवर्तक होते. अवशेष म्हणजे सर्व्हावल (**Survival**) परंपरेने चालत आलेले आणि अवशेष रुपात शिल्लक असलेले आदिम संस्कृतीचे विशेष

होय. टायलर व लँग यांनी रानटी लोकांच्या कथांचा (दैवतकथा) अभ्यास करुन असा निष्कर्ष काढला की, मूळच्या कथा रानटी लोकांत आढळतात आणि त्यांचेच अनुच्छेदित जिवंत अवशेष सुसंस्कृत लोकांच्या मागावून आलेल्या कथांत आढळून येतात. गतसंस्कृतीचे रुप आपणांसमोर साक्षात करण्याचे सामर्थ्य अवशेषात आढळते. लग्नात बाशिंग बांधणे, मामाचे महत्त्व हे आजही टिकून आहे. हे एकापरिने संस्कृतीचे अवशेष आहेत. 'टिकून राहण्याची' प्रवृत्ती जुन्या-नव्या कथांना व प्रथांना जोडणारी आहे.

टायलरने 'प्रिमिटिव्ह कल्चर' (Premitive culture) या ग्रंथात अवशेषांचा अभ्यास केला. त्यातूनच या अभ्यासाला चालना मिळाली. संस्कृती संक्रमणात आर्यांनी आदिमानवाकडून अनेक गोष्टी स्वीकारलेल्या असल्याने त्यांच्या कथेत वन्य लोकांच्या दैवतकथेतील अनेक अवशेष कसे दिसतात याचा अभ्यास अन्ड्रयू लँग यांनी केला.

संस्कृतीच्या बदलल्या टप्प्यावर काही गोष्टींची उपयोगिता संपली की, त्या गोष्टी टाकल्या जातात. पण काही गोष्टी अशा असतात की त्या दीर्घकाल टिकून राहतात. अवशेषवादी संप्रदायामुळे अशा प्रकारचा अभ्यास करणे शक्य होते.

### २.४.७ विसरणवादी संप्रदाय ( Diffusionist Theory):

विसरणवादी सिद्धान्ताचा परिपोष करणारा हा संप्रदाय मानवशास्त्रीय अभ्यासाचीच एक शाखा आहे. भौगोलिक परिसीमा आणि वांशिक संस्कृती यांना या सिद्धान्तात खूप महत्त्व आहे. जगभरातील वन्य संस्कृतीचे धागेदोरे प्रगल्भ राष्ट्राच्या संस्कृतीतही सापडतात. हे सत्य प्रस्थापित झाल्यानंतर वेगवेगळ्या सांस्कृतिक कल्पनांची व आचारांची प्रादेशिक विभागणी तपासण्यास सुरुवात झाली. प्रत्येक बाबींच्या संप्रसरणांचे अभ्यासक नकाशा काढू लागले. व कुठला तरी वन्य प्रदेश मध्यबिंदू कल्पून सांस्कृतिक आचार-विचारांचा फैलाव इतर प्रदेशात किती दूरवर गेलेला आहे याचा तपशील विद्वान घेऊ लागले. त्यामुळे या पद्धतीला विसरण पद्धती असे नाव देण्यात आले.

### २.४.८ ऐतिहासिक-भौगोलिक संप्रदाय:

ऐतिहासिक-भौगोलिक पद्धतीचा पहिला पुरस्कर्ता हा जे. क्रोन हा फिनिश लोकसाहित्य विशारद होता. त्याने १८८१ साली या पद्धतीचा उद्घोष केला. लोकसाहित्यातील लोककथांचा इतिहास व त्यांचे उगमस्थान निश्चित करण्यासाठी या पद्धतीचा उपयोग सुरू झाला. प्रत्येक लोककथेला स्वतंत्र इतिहास असतो. त्यामुळे या इतिहासाचा शोध घेणे आवश्यक असते. लोकसाहित्याच्या संहितांच्या आधाराने त्या सामुग्रीचा निर्मिती काळ आणि निर्मितीस्थळ शोधण्याचा प्रयत्न हा संप्रदाय करतो. म्हणून याला ऐतिहासिक भौगोलिक संप्रदाय म्हणतात.

लोककथेची विविध प्रारुपे (Model) हाती आल्यानंतर त्या आधाराने लोककथेची मूळ प्राचीनतम आद्य लोककथा निश्चित केली जाते. ती कथा म्हणजे कथेचे आद्यरुप, आदिबंध, (Arkitype) आर्कीटाईप असते. या आदिबंधाच्या आधारे लोककथेच्या जन्मकाळासंबंधी अनुमान केले जाते. तसेच मूळ आदिबंधाच्या आधारे नवे कल्पनाबंध कसे निर्माण झाले? कथेचे अंतरंग, बहिरंग कसे बदलत गेले? त्यात कोणकोणत्या गोष्टींची भर पडली? कथेचे चढउतार, प्रेरणा-प्रवृती अशा आधाराने लोककथेच्या प्रवासाची दिशा निश्चित केली जाते.

लोककथेच्या आदिबंधापर्यंत पोहोचण्याची ही शास्त्रीय पद्धती आहे. जे. क्रोन या अभ्यासकाने ही पद्धती मोडल्यानंतर बरोबर पन्नास वर्षांनी –१९३१ साली याच पद्धतीने पस्तीस कथांचे भौगोलिक उगमस्थान व ऐतिहासिक परिणती दाखविणारे लेखन प्रसिद्ध केले. या कथांना Type Tale किंवा मूळकथा म्हटले जाते.

लोककथेतील कल्पनाबंधाच्या विश्लेषणातून प्रमुख तत्त्वांचा शोध घेता येतो. या तत्त्वाच्या आधारे कल्पनाबंधातील बदलांचा, प्रमाणांचा विचार करुन रचनांचा आलेख काढता येतो. मूळ आदिबंध निश्चित करुन प्रमुख तत्त्वांची रचना निश्चित करता येते. आदिरूपाविषयी निष्कर्ष काढताना इतिहास, भूगोल यांच्या ज्ञानाचे साहाय्य घेता येते. त्यामुळे या पद्धतीला ऐतिहासिक-भौगोलिक अभ्यास पद्धती म्हणतात. या पद्धतीने कथा उगम, इतिहास यांचा शोध घेता येतो.

### २.४.९ मानसशास्त्रीय संप्रदाय (Psychaological School):

मानसशास्त्रज्ञ लोककथांचा अन्वय रुपकात पाहतात. पूर्वीच्या अभ्यासकांनी लोकसहित्यात सृष्टिव्यापार आणि निसर्गदृश्यांची प्रतीकं दिसत असल्याचे मांडले पण मानसशास्त्रज्ञांच्या मते प्रतीके ही निसर्गातील घडामोडींची नसून ती मानवांच्या शारीर व्यापाराची असतात. या शारीरिक प्रतीकांत लैंगिक प्रतीके उत्कटत्वाने आढळतात. त्याचा लोकसाहित्यात आविष्कार झालेला असतो. हा शोध मानवी मनाच्या संदर्भात घेतात. म्हणून या पद्धतीला मानसशास्त्रीय संप्रदाय असे संबोधले जाते.

सिग्मंड फॉईड याने सुप्त मनाची संकल्पना मांडली व त्या आधारे मनोव्यापाराचे विश्लेषण केले. त्याचा प्रभाव लोकसाहित्याच्या अभ्यासावर पडला. फ्रॉईडने लोककथा, लोकगीते यांच्या उत्पतीचा शोध स्वप्नांच्या स्पष्टीकरणाचा आधार घेऊन त्याच धर्तीवर लावता येईल असे प्रतिपादन केले.

फ्रॉईडप्रणीत Psycho-Analitical संप्रदायात अर्नेस्ट जोन्स, एफ. रिकलिन यांनी महत्त्वाची भर घातली. तसेच फ्रॉईडियन मनोविश्लेषणाच्या कार्ल अब्राहम याने स्वप्न आणि दैवतकथा यांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला. पुराणकथांमध्ये येणारी प्रतीके ही शारीरिक असतात हे स्पष्ट केले.

युंग या मनोविश्लेषणवाद्याने ही प्रतीकांची कल्पना मान्य केली. मिथ्स्, आदिप्रतिमा यांचे सैद्धांतिक विवेचन युंगने केले आहे. फ्रॉईडची ही मनोविश्लेषण पद्धती लोकसाहित्याच्या सर्व सामुग्रीला सरसकट लावणे अशक्य आहे. पण त्यामुळे काही घटकांचे नेमके विश्लेषण करणे शक्य आहे.

## २.५ लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती

आतापर्यंत लोकसाहित्याचा अभ्यास कुठे आणि कसा झाला, त्या अभ्यासातून नवेनवे अभ्यासाचे संप्रदास कसे निर्माण झाले? त्यांचे स्वरुप कसे आहे? याची आपण सविस्तर चर्चा केली. प्रत्येक संप्रदायाने आपली अभ्यासविषयक भूमिका मांडली. त्यात मतमतांतरे झाली. त्यामुळे लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या कक्षा रुंदावल्या. हे संप्रदाय म्हणजे लोकसाहित्याचे शास्त्र, लोकसाहित्यशास्त्र होय. त्यामुळे लोकसाहित्याला स्वतंत्र विषय

म्हणून मान्यता लाभली. विद्यापीठीय स्तरावर स्वतंत्र स्थान मिळल्याने लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या काही आधुनिक अभ्यासपद्धती निर्माण झाल्या.

### २.५.१ कार्यान्वयी अभ्यासपद्धती:

मानवी संस्कृतीत लोकसाहित्याचे स्थान काय? समाजाच्या दृष्टीने लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व काय? कोणत्या प्रयोजनामुळे लोकसाहित्य टिकून राहते? या विचारांतूनच कार्यान्वयी अभ्यासपद्धतीचा जन्म झाला. या अभ्यासपद्धतीचा खरा प्रणेता 'ब्रॅनिस्लो मॅलिनॉस्की' आहे. त्याने आपल्या 'मिथ्स् लॉं प्रिमिटिव्ह सायकॉलाजी' या ग्रंथात दैवतकथांचा कार्यान्वयी पद्धतीने अभ्यास केला आहे. कार्यान्वयी म्हणजे हेतुगर्भता, कार्याला चालना देण्याची शक्ती होय. जीवनाला दिशा देण्याचे कार्य दैवतकथा करतात. हेतुगर्भ भूमिकेतून लोककथा, लोकगीते, विधीकथा यांचा अभ्यास करता येतो असे मॅलिनॉस्कीने प्रतिपादन केले आहे.

लोकसाहित्य हे हेतुगर्भ असते. तसेच ते दैनंदिन व नैमित्तिक जीवनाला दिशा देण्याचे कार्य करते. असे कार्यान्वयी संप्रदायाचे अभ्यासक मानतात. समाजजीवनात प्रचलित असलेल्या रुढी, विधी व समाजाची भौतिक संस्कृती याचाही अभ्यास करता येतो. एकूणच लोकसाहित्याचा अभ्यास करताना अमूक एक लोकसाहित्य प्रकार आणि समाजजीवनात तो पार पाडीत असलेली भूमिका विचारात घेऊन अभ्यास करण्याची ही पद्धती बरीच प्रसिद्ध पावली. उदा. दशावतार व नमन-खेळे हे लोकनाट्य प्रकार घेऊन त्यांचा अभ्यास करावयाचा झाला तर या लोकनाट्य प्रकारांचे समाजजीवनात नेमके स्थान काय आहे? हे नाट्यप्रकार मानवी जीवनात कोणते कार्य करतात? हे सांगावे लागेल. त्यामुळे लोकसाहित्य व समाजजीवन यांचे विविधांगी संबंध लक्षात येतील. तसेच समाजजीवन व लोकसाहित्य प्रकार यांच्यातील देवघेव स्पष्ट होईल. तसेच या लोकनाट्य प्रकारांमुळे प्राप्त होणारी मूल्यदृष्टी, जीवनदृष्टी व त्या त्या समाजातील घटकांना समजून घेता येईल. समाजविकासातील ह्या लोकनाट्यांचा प्रत्यक्ष सहभाग स्पष्ट होईल.

### २.५.२ ध्येयनिष्ठ अभ्यासपद्धती:

या पद्धतीने लोकसाहित्याचा अभ्यास करण्याचा प्रारंभ सर्वप्रथम जर्मनीमध्ये झाला. लोकसाहित्यातून राष्ट्राच्या अस्मितेचे वेगळेपण प्रकट होते. हे लक्षात घेऊन देशाचा सांस्कृतिक वारसा कोणता ते शोधून राष्ट्रीय अस्मिता बळकट करण्यासाठी लोकसाहित्याचा वापर करता येईल. या उद्दिष्टाने जर्मनीत लोकसाहित्याच्या अभ्यासाची ध्येयनिष्ठ पद्धती सुरु झाली.

जर्मनीच्या हिटलरने आपल्या राजकीय तत्त्वप्रणालीत राष्ट्रीय संकल्पनेला अनन्यसाधारण महत्त्व दिले होते. त्यामुळे जर्मनीत प्रखर राष्ट्रवाद बळकट करण्यासाठी हिटलरने अल्फ्रेड रोझोन बर्ग, मंत्री वॉल्टर डॅर आणि राष्ट्रवादी चळवळीचा सहकारी बाल्डर फॉन शिरारा यांना हाताशी धरुन स्वत:च्या राजकीय विचारांना पोषक ठरु शकेल याच पद्धतीने लोकसाहित्याचा अभ्यास सुरू केला. त्यातूनच ध्येयनिष्ठ अभ्यास पद्धती विकसित झाली. सोव्हिएट रशियातील राजकारणी मंडळीनी आपल्या साम्यवादी विचारसरणीचा प्रचार व प्रसार करण्यासाठी याच ध्येयवादी पद्धतीचा अवलंब केला. लोकसाहित्य हे सर्जनशील

श्रमिकांची अभिव्यक्ती असते. तिथूनच ते अखिल समाजाचे होते. रशियन लोकसाहित्य विशारद ब्लादिमीर प्रॉप, अँड्रेव्ह, साकोलाव्ह हे पुढे आले. श्रमिकांच्या सर्जनशीलतेत लोकसाहित्याची निर्मिती सामावलेली आहे. या मताचा त्यांनी जोरदार पुरस्कार केला. परिणामत: नाझींनी जशी आपली राष्ट्रवादी विचारसरणी लोकसाहित्याच्या आधाराने पुढे आणली तशी रशियन साम्यवाद्यांनी आपल्या साम्यवादाच्या पुरस्कारासाठी लोकसाहित्याला वापरून घेतले. यावरून लोकसाहित्याच्या कार्याची व्यापकता स्पष्ट होते. लोकसाहित्य हा समूहमनाचा आविष्कार असतो. तो कसा राष्ट्रव्यापी असू शकतो हेच या अभ्यासपद्धतीतून सिद्ध होते.

### २.५.३ विचारप्रणालीपर अभ्यासपद्धती:

लोकसाहित्यातील वेगवेगळ्या विचारधारा किंवा विचारप्रणाली व कार्यप्रणाली तपासण्याच्या उद्देशातून या विचारप्रणालीपर अभ्यासपद्धतीची निर्मिती झालेली दिसून येते.

वेगवेगळ्या विचारसरणींचा अभ्यास केला जातो तेव्हा प्रामुख्याने त्या विचारसरणीतील व्यावहारिकता व सैद्धांतिकता तपासली जाते. या दोन स्पष्ट करणाऱ्या विचारालाच विचारप्रणाली व विचारसरणी (Ideology) असे म्हटले जाते. विचारप्रणाली ही एक विचारांची व्यवस्था (System of Idea) असते.

काही विचारप्रणालींमध्ये काल्पनिकतेला प्राधान्य असते तर काही विचारप्रणाली ह्या वास्तवाला प्राधान्य देणाऱ्या व अनुभवनिष्ठा मानणाऱ्या असतात. विचारसरणीमध्ये परस्पर विरोधी विचारांच्या मांडणीमुळे विचारांचा संघर्ष अपरिहार्य ठरतो.

प्रारंभीच्या काळात लोकसाहित्याचा अभ्यास करणारे लोकसाहित्याचे अभ्यासक नव्हते. तर सामाजिक शास्त्राचे अभ्यासक होते. त्यामुळे त्यांनी आपापल्या दृष्टिकोणानुसार अभ्यास केला. त्यातून लोकसाहित्याचे वेगवेगळे दृष्टिकोण निर्माण झाले. त्यांनी मांडलेले सिद्धान्त अभ्यासविषयाशी निगडित होते. या अभ्यासकांनी जे सिद्धांतन केले त्यातूनच लोकसाहित्याचे संप्रदाय म्हणजेच विचारधारा निर्माण झाल्या. उदा. भाषाशास्त्रीय संप्रदास, निसर्गरुपवादी संप्रदाय इ. भाषाशास्त्रीय किंवा दैवतकथाशास्त्रीय संप्रदायाने दैवतकथेत आढळणाऱ्या निसर्गातील घडामोडींच्या आधाराने प्रतीकरुप चित्रणाला महत्त्व दिले. त्यातून निसर्गरुपवादी संप्रदाय निर्माण झाला. दैवतकथेत निसर्गातील घटनांचे रुपकात्मक चित्रण असते पण निसर्गरुपवादी अभ्यासक दैवतकथेतील रुपकात्मक चित्रणाचे आवरण दूर सारुन त्यामागील वास्तव शोधण्याचा प्रयत्न करतात. विचारप्रणाली मधील हा संघर्ष इथे प्रतीत होतो.

### २.५.४ संदर्भान्वयी अभ्यासपद्धती:

१९६० नंतर अमेरिकेत या पद्धतीचा अवलंब करुन लोकसाहित्याचा अभ्यास सुरू केला. रिचर्ड डॉरसन याने अशा प्रकारचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला. लोकसाहित्यात अनेक गोष्टी विशिष्ट उत्सवात, विशिष्ट प्रसंगी सादर केल्या जातात. हा संदर्भ ध्यानात घेतला नाही तर त्याचे योग्य आकलन होणार नाही. लोकसाहित्य ही एक प्रकारे स्थलकाळ संदर्भाधिष्टीत घडणारी घटना असते. त्यामुळे लोकसाहित्याचा अभ्यास हा केवळ लोकवाङ्मयाच्या भाषिक संहितेचा विचार न राहाता तो समग्र स्वरुपाचा होतो. लोककथा, लोकगीत असो वा

लोकनाट्य असो त्या त्या कलाकृती कोणत्या वातावरणात निर्माण झाल्या, सादर झाल्या, त्यांचा आणि सामाजिक आचार-विचार, रूढी, विधी यांचा संबंध काय? या सगळ्या तपशिलाच्या आधारे लोकसाहित्याचा अभ्यास करावयाच्या पद्धतील संदर्भान्वयी अभ्यास पद्धती म्हणतात.

संदर्भान्वयी अभ्यास हा अनेक शास्त्रांच्या मदतीने करावा लागतो. म्हणजे ज्या समाजाच्या संदर्भात लोकसाहित्यकृतीचा अभ्यास या पद्धतीने करावयाचा असतो, त्या समाजाच्या भाषिक सवयी, त्यांच्या आविष्कार, संकेतव्यूह या गोष्टी समजून घ्याव्या लागतात. पण लोकसाहित्यकृतीचे विश्लेषण करतांना भाषाशास्त्र, मानसशास्त्र, नाट्यशास्त्र, चिन्हार्थशास्त्र, संगीतशास्त्र इत्यादी शास्त्रांचे साहाय्य घ्यावे लागते. उदा. आदिवासी नाट्यप्रकार घेतला तर यात समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक धारणा कोणत्या? तो समाज कोणत्या भूप्रदेशात वावरतो. हे नीट समजून घ्यायला हवे. तसेच त्या नाटकाच्या शब्दसंहिता, रंगसंहिता यांची घडण, संघटन कसे होते? त्याचीही माहिती असणे आवश्यक आहे. लोकनाटक कोणते सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक धार्मिक कार्य करते? आदिवासी रंगभूमीच्या दृष्टीने या नाटकाचे महत्त्व काय? अशा संदर्भात हा अभ्यास केला तर तो संदर्भान्वयी पद्धतीचा अभ्यास ठरेल.

### २.५.५ संरचनात्मक अभ्यासपद्धती:

लेवी स्ट्रास या अभ्यासकाने अमेरिकेतील रेड इंडियन लोकांच्या लोककथांचा अभ्यास करताना त्यांनी संरचनात्मक पद्धतीने मांडणी केली. कोणत्याही लोककथेचे कथानक, उपकथानक, कथातंर्गत येणारी संयोजक तत्त्वे असे रचनेच्या दृष्टीने तीन भाग असतात. रेडइंडियन जातीच्या लोकांच्या लोककथा फार छोट्या असतात. तशाच त्या प्रदीर्घ असतात. त्यांचा आकार नेहमी बदलत गेला आहे. काही कथांत घटनाप्राचुर्य असूनही त्या एकसंध असतात. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग अशी प्रसंगांची माळ असते. हा सारा अभ्यास लेवी स्ट्रासने 'दी स्ट्रक्चरल स्टडी ऑफ मिथ' या ग्रंथात मांडला आहे.

संरचनात्मक अभ्यासपद्धतीचे दुसरे रुप ब्लादिमीर प्रॉप याने मांडले आहे. त्याने १९२८ साली 'मॉरफॉलॉजी ऑफ फोकटेल' हा ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथात प्रॉपने लोककथेच्या आकृतिबंधाचा विचार मांडला आहे. या अभ्यासपद्धतीने लोकसाहित्याच्या अभ्यासाला एक नवीन दिशा मिळाली आहे.

लोकवाङ्मयाचे सुचनेनुसारी विश्लेषण या पद्धतीने केले जाते. लोकवाङ्मय रुपाने झालेली रचना ही एक वैशिष्ट्यपूर्ण भाषिक रचना म्हणून वर्तत असते. प्रत्येक साहित्यकृतीचा एक रचनाबंध असतो. त्याचे एक दृक-श्राव्य रुप असते. या रचनेमागे क्रियाशील, भाषिक व साहित्यिक संकेतांमुळे तिला अर्थ प्राप्त होतो. या भूमिकेतून जे अर्थनिर्णयन केले जाते त्याला संरचनावादी अभ्यास म्हणतात. या पद्धतीत साहित्यकृतीमधील शब्दार्थात्मक, वाक्यविज्ञासात्मक घटकांचा वस्तुनिष्ठ व संरचनात्मक अभ्यास करावा लागतो.

थोडक्यात संरचनात्मक अभ्यासात कथेच्या रुपबंधाच्या विश्लेषणावर भर देणे, तसेच कथेच्या आकृतिबंधाचे स्वरुप स्पष्ट करणे या पद्धतींचा मुख्य हेतू आहे.

### २.५.६ वर्णनात्मक पद्धती:

लोकसाहित्याच्या अभ्यासात आणि संशोधनात क्षेत्रीय अभ्यासाला फार महत्त्व आहे. वेगवेगळ्या भागात जाऊन लोकसाहित्य विषयक सामग्रीचे संकलन करणे, लोककलावंताच्या मुलाखती घेणे, प्रश्नावली तयार करुन त्याआधारे उत्तर मिळविणे, माहितीचे वर्गीकरण करणे यामार्गाने लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो. या पद्धतीला वर्णनात्मक किंवा संकलन अभ्यासपद्धती असे म्हटले जाते. ह्या संकलित सामुग्रीचे एकत्रीकरण करुन नंतर त्याची वर्गवारी केली जाते. त्यानंतर ती माहिती सांस्कृतिक, साहित्यिक, भाषाशास्त्रज्ञ, मनोवैज्ञानिक यांच्याकडे पाठविली जाते. हे अभ्यासक त्या माहितीचे आपापल्या दृष्टिकोनानुसार विश्लेषण करतात. जर्मन, फ्रान्स, स्वीडन, नार्वे या देशात अत्यंत शास्त्रीय पद्धतीने या अभ्यासपद्धतीचा अवलंब करुन लोकसाहित्याचा अभ्यास केला जातो.

### २.५.७ तुलनात्मक अभ्यासपद्धती:

फ्रँज बोआस या अभ्यासकाने १९३५ साली लोकसाहित्याचा तुलनात्मक अभ्यास सुरु केला. यामध्ये दोन किंवा दोनहून अधिक जातींच्या लोकांचे लोकसाहित्य आधाराला घेऊन अभ्यासाद्वारे निष्कर्ष काढले जातात. फ्रँज बोआस नंतर अँलान लोमेक्स याने दोन संस्कृतीचा तौलनिक अभ्यास या आपल्या ग्रंथातून केला. लोककथांचा तौलनिक अभ्यास करण्यासाठी जगभर उपलब्ध होणाऱ्या लोककथांचे समान आदिबंध लक्षात घेऊन सूची तयार केल्या जातात. सी. एन्. बर्न यांने 'दी हॅण्डबूक ऑफ फोकलोर' या ग्रंथात सन १९१४ साली सत्तर कथांचा अभ्यास मांडला. त्यात प्रत्येक कथेचा सारांश मांडून तुलना केलेली आहे. अशा प्रकारे लोककथांचा तुलनात्मक अभ्यास करून कोणत्या कथा ह्या पारंपरिक आहेत व कोणत्या नाहीत यांचा अंदाज करता येतो.

निरनिराळ्या लोकसमूहांत प्रचलित असलेल्या रुढी, परंपरा, विधीविधाने, समजुती, लोकगीते, लोककथा, म्हणी, वाक्प्रचार यांचे सूक्ष्म अध्ययन करून त्यांच्या संस्कृतीचे निराळेपण, वेगळा इतिहास, समाजमन, अस्मिता एकमेकांहून कशा वेगळ्या आहेत याचा अभ्यास या तौलनिक अभ्यासातून शक्य होतो.

### २.५.८ मौखिक आविष्कार सूत्रपद्धती:

या अभ्यासपद्धतीत लोकसाहित्याच्या मौखिक संहिता विश्लेषणाला महत्त्व असते. या अभ्यासपद्धतीच्या आश्रयाने लोकगायन, लोककथागायन, लोकनाट्य यांच्या सादरीकरणातील शब्दाविष्कारांचा व अंगभूत कौशल्यांचा अभ्यास केला जातो. म्हणून या अभ्यास पद्धतीत ध्वनिमुद्रित संकलन महत्त्वाचे असते. क्षेत्रिय सर्वेक्षण करुन लोकसाहित्य प्रकाराचे संकलन, ध्वनिमुद्रण करुन आविष्कारसूत्र व आशय यांचा सखोल अभ्यास केला जातो. त्याचबरोबर लोकसाहित्यप्रकाराची शैली, रचनापद्धती व मौखिक आविष्कारसूत्र याचे स्वरुप तपासले जाते. अर्थात प्रत्येक सादरीकरणात एक आविष्कारसूत्र सापडते व प्रत्येक सादरीकरणात ते बदलते. हे खरे असले तरी प्रत्येक कलाकृतीचे एक विशिष्ट आविष्कारसूत्र असते हे लक्षात घेऊनच हा अभ्यास केला जातो.

वरील विवेचनातून लोकसाहित्याच्या काही अभ्यासपद्धतीचा परिचय करुन दिला आहे. त्यामुळे लोकसाहित्याकडे पाहण्याच्या नवीन दृष्टिकोनाचा परिचय विद्यार्थ्यांना होईल. त्याचबरोबर लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या कक्षाही रुंदावतील.

## २.६ लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतीचे महत्त्व:

लोकसाहित्याची व्याप्ती फार मोठी असल्याने त्याचा अभ्यास अनेक अंगानी करता येतो. त्याकरिता लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धती महत्त्वाच्या आहेत.

लोकसाहित्याच्या अभ्यासपद्धतींमुळे लोकसाहित्याच्या विविध पैलूंवर प्रकाश पडतो. उदा. लोककथेचा जन्म कोठे झाला. त्यावर कोणत्या ऐतिहासिक घटनांचा प्रभाव पडला आहे. किंवा कोणत्या ऐतिहासिक घटनांचा त्यात समावेश आहे. याचा शोध घेता येतो. आपल्या समाजात सतत बदल, परिवर्तन होत असते. संस्कृतीच्या अंगाने पहायला गेलो तर संस्कृतीच्या बदलत्या टप्प्यावर काही गोष्टीची उपयोगिता संपल्याने त्या गोष्टी टाकून दिल्या जातात. पण काही गोष्टी अशा असतात की त्या दीर्घकाळ टिकून राहतात. त्यांचा उपयोग संपला तरी त्याचे अस्तित्व टिकून राहते. त्यांचा अभ्यास करण्यासाठी लोकसाहित्याच्या अभ्यास पद्धती महत्त्वाच्या ठरतात.

## आपली प्रगती तपासा

प्रश्न. तुम्ही अभ्यासलेल्या कोणत्याही लोककथेचे संरचनात्मक पद्धतीद्वारे विश्लेषण करा.

## २.७ सारांश

एकूणच या घटकामध्ये आपण लोकसाहित्याचा वेगवेगळ्या विचारांनी अभ्यास करणाऱ्या संप्रदायांचा व अभ्यासपद्धतीचा विचार इथे केला. लोकसाहित्याचे केवल संकलन होऊन चालत नाही, तर त्या संकलनासोबतच त्याचे वर्गीकरण करून त्या साहित्याच्या निर्मितीप्रेरणा, त्यातून सूचित होणार मानवी समाज, त्याचे संस्कार यांचे अवलोकनही महत्त्वाचे ठरते. अभ्यासाच्या या पद्धतामुळे विशिष्ट समाज समजून घेण्यास मदत होतेच; शिवाय तुलनात्मक पद्धतीद्वारे वेगवेगळ्या भूप्रदेशातही मानवी जगण्याचे समान दुवेही शोधता येतात. अशा पद्धतीच्या अभ्यासामुळे अज्ञात काळातील मानवी जीवनाचा परिचय आधुनिक युगातही होण्याच्या संधी निर्माण होतात. तसेच मानवशास्त्र, भाषाशास्त्र इ.

सारख्या अभ्यास संप्रदायामुळे लोकसाहित्याचे विविध स्तर उलघडणे शक्य झाले आहे. त्यामुळेच लोकसाहित्याचा या पद्धतीचा अभ्यास हा आधुनिक अभ्यासशास्त्रात मोडतो.

## २.८ संदर्भग्रंथसूची

मांडे, प्रभाकर : 'लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', गोदावरी प्रकाशन, अहमदनगर.

शिंदे, विश्र्वनाथ : 'लोकसाहित्य मीमांसा भाग-2' स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

कुबल, रमेश : 'लोकसाहित्याचे अंतरंग', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

मोरजे, गंगाधर : 'लोकवाङ्मय शाखा',

## २.९ नमुना प्रश्न

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

**१.** लोकसाहित्याच्या अभ्यासाचा ऐतिहासिक अंगाने आढावा घ्या.

**२.** लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रमुख संप्रदायाची ओळख करून द्या.

**ब. टीपा लिहा.**

१. लोकसाहित्याच्या आधुनिक अभ्यासपद्धती

२. लोकसाहित्याच्या अभ्यासाचे महत्त्व

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. लोकसहित्याच्या तुलनात्मक अभ्यासास प्रथम कोणी प्रारंभ केला?

२. 'लोकसाहित्याची रुपरेखा' हा लोकसाहित्यावरील ग्रंथ कोणाचा आहे?

*****

# ३अ

## लोककथा : परंपरा व स्वरूपविचार

**घटक रचना**


३.१ उद्देश

३.२ प्रस्तावना

३.३ लोककथेचे उगमस्थान

३.४ लोककथेची उत्पत्ती

३.५ लोककथांची भारतीय परंपरा

३.५.१ मराठी लोककथा परंपरा

३.६ लोककथा प्रकार

३.६.१ दैवतकथा

३.६.२ उत्पत्तिकथा

३.६.३ दंतकथा

३.६.४ परीकथा किंवा अद्भूतकथा

३.६.५ प्राणीकथा

३.६.६ नक्षत्रकथा

३.७ लोककथेची वैशिष्टये

३.७.१ अद्भूतरम्यता

३.७.२ संकेतबध्दता

३.७.३ अलौकिक व्यक्तिजीवन

३.७.४ लोककथांतील रसपरिपोष

३.८ लोककथातील आशयसूत्रे व अनुभवविश्व

३.९ लोककथांतील कल्पनाबंध

३.१० लोककथा संरचना

३.११ लोककथेची भाषा

३.१२ लोककथेचे कथात्म ललित साहित्याला योगदान

३.१३ लोककथेचा समाजाशी अंतर्लक्ष्यी बहिर्लक्ष्यी संबंध

३.१४ सारांश

३.१५ संदर्भग्रंथसूची

३.१६ स्वयंअध्ययन

## ३.१ उद्देश

१) लोककथा म्हणजे काय हे स्पष्ट करणे.

२) लोककथांचे स्वरूप स्पष्ट करणे.

३) लोककथांचे उगमस्थान व लोककथांची उत्पत्ती सांगणे.

४) मराठी लोककथा परंपरा, प्रकार व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे.

५) लोककथांची आशयसूत्रे व कल्पनाबंध विशद करणे.

६) लोककथा संरचना विशद करणे.

७) लोककथेने मराठी साहित्यास दिलेले योगदान स्पष्ट करणे.

## ३.२ प्रस्तावना

लोककथा व कथाकथन करणे आणि कथा श्रवण करणे या माणसाच्या मनात बीजरूपाने असलेल्या प्रेरणेचे फळ आहे. कथा सांगणे आणि ती ऐकणे ही मानवी प्रवृत्ती अतिप्राचीन आहे. कथा सांगण्याची प्रेरणा व कथा ऐकण्याची गरज ह्यामुळे कथा ही मनुष्याच्या सांस्कृतिक इतिहासात प्राचीन काळापासून आजपर्यंत नैसर्गिक सोबती बनली आहे. लोकसमूहाची प्रेरणा व गरज यांच्यामधून लोककथा मौखिक परंपरेने समूहमनात वसत असतात. माणसांचे जग हे कथाप्रिय आहे. आपल्याकडे रामायण, महाभारत, वेद-उपनिषदे, ब्राह्मणग्रंथ या धार्मिक मानलेल्या ग्रंथातून पुराणकाळात दैवतकथा, चातुर्यकथा, नीतिकथा, बोधकथा अस्तित्वात आलेल्या आहेत.

ऋग्वेद काळापासून आजतागायत खळाळत वाहत आलेली लोकगंगा म्हणजे लोककथा. जी केवळ लोकांची, लोकांनी, लोकांना सांगितलेली कथा म्हणजे लोककथा. मराठी लोककथेच्या प्राचीनतेविषयी सांगताना दुर्गा भागवत म्हणतात, “मानवी संस्कृतीचा साकल्याने विचार केल्यास भाषेइतके प्राचीनतम दुसरे काहीही नाही. मानवाने संपादन केलेली पहिली कला वाणींची होय.” मानवी इतिहासाचा प्रारंभ हा भाषेपासून होतो. भाषेची सुरुवात झाल्यानंतर प्राथमिक व दुसऱ्या अवस्थेतील विविध निसर्गदृश्यांची संगती लावण्याची व त्याचा भाषेत कथारूपाने अनुवाद करण्याची कला मानवाने साध्य केली. सारांश प्राचीन काळातील आदिमानवाच्या मनात कधीतरी निर्माण झालेली लोककथा पुढे वाहत राहिली.

मराठी लोककथा ही अतिशय लवचिक आहे. ती भारतीय लोककथेच्या प्रचंड नि विस्तीर्ण प्रवाहातील एक धारा असून ती आदिम काळापासून नैसर्गिक घटितांच्या रुपाने तर कधी पशुपक्षांच्या रूपाने आलेली आहे. कहाणी, चिटुकले, आख्यायिका, गोष्ट नि कथा असा देशकाल परिस्थितीनुरूप पेहराव बदलत ती टिकून राहिली आहे. भारतातील लोककथांचा प्रसार तर जगभर आढळून येतो. भारतीय लोककथा भिन्न भिन्न वेषात निरनिराळ्या देशात आढळून येतात. व्यक्ती तितक्या अभिव्यक्ती या सूत्रानुसार एकाच लोककथेची विविधरूपे दिसून येतात.

भारतीय लोककथांच्या प्रदीर्घ परंपरेत विविधता आहे. तसेच मानवी व्यक्तित्वाला आकार देणाऱ्या श्रेष्ठत्तम मूल्यांची जपणूक आहे. याचा परिणाम हा आधुनिक मराठी ललित कथेच्या जडणघडणीवर झालेला आहे.

प्राचीनकाळी या लोककथा कुणी निर्माण केल्या. याविषयी मात्र निश्चित काही सांगितले जात नाही. परंतु लोककथेच्या मूलस्त्रोतांचा शोध घेताना काही लोकसाहित्य अभ्यासक, लोकशास्त्र विशारद यांनी मांडलेले निष्कर्ष मात्र विचारात घेता येतील.

## ३.३ लोककथेचे उगमस्थान

लोककथांचा उगम कोणत्या देशात झाला ते सांगणे अवघड आहे. अनेक अभ्यासकांनी लोककथेच्या उगमस्थानाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. पण त्यात एकवाक्यता नाही. परंतु लोककथेच्या उगमासंबंधी खालील उपपत्ती विचारात घेता येतील.

१. लोककथांचा उगम भारतात झाला.

२. जगातील लोककथांचे मूळ उगमस्थान आर्यांच्या जिथे वस्ती होत्या त्या मध्य आशियात आहे.

३. लोककथांचा उगम मानवाच्या आरंभीच्या अवस्थेपासून झाला आहे व ज्या ठिकाणी आदि मानवाची वस्ती होती ते लोककथांचे उगमस्थान आहे.

थिओडोर बेनफे या ज्यू पंडिताने सर्वप्रथम 'भारत देश हाच लोककथेच्या मूळ स्त्रोताचा जनक आहे' असा सिद्धांत मांडला. बेनफे हा जर्मन, संस्कृत भाषाविशारद होता. त्याने पंचतंत्राचे भाषांतर जर्मन भाषेत केले. त्यात प्रारंभीच लोककथेच्या उगमाची चर्चा केली आहे. त्याच्या मते, सर्वच लोककथा भारतातून युरोपात गेल्या. प्राचीनकाळी भारतातून तिबेट आणि मंगोलियात बुद्ध धर्माचा प्रसार होत गेला. तेव्हा त्या बुद्धधर्मीय मंडळींबरोबर भारतीय कथा तिकडे प्रसारित झाल्या. तिथून त्या लोककथांचा प्रसार इटली, स्पेन या देशात झाला.

लोककथेचे उगमस्थान आणि तिचे परिभ्रमण या विषयीच्या बेनफेच्या मताचा पुरस्कार त्याचा अनुयायी फ्रेंच पंडित हॅमन्यूअल कॉस्कीन याने केला. त्यांच्या मते, लोककथांचा इतर देशात जो प्रसार झाला त्याचे कारण मूळ देशापासून दुसऱ्या देशात विकलेले गुलाम, युद्धकैदी, भटकंती करणाऱ्या वन्य जमाती, फिरस्ते व्यापारी, भटक्या जमाती होतं. असे त्यांनी स्पष्ट केले.

अँड्रयू लँग, सर जेम्स फ्रेझर, हार्टलंड, जॉर्ज गोमेश यांनीही लोककथेचा उगम वन्य जमातीत झाल्याचे प्रतिपादन केले आहे. मात्र भाषा पंडित मॅक्सम्युलरने लोककथांचा उगम मध्य आशियात, आर्यांच्या प्राच्य वसाहतीत झाल्याचे म्हटले आहे. त्याच्या या मताचा पुरस्कार पुढे दासेंट, विल्हेम ग्रीम इत्यादींनी केला. जॉर्ज गोमेश यांनीही लोककथेचा उगम वन्य जमातीत झाल्याचे प्रतिपादन केले आहे.

वरील विचारवंतांची विविध मते पाहिली म्हणजे लोककथेची परंपरा निश्चित करताना अडचण निर्माण होते. अँड्रयू लँग याचा सिद्धान्त लक्षात घेतला तर मानवाचे मूळ

वसतिस्थान शेवटी कुठेतरी एकच असले पाहिजे आणि तिथूनच मानव जगभर स्थलांतरित होत गेल्याने लोककथांच्या परंपरा जगभर विखुरल्या असतील हे मत अधिक रास्त वाटते. आज जगभरातील लोककथांमध्ये अनेक बाबी एकसारख्या आढळतात ही बाबही महत्त्वाची ठरते.

## ३.४ लोककथेची उत्पत्ती

लोककथेची उत्पत्ती केव्हा झाली हे सांगणे अवघड आहे. तिच्या उत्पतीचा काळ निश्चित करणे ही एक अवघड प्रक्रिया आहे. लोककथांचे आजचे स्वरूप आणि त्यातून प्रत्ययास येणारे काही प्राचीन अवशेष अभ्यासल्यानंतर असे दिसून आले की, लोककथांचा जन्म अतिप्राचीन संस्कृतीत झाला असे दिसते. उत्पत्ती काळाच्या दृष्टीने या प्राचीनतेचा शोध घेण्याचा प्रयत्न लोककथांच्या आधारे घेता येऊ शकतो.

लोकसमूह हा दैवी शक्तीवर विश्वास ठेवतो. दैवीशक्तीमुळे लौकिक जगातील वस्तू मात्रावर व घटनांवर परिणाम होतो. अशी लोकसमूहाची समजूत असते. या समजूतीतून लौकिक-अलौकिक जगातील चमत्काराविषयी काही कल्पना निर्माण होतात. या कल्पनांमधून कथांची निर्मिती होते. दैवतकथांचा आशय, त्यातील घटना इत्यादींचे स्पष्टीकरण पाहता लोककथेचा जन्म हा प्रागैतिहासिक काळातील असावा असे म्हणता येते. प्राचीन संस्कृतीच्या काही खुणा, काही अवशेष, लोककथा अद्यापही टिकवून आहेत. लोककथांतील या स्वरूपाचे उल्लेख वेदकाळात प्रचलित असलेल्या कथा, पुराण, वाङ्‌मयातील कथा यांचा आधार घेता लोककथांचा उगम अतिप्राचीन काळी झाला असे म्हणता येईल.

फ्रॉईड याने सुप्त मनाची संकल्पना मांडून कथा, गीते, यांच्या उत्पत्तीचा शोध स्वप्नसिद्धान्ताचा आधार घेऊन लावता येतो असे म्हटले. स्वप्न जशी प्रतीकरूप असतात तशाच लोककथा, लोकगीते प्रतीकरूप असतात. स्वप्नांचा जसा उलगडा करता येऊ शकतो तसा लोककथांच्या निर्मितीचाही उलगडा होऊ शकेल. अतृप्त इच्छा, आकांक्षाना वाट करून देण्यासाठी लोककथांची उत्पत्ती होते.

मॅक्सम्युलरच्या निसर्गरूपवादी दृष्टिकोनातून जर विचार करावयाचा झाला तर निसर्गात ज्या विविध घटना घडतात, त्या घटनांचे लोककथांत प्रतिकात्मक स्वरूपात चित्रण असते. म्हणून सृष्टीच्या प्रतिकीकरणातून लोककथांची निर्मिती झाली असली पाहिजे, असे म्हणता येईल.

मानवशास्त्रज्ञांनी लोकसाहित्याच्या उगमाचा शोध घेताना त्याचा संबंध हा आदिसंस्कृतीतील मूलविधींशी (creation Ritual) जोडला आहे. धर्माचे मूळ यातुक्रियांमध्ये असून यातुक्रियांचा उगम आदिसंस्कृतीतून झाला आहे. धर्मविधी व यातुक्रिया या यज्ञविधीसाठीच निर्माण केल्या आहेत. मानवशास्त्राचे 'यज्ञविधी हाच मूलविधी असून मानवी जीवनातील साऱ्या विधींचा जन्म त्यातून झाला असला पाहिजे. हे मत ग्राह्य मानले तर लोककथेचा जन्म हा यज्ञविधी वा यज्ञविधीसंबंधीच्या क्रियांतून झाला असे मानता येते.

## ३.५ लोककथांची भारतीय परंपरा

भारतात लोककथांची परंपरा प्राचीन असून येथील कथा वाङ्मय समृद्ध आणि संपन्न आहे. ही परंपरा जतन करण्याची मोलाची कामगिरी त्याकाळी कथकांनी केलेली दिसून येते.

थिओडोर बेनफे यांनी लोककथेचा मूलस्त्रोत सांगताना लोककथांची मूळ जन्मभूमी भारत हीच आहे, हे मत सर्वप्रथम मांडले. पुढील अभ्यासकांनी बेनफेचे हे मत नाकारले तरी भारतीय लोककथांच्या प्राचीन परंपरेविषयी अभ्यासकांच्या मनात संशय नाही.

भारतीय परंपरेचा शोध घेता असे लक्षात येते, की वैदिक संहिता या भारतीय कथावाङ्मयाची उगमस्थाने आहेत. ऋग्वेदातील संवादसुक्ते आख्यानपर असली तरी कथेच्या परंपरेत ही सुक्ते आधारभूत म्हणून अभ्यासनीय आहेत. पुरुरवा – उर्वशी यांच्या संवादातून जी कथा येते ती, तसेच यम-यमी संवाद, इंद्र-इंद्राणी संवाद ही आख्याने विशेष प्रसिद्ध आहेत. हीच आख्याने पुढे उपनिषदकारांनी आणि ब्राह्मणकारांनी, ग्रंथकारांनी स्वीकारल्याचे दिसते. धार्मिक ग्रंथ तसेच रामायण, महाभारतसारख्या पौराणिक महाकाव्यात, वेदवाङ्मयात, जैनचूर्णीत धर्माच्या संबंधाने काही कथा आहेत. या प्राचीन वाङ्मयातील कथांचे वळण लोककथेसारखे आहे. पंचतंत्र, हितोपदेश, वेताळ पंचविशी, सिंहासन बत्तीशी, शुकबहात्तरी आणि जातककथा हे भारतीय लोककथांचे आगरच मानायला हवे.

आज प्रचलित असलेल्या लोककथांतील अद्भूतता, चमत्काराची सिद्धी प्राचीन कथेतही पाहावयास मिळते. रंजकता व बोधाच्या दृष्टीनेही कथांचे साम्य लोककथेशी दाखविता येते. प्राचीन कथा रंजक आणि उद्बोधक असल्यामुळे लोकजीवनात त्या रूजल्या, पसरल्या आणि पुढे लोककथा म्हणून नावारूपास आल्या असे म्हणता येईल. प्राचीन कथावाङ्मयातील कल्पनाबंध किंवा कथाबीज आजही काही लोककथांतून कायम असल्याचे दिसते.

स्थूलमानाने आज प्रचलित असलेल्या लोककथेची प्राचीन काळापासून सुरू असलेली वाटचाल आणि जडणघडण पुढीलप्रमाणे सांगता येते.

वेदवाङ्मय, पुराणवाङ्मय, बौद्ध जातके, जैन चूर्णीका, प्राचीन ग्रंथनिविष्ठ वाङ्मय पारंपरिक अद्भूत कथांना ललित वाङ्मयाचे स्वरूप देणारे वाङ्मय.

### ३.५.१ मराठी लोककथा परंपरा:

मराठी लोककथा परंपरेचा शोध घ्यायला लागलो तर असे दिसून येते की, मराठीमध्ये लोककथांच्या संकलनाला इ.स. १८६८ सालापासून प्रारंभ झाला. तरी लोककथांचे संकलन व इसापकथांचे भाषांतर असे ते प्रयत्न होते. वासुदेव गो. आपटे यांनी अद्भूतकथा नावाचा लेख १९०७ साली लिहून लोकसाहित्याच्या कथाअभ्यासाला सुरूवात केली.

सन १९१८ साली विष्णू दिवाकर वैद्य यांनी कहाण्यांचे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले होते. १९२५ साली वि. का. राजवाडे यांनी ‘लोककथा’ हा शब्द सुचविला. शं. गो. दाते यांनी १९३० साली लोककथांचा संग्रह प्रसिद्ध करून मराठीत लोककथांच्या स्वतंत्र संग्रहाच्या कार्याला चालना दिली. त्यानंतर ना. गो. चाफेकर, म. वि. डोंगरे, श्री. म. वर्दे, बा. रा. प्रभू,

अनुसया भागवत इत्यादींनी नियतकालिकांतून संग्रह आणि स्फूट लेखन प्रसिद्ध केले. महाराष्ट्र साहित्य पत्रिका, इतिहास संशोधन पत्रिका यांत स्फुट रूपाने व पुस्तक रूपाने कथा साहित्य प्रसिद्ध केले होते.

लोककथांचे स्वरूप स्पष्ट करणे व उद्गम, विकासाची चर्चा करण्याचा प्रयत्न डॉ. सरोजिनी बाबर यांनी 'लोककथा' पुस्तकात केला आहे. दुर्गा भागवत यांनी 'लोकसाहित्याची रूपरेखा' हा लोककथा प्रकारांची शास्त्रीय चर्चा करणारा मराठी ग्रंथ प्रसिद्ध केला. 'मराठवाड्यातील लोककथा' हा डॉ. यु. म. पठाण यांनी संपादित केलेला संग्रह लोककथांचा आहे. 'एक होता राजा' आणि महाराष्ट्र लोकसाहित्य समितीची इतर प्रकाशने यातही लोककथा आहेत.

लोकजीवनात स्थिरावलेल्या आणि प्राचीन काळापासून परंपरेने चालत आलेल्या कथांचे स्वरूप विविध प्रकारचे असून लोकसमाजाला नीती, रीती, धर्म, शील, चारित्र्य यांचे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट या कथाविश्वामागे असल्याचे दिसून येते. तसेच गूढता, कल्पनावैचित्र्य, अद्भूतता आदी जागतिक कथा वाङ्मयात आढळणारी सगळी वैशिष्टे मराठी लोककथांत आढळतात.

## ३.६ लोककथा प्रकार

लोककथा ही संज्ञा अनेक लोककला प्रकारांना सामावून घेणारी संज्ञा आहे. त्यामुळे लोककथांचे वर्गीकरण किंवा प्रकार पाडताना अभ्यासकांनी लोककथेचा आशय आधार मानून वर्गीकरण केलेले आहे. याशिवाय लोककथेची रचना, कथा, विशेष कल्पनाबंध, कथेचा विकासक्रम या दृष्टीने लोककथेचे वर्गीकरण केलेले दिसून येते. लोककथांची निर्मिती, विविधता आणि विपुलता लक्षात घेतली तर मराठी लोककलांचे प्रकार (वर्गीकरण) पुढीलप्रमाणे करता येतात.

१) दैवत कथा, २) उत्पत्ती कथा, ३) परिकथा किंवा अद्भुतकथा, ४) दंतकथा किंवा आख्यायिका, ५) प्राणी कथा किंवा बोधकथा, ६) नक्षत्रकथा

### ३.६.१ दैवतकथा:

दैवतकथांना धर्मकथा किंवा पुराणकथा असा एक पर्यायी शब्द आहे. त्यावरून दैवतकथांचे स्वरूप लक्षात येऊ शकते. दैवत कथा या प्राचीनतम कथा आहेत. मानवाच्या प्रारंभीच्या अवस्थेतही दैवतकथांचे अस्तित्व होते. त्यामुळे मानवाच्या प्रारंभ काळापासूनचे इतिहासाचे काही विशेष दैवत कथांत सापडतात. अँन्ड्रयू लँगच्या मते, दैवतकथा म्हणजे आदिमांचे अधिभौतिकशास्त्र होय. मानवाच्या सामाजिक, भौतिक, अध्यात्मिक विकासाची अंगे यात सामावलेली आहेत. दैवतकथा म्हणजे देवदेवतांसंबंधीच्या कथा. देवदेवता विषयीच्या श्रद्धा त्यांच्या सामर्थ्याच्या हकिगती, देवदेवतांचे जन्म, अवतारकार्य, त्यांचे शत्रू-मित्र इत्यादींचा या कथांत समावेश होतो. दैवतकथा या नावावरुन त्यांचा देव-देवतांशी असलेला संबंध लक्षात येतो. या कथांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे पुढे त्यांचा धर्माशी आणि धर्मातील उपास्य दैवतांशी, मूर्तीशी, प्राण्यांशी निकटचा संबंध आला.

आदिम जीवनाला निसर्ग अत्यंत जवळचा होता. निसर्गातील काही शक्ती आपल्या जीवनाला पूरक आहेत, हे लक्षात आल्यानंतर अशा शक्तींना त्यांनी देवत्व बहाल केले आणि तेथूनच दैवत कथांचा उगम झाला असे काही अभ्यासकांचे म्हणणे आहे.

दैवतकथा देवाधर्मासंबंधी माहिती सांगणाऱ्या असतात म्हणून त्या पूज्य समजल्या जातात. त्या धर्माशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याभोवती पावित्र्याचे वलय निर्माण झालेले असते. प्रत्येक धर्मात अशा स्वरूपाच्या कथा आढळतात.

अद्भूतरम्यता हा दैवतकथांचा ठळक विशेष असतो. शापाने माणसाचा दगड होणे. विनापंख आकाशात संचार करता येणे यासारखे चमत्कार, अद्भूतरम्य वातावरण दैवतकथांत असते.

थोडक्यात दैवतकथेतून प्राचीन जीवनचित्रणाबरोबर निसर्गशक्तींना देवत्व बहाल करुन लोकांच्या मनात श्रद्धा निर्माण करण्याचे कार्य केले गेले. तसेच लोकांच्या मनात धर्मभावना जागृत ठेवण्याचे कार्यही दैवतकथेने केलेले आहे. दैवी आदर्श, उच्च चारित्र्य, श्रद्धा यांद्वारे मानवी मनाला ताकद देण्याचे सामर्थ्य दैवतकथांत असते.

### ३.६.२ उत्पत्तिकथा:

उत्पत्तीकथेत परमेश्वराने सृष्टीची निर्मिती, रचना व मानवाची उत्पत्ती कशी झाली याचा समावेश या कथांमध्ये होतो.

उत्पत्ती कथांविषयी जनसामान्यांच्या मनात श्रद्धेची भावना असते. पावित्र्याचे वलय या कथांभोवती असल्याचे दिसून येते. उत्पत्तीकथांचा महत्त्वाचा विशेष म्हणजे त्या प्राचीन असूनही सर्वकाळात लोकांना त्या जवळच्या वाटतात. या कथांचे स्वरुप तसे काल्पनिक असते. परंतु सर्वसामान्य लोक त्या कथांतील तपशील सत्य आणि ऐतिहासिक असल्याचे धरुन चालतात. या उत्पत्ती कथांत प्रलय आणि तद्नंतर झालेली सृष्टीनिर्मिती हा विचार व्यक्त झालेला असतो. सारांश सृष्टीची, सृष्टीतील मानव, प्राणीमात्र निसर्गातील घटक या सर्वांच्या उत्पत्तीचा, कार्याचा, स्वरुप- विशेषांचा विचार उत्पत्तीकथांतून झालेला आहे. सृष्टीतील अनेक गूढ चमत्कारांना आपल्या कल्पनेप्रमाणे शोधण्याचे प्रयत्न हे उत्पत्ती कथांतून केलेला आहे.

### ३.६.३. दंतकथा:

दंतकथा हा शब्द इंग्रजी Legend या शब्दाला समानार्थ असा शब्द आहे. ही संज्ञा स्थानिक किंवा ऐतिहासिक आख्यायिकांना वापरतात. श्रीधरांच्या पांडवप्रतापाच्या त्रेसष्टाव्या अध्यायातील ओवीत 'दंतकथा' हा शब्द आलेला आहे. बाकी संस्कृत साहित्यशास्त्र किंवा अन्य पुराणग्रंथात हा शब्द सापडत नाही. "तोंडातोंडी सांगितलेल्या गोष्टी ज्यांना पुराणाचा लेखी आधार नाही त्या दंतकथा" असा श्रीधरांना अर्थ अभिप्रेत असावा.

### ३.६.४. परीकथा किंवा अद्भूतकथा:

अद्भूत कथेला परीकथा असे म्हणतात. कथेतील अद्भूत घटना आणि सर्वसामान्य माणसांच्या आवाक्याबाहेरील कृती, घटना आणि प्रसंग चमत्काराच्या कल्पनाबंधातून गुंफलेल्या असल्यामुळे या कथांना अद्भूतकथा असे नाव पडले. अद्भूतकथेत नायक किंवा

नायिका कथेतील मध्यवर्ती व्यक्ती असते. त्या व्यक्तीभोवती पराक्रमाची, चमत्काराची, उभारणी झालेली असते. या व्यक्ती सुरूवातील दु:खी असतात. परंतु शेवट मात्र सुखात्म होतो.

अद्भूतकथेत अद्भूत व्यक्ती, प्राणी, पक्षी आणि अतिमानवी योनीतील व्यक्ती येत असल्यामुळे एक प्रकारच्या अद्भूततेचा प्रत्यय या कथांतून येतो. अद्भूत कथेत दैववाद आणि नशीब यांचा प्रभाव असतो. त्यात अनेक दैवी शक्ती, अतिमानवी योनीतील व्यक्ती नायक-नायिकांना संकटात साहाय्य करतात.

अद्भूतकथेचे मुख्य प्रयोजन मनोरंजन असते. अद्भूत घटनांचे आकर्षण, कल्पनारम्य विश्वात रमण्याचा मानवी स्वभाव, आदींचे वर्णन या कथांतून घडते. त्यामुळे या कथांतून कोणताही नीतिबोध मिळत नाही. अद्भूतकथा ही धर्मकथा व नितिकथा यांच्यापासून दूर असते. अद्भूतकथेचे स्वरूप धर्मकथेचे कधीही नसते. कथेतून बोध करण्याचा उद्देशही नसतो; तर अद्भूतरम्य विश्वाचे दर्शन घडविणे, मनोरंजन करणे आणि लोकजीवनात आशावाद व उत्साह निर्माण करणे हे कार्य अद्भूतकथा करते.

### ३.६.५. प्राणीकथा:

हा लोककथांतील अतिप्राचीन कथा प्रकार होय. प्राण्याची कथा सांगून त्याद्वारे बोध करणे व उद्बोधन करणे हे यामागे प्रयोजन असते. लोककथांचे नामवंत अभ्यासक स्टीथ थॉम्पसन यांने प्राणीकथांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे. “When the animal tale is told with an acknowledge moral purpose it became a fable.”
स्टीथ थॉम्पसनच्या मते, बोध देण्याच्या किंवा नीतिशिकवण देण्याच्या उद्देशाने कथा सांगितली जाते, तेव्हा तिला प्राणीकथेचे स्वरुप लाभते.

प्राणीकथांची निर्मिती प्राचीन काळी झाली. पंचतंत्रकथा या भारतीय प्राणीकथा होत. राजपुत्रांना नैतिक शिक्षण देण्याच्या हेतूने या कथांची रचना झाली. लबाड कोल्हा, शहाणे कासव, भित्रा ससा यांच्या स्वभाववैशिष्ट्यांचा उपयोग माणसाला व्यावहारिक नीतिपाठ देण्यासाठी करुन घेतलेला असतो.

प्राणीकथांचे स्वरुप पाहता असे लक्षात येते की, या कथा कल्पित स्वरुपाच्या असून बोधप्रत असतात. लोकजीवनात आज प्रचलित असलेल्या कथा पंचतंत्रातूनच प्रसारित झाल्या असाव्यात.

### ३.६.६. नक्षत्रकथा:

सूर्य-चंद्र, आकाश व पृथ्वी यांच्याप्रमाणे आकाशातील तारे व नक्षत्र यांचाही अर्थ लावण्याचा, त्यांचे स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न कथांतून प्राचीन काळी झालेला आहे.

आकाशातील नक्षत्रे ही सूर्य-चंद्राची अपत्ये आहेत, ही कल्पना अनेक लोककथांमधून स्वीकारली गेली. सूर्य आपली मुले खातो, हा कल्पनाबंधही जगातील लोककथांमधून आढळतो. सूर्य आकाशात आल्यानंतर नक्षत्रे दिसत नाहीत, या घटनांवर आधारित या कथा आहेत.

सूर्य-चंद्राप्रमाणे कृतिका नक्षत्रांच्याही काही कथा आहेत. पुराणातही कृतिका नक्षत्राच्या कथा आहेत. भारतीय परंपरेनुसार कृतिका या सप्तर्षींच्या भार्या मानल्या जातात. असे असले तरी त्या कधीच एकत्र येत नाहीत. कृतिका, कुमारी, पतीविरहीत असल्याचा कल्पनाबंध कथांतून अधिक स्वीकारला गेला. कृतिकाप्रमाणेच रोहिणी, मृग व व्याध या नक्षत्रांविषयी कथा आढळतात.

नक्षत्रकथांचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, कृतिकादी पावसाळी नक्षत्रांभोवतीच जागतिक कथांचे जाल विणले गेले आहे.

## ३.७ लोककथेची वैशिष्ट्ये

जगातील जवळ जवळ सर्व देशात लोककथा प्रचलित आहेत. आपल्या वेगळ्या वैशिष्ट्यांमुळे या लोककथांनी लोकजीवनात लोकप्रियता मिळविलेली आहे. या लोककथांमध्ये अद्भूतरम्यता, अलौकिक व्यक्तीजीवन मानवी स्वभावातील विविध पैलू वैचित्र्यपूर्ण प्राणीजीवन, कल्पनाबंध अशी वैशिष्ट्ये आढळतात.

### ३.७.१ अद्भूतरम्यता:

मनोरंजन हा लोकसाहित्याचा एक प्रमुख उद्देश असल्याने अद्भूतरम्यतेला लोककथात महत्त्वाचे स्थान आहे. लोककथा म्हणजे अद्भूतता असा समज या संदर्भात रूढ आहे. त्यामुळे लोककथा अद्भूतरम्य असली पाहिजे असा एक संकेत ठरलेला असतो. अद्भूताचे आकर्षण मानवास असल्याने लोककथांत अद्भूत घटना व प्रसंग यांचे चित्रण झालेले असते. ही अद्भूतता विविध प्रकारे कथेत येते:

१. देशोदेशींच्या लोककथांतील अद्भूत विश्वात अलौकिक घडणाऱ्या घटना.

२. अमानवी शक्तीच्या व्यक्तींचा कथेत वावर असणे. अमानवी शक्तींचा वावर असणे. त्यांनी मनुष्यांसारखे बोलणे. यातून अद्भूतरम्यता निर्माण होते.

३. देवदेवता, दानव, यक्ष, परी चित्रविचित्र प्राणी, भूत-पिशाच्च, चेटकीण अशा गोष्टी कथांत येणे.

४. जडवस्तूंना कथेत मानवी वाणी प्राप्त होणे.

५. एखादे वस्त्र परिधान करताच माणूस अदृश्य होणे.

६. अद्भूत शक्तीच्या, जादूच्या वस्तू, इच्छित भोजन देणारी थाळी, छडी, अंगठी, आकाशात संचार करण्यास मदत करणारी चटई, सतरंजी, बुट अशा अनेक अद्भूत वस्तूंच्या वर्णनातून अद्भूतरम्यता आणली जाते.

### ३.७.२ संकेतबद्धता:

बऱ्याच लोककथांतून संकेत पाहावयास मिळतात. एक राजा आणि दोन राण्या – एक आवडती व दुसरी नावडती. तसेच सावत्र आई ही दुष्टच असणे हा संकेत लोककथेत पाहावयास मिळतो. तीन राजकन्या, तीन भाऊ, तीन ब्राह्मण असा 'तीन' चा संकेत

लोककथेत पाहावयास मिळतो. सात समुद्र, सात अरण्ये, सात पर्वत, सात नद्या असा 'सात'चा संकेत लोककथेत असतो. तसेच बारा वर्षे वनवास, बारा वर्षे तपश्चर्या, बारा कोस अंतर असा बारा संख्येचा संकेत लोककथांमध्ये असलेला दिसून येतो. या संकेतांशिवाय नायक-नायिका भाग्यवान असणे सुष्टाचा विजय व दुष्टांचा पराजय, राजकन्येचे तीन पण, तीन अटी असे संकेत लोककथेत पाहावयास मिळतात.

### ३.७.३ अलौकिक व्यक्तिजीवन:

लोककथांमध्ये सामान्य माणसांचा वावर असतो. पण त्यांच्या बरोबरीने अलौकिक प्राणीही वावरत असतात. यक्ष, पऱ्या, देवदूत, चेटकिणी, राक्षस, मत्स्यकन्या, नागकन्या त्याचबरोबर अद्भूत देहगुण असलेल्या मानवी व्यक्तींचा लोककथांत विशेष वावर असतो. उदा. गाढवाचे डोके असलेले शापित गंधर्व, हयग्रीव ही अद्भूतरम्यतेची उदाहरणे आहेत. वैचित्र्यपूर्ण प्राणीजीवन कल्पिल्याने लोककथांची रंजकता वाढते.

लोककथांतील व्यक्तीचे स्वभावदर्शन प्रातिनिधिक स्वरुपाचे असते. अनेक स्वभावाच्या व्यक्ती, चांगल्या-वाईट, विक्षिप्त, चतुर-मूर्ख असे व्यक्ती स्वभाव, नमुने लोककथांत पाहावयास मिळतात.

### ३.७.४ लोककथांतील रसपरिपोष:

लोककथांमधून प्रामुख्याने अद्भूत रसांचा परिपोष झालेला आढळतो. परिकथा, अद्भूतकथांमधून अद्भूतरसाचा उत्कट प्रत्यय येतो. यक्ष, गंधर्व, किन्नर, अप्सरा, परी, राक्षस, चेटकीण आणि असामान्य गुणांच्या मानवी व्यक्ती यांच्या कृतीतून अद्भूतरस ठायी ठायी पाझरताना दिसतो. शृंगाररसाचा परिपोष करणाऱ्या कथाही लोकवाङ्मयात आहेत. नायक-नायिकेच्या प्रितीभावनेतून शृंगाररस लोककथांतून खुलविलेला आढळतो. भावाभिव्यक्तीच्या व भावास्वादाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या रसाविष्काराचा आढळ सर्वच देशांच्या लोककथांतून होतो.

## ३.८ लोककथातील आशयसूत्रे व अनुभवविश्व

१. भौतिक विश्व, त्याचा पसारा, जीवसृष्टी यांची निर्मिती कशी झाली?

२. माणसाचा जन्म त्याचा मृत्यू या संबंधीचे गूढ शोधणे.

३. निसर्गातील नानाविध चमत्कार.

४. देवदेवता आणि त्यांच्या कृती.

५. देवता आणि माणूस यांच्यामधील व्यवहार-संबंध.

६. देव व माणूस या दोघांमधील सख्य व शत्रुत्व.

७. देव-दानव यांचे संबंध, त्यांचा जय-पराजय.

८. देवदेवतांची कृपा, त्यांचा आशीर्वाद.

९. वेगवेगळे धार्मिक आचार त्याचे महत्त्व याबाबतचे अनुभव ही आशयसूत्रे लोककथांमध्ये आढळून येतात.

मानवी बुद्धीला विश्वातील अद्भूतरम्यता आणि अतिमानवी शक्ती यांच्याविषयी नेहमीच कुतूहल वाटत आले आहे. या कुतुहलापोटी ज्या कथा निर्माण झाल्या आहेत, त्या कथांमध्ये स्वर्गलोक, मृत्यूलोक, पाताळलोक अशा वेगळ्या अविश्वसनीय स्थळ परिसराचा वापर केलेला दिसून येतो. कथांमध्ये सद्गुणी, दुर्गुणी, सृष्ट-दुष्ट अशा प्रकारच्या गुणांनी युक्त असलेली पात्रे कल्पिलेली असतात. संस्कृती घडण होत असतानाच्या काळात माणसाने अशा प्रकारचे कथाविश्व मोठ्या प्रमाणावर निर्माण केलेले दिसून येते. प्रामाणिक, सुष्ट, सद्गुणी माणसाचा विजय होणे, तसेच अशा माणसांवर अनेक प्रकारची संकटे कोसळून त्यातून त्यांची सुटका होणे असा सुखान्त असणाऱ्या अनेक कथा आढळतात.

मानवी शक्तीचे वैचित्र्यपूर्ण दर्शन अशा प्रकारच्या कथांतून घडविले गेले. या कथांमधील नायक-नायिकांवर संकटामागून संकटे येतात. त्यावेळी अद्भूत, अतिमानवी शक्तींकडून त्यांना साहाय्य मिळते. त्यांची संकटातून सुटका होते. हा अनुभवविश्वाचा आकृतिबंध श्रोत्याला आपले कष्टमय जीवन जगण्यास बळ पुरविणारा ठरतो. तसेच आपल्याला कोणाची ना कोणाची मदत मिळून आपले जगणे सुखकारक होईल असा विश्वास निर्माण करण्यास हा आकृतिबंध साहाय्यभूत ठरतो.

ऐतिहासिकतेचा आधार असलेल्या कथांचे एक समृद्ध दालन लोकसाहित्यात आढळून येते. सभोवतालच्या सामान्य माणसांचे भावजीवनही लोककथांनी कथांच्या केंद्रस्थानी आणलेले आहे. सामान्य माणसांच्या जगण्यातील साधेपणा, त्यांच्या आयुष्यात घडणाऱ्या घटना यांनी कथाविश्व भरुन गेले. व्यक्तीची भावनात्मकता, चतुरता, हुशारी, चलाखी, सद्सद् बुद्धी, तिची सहनशीलता, तिच्यातील नाठाळपणा अशा विविध मानवी गुणांभोवती हे कथांचे अनुभवविश्व केंद्रित झालेले आहे. महाराष्ट्रात आणि भारतात अशा प्रकारचे अनुभवविश्व असलेल्या कथा निर्माण झाल्या. त्या 'वास्तव' लोककथा म्हणून ओळखल्या गेल्या.

प्राचीन काळापासून माणसाला प्राणिमात्रांच्या जीवनाबद्दल कुतूहल आणि अफाट जिव्हाळा आहे. प्राण्यांच्या निरीक्षणातून आणि मानवी स्वभावाच्या परीक्षणातून माणसाने प्राणीसृष्टीचा मानवसृष्टीशी सुमेळ साधणारी आशयसूत्रे हेरुन कथा निर्माण केल्या आहेत. या कथांमध्ये प्राण्यांचे केवळ मानुषीकरणच झाले नाही. माणूस जे जे करतो ते ते प्राणी करतात. कधी कधी ते माणसाच्या वागण्यापेक्षाही चांगला वर्तन व्यवहार करतात. मानवी विसंगतीचे दर्शन, दोषांचे दर्शन प्राण्यांच्या स्वभावातून दाखवून विनोद निर्मितीबरोबर नीतीचे पाठ देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो.

माणसाचे भ्रष्ट आचार- विचार, त्याचे अनैतिक वर्तन, स्वार्थ, लंपटपणा या भावनांचे विडंबन करणाऱ्या हास्यकथा सांगितल्या जाऊ लागल्या. पुरुषविषयक तसेच कौटुंबिक नात्याच्या हास्यकथा या कथांमधून मानवी स्वभावातील विसंगतीचे दर्शन घडते. विडंबन वर्णनातून सदाचार, शहाणपणा याचे शिक्षणच लोकसमूहात प्राप्त झाले. अशा रीतीने मराठी लोककथांतील आशयसूत्रे व अनुभवविश्व विविधांगी असून समग्र जीवन आणि आचार कवेत घेणारे आहे.

## ३.९ लोककथांतील कल्पनाबंध

कल्पनाबंध म्हणजे लोककथांचा असा एक मूलघटक जो स्वत: स्वतंत्रपणे स्थिर राहू शकतो. अशा रीतीने स्थिर राहण्यासाठी त्यांच्यात कोणते तरी असाधारण तत्त्व असते.

कल्पनाबंध किंवा कथाबीज (Motif) हा कथेचा असा लहानातील लहान घटक असतो. ज्याच्यात परंपरेने टिकून राहाण्याचा धर्म असतो. परंपरेने टिकून राहाण्याचे सामर्थ्य कल्पनाबंधात (Motif) येण्यासाठी त्याच्यात असामान्य आणि वेधक असे सत्त्व असावे लागते असे स्टीथ थॉम्पसनने म्हटले आहे.

लोककथेची जडणघडण कल्पनाबंधातून होत असते. त्यामुळे कल्पनाबंध हा कथारचनेतला महत्त्वाचा घटक असतो. कल्पनाबंधाशिवाय कथेचे अस्तित्व संभवत नाही.

लोककथेत येणारे कल्पनाबंध तीन प्रकारचे असतात असे स्टीथ थॉम्पसन याने सांगितले आहे. १. देवता, असाधारण पशू, आश्चर्यजनक प्राणी, राक्षस, अप्सरा, नाग, तसेच मानव, विशेष कर्तृत्व बजावणाऱ्या शक्ती विषयीचे कल्पनाबंध. २. जादूच्या वस्तूसंबंधीचे कल्पनाबंध. ३. लोककथांत घडणाऱ्या घटनासंबंधीचे कल्पनाबंध. या कल्पनाबंधाशी 'कर्तृत्व', 'वस्तू', 'घटना' या तीन घटकांचा संबंध असतो. लोककथांचे जे अनेक प्रकार दिसून येतात, त्या प्रत्येक प्रकारातील कथांतून हे तीनही घटक आढळतात.

कथानकाच्या सर्वच घटकांना कल्पनाबंध व्यापून असतात. कल्पनाबंधाशिवाय लोककथा अशक्य असते. कल्पनाबंधाच्या आधारे जागतिक लोककथांचे अध्ययन करणे शक्य होते. कथाविशेषांमध्ये भिन्नता शक्य असते, परंतु कल्पनाबंधात एकात्मता असते. त्यामुळे जागतिक लोककथांचा अभ्यास करावयाचा असेल तर सर्व कल्पनाबंधांचा अनुक्रम तयार करुन त्यांच्या मूलस्वरुपात अभ्यास केला जातो.

लोकसाहित्य विशारद स्टिथ थॉम्पसन याने कल्पनाबंधाचा अभ्यास करून कल्पनाबंधांची एक सूची तयार केली.

### ३.९.१ दैवतकथांमधील कल्पनाबंध:

दैवतकथा हा लोककथांतील एक प्राचीन प्रकार आहे. यात शंकर-पार्वतीचा फेरा, देवाचे मानवांना साहाय्य, नारायणाने ब्राह्मणाच्या रूपात येणे. देवाने सत्वपरीक्षा घेणे, दिवा पाहून लक्ष्मी प्रसन्न होणे, मरीआईचा फेरा येणे या कल्पनाबंधांचा समावेश दैवतकथाच्या कल्पनाबंधांत होतो. म्हणजेच देव, यक्ष, गंधर्व, किन्नर व सांस्कृतिक महत्त्वाचे वीर यासंबंधीचे कल्पनाबंध समाविष्ट होतात. मानवी जीवन निर्मिती, मानवी विश्वाचे पालन व त्याचा नाश या संबंधीचेही कल्पनाबंध दैवतकथांमध्ये आढळतात. उदा. 'मनू आणि मासा' ही कथा विश्वउत्पत्तीच्या कल्पनाबंधातून निर्माण झाली आहे.

### ३.९.२ प्राणीविषयक कल्पनाबंध:

लोककथांचे विश्व विविध प्रकारच्या प्राण्यांनी व्यापलेले असते. हे प्राणी नेहमीचे असतात. तसेच ते प्राणी अद्भूत विश्वातील असतात. काही प्राण्यांना मानवी गुण असतात. ते मानवांसारखे व्यवहार करतात. उडणारा घोडा, वनगाईचे साहाय्य, पशूशी मानवाचा विवाह

होणे, पक्षांनी मोती देणे, पक्षांनी भविष्य सांगणे, तसेच नागविषयक निरनिराळे कल्पनाबंध हे प्राणीविषयक कल्पनाबंधात समाविष्ट होतात.

### ३.९.३ निषेधपर कल्पनाबंध:

लोकसाहित्यातील विश्व हे संस्कृतीशासित विश्व आहे. संस्कृतीने काही विधिनिषेध ठरविलेले असतात. हे निषेध संस्कृतीतील चारित्र्यकल्पनेशी निगडित असतात. नायकाने बोलू नये, पावा वाजवू नये, मागे बघू नये, स्पर्श करु नये, फळ न खाणे, खाण्याविषयक निषेध, विशिष्ट गोष्टी बोलणे या विषयीचेही निर्बंध लोककथांतील पात्रचित्रणावर असतात.

### ३.९.४ धातुविषयक कल्पनाबंध:

लोकसमाजातील सारेच व्यवहार यातुशी निगडित असतात. त्यामुळे लोककथेचे अवघे विश्व यातुने असे भारलेले असते तसेच ते अद्भूतानेही भारलेले असते. म्हणूनच जादूची छडी, जादूची सतरंजी, जादूचा पावा, महाल उडवणे, अदृश्य होणे, माणसाचे रूपांतर प्राण्यात होणे, चेटकीण स्त्रिया, उडणाऱ्या खडावा, गुप्त करणारी टोपी, जादूची वनस्पती असे कल्पनाबंध समाविष्ट असतात.

### ३.९.५ मृत्यूविषयक कल्पनाबंध:

- **पुनर्चेतना:** अहिल्येची शीळा होणे व पुन्हा जिवंत होणे, पाणी, रक्त शिंपडल्याने मृत व्यक्ती जिवंत होणे.
- **भूताटकीचा कल्पनाबंध:** भूताटकीचा संचार सर्वत्र असणे.
- **पुनर्जन्म:** चौऱ्याऐंशी लक्ष्य योनी फिरुन मानव पुन्हा पुन्हा विविध जन्म घेऊन या पृथ्वीतलावर अवतरतो.

झाडाचा पाला हुंगल्यास जीव पुन्हा येतो. अशा अनेक कल्पनाबंधाचा समावेश होतो.

### ३.९.६ चमत्कारासंबंधीचे कल्पनाबंध:

लोककथांमधील अनेक घटना-प्रसंग हे चमत्कृतीने व्यापलेले असतात. अशावेळी पृथ्वीवरील माणसांचा स्वर्गात, पाताळात, सहजरित्या प्रवेश होतो. तसेच लोककथेतील काही पात्रे ही चमत्कारिक असतात. उदा. अर्धशरीर मानव व अर्धशरीर प्राणी.

अप्सराचे कल्पनाबंध, नागलोक, फळ खाल्ल्याने मूल होणे, घोडी नवरी, पाखराच्या रुपात नायिका, केळी खाल्ल्याने शिंगे फुटणे असे कल्पनाबंध हे चमत्काराचे कल्पनाबंध म्हणून ओळखले जातात.

### ३.९.७ चेटूकसंबंधी कल्पनाबंध:

लोककथांमध्ये राक्षस, राक्षसिणी यांचा मुक्तसंचार असतो. चेटूक करणाऱ्या राक्षसिणी, जादूगार, साधूंचे चेटूक असे कल्पनाबंध लोककथांत आढळतात.

### ३.९.८ दिव्य किंवा परीक्षा:

लोककथाविश्वात विविध प्रकारच्या परीक्षांना, दिव्यांना माणसांना सामोरे जावे लागते. चातुर्य परीक्षा, साहसाची परीक्षा, शीलचारित्र्य परीक्षा, अग्नीदिव्य, स्वप्नांचा अर्थ सांगणे, प्रश्नांची उत्तरे देणे, राज्यकन्येचा पण, ओळख पटविणे अशा प्रकारच्या कल्पनाबंधातून लोककथांची निर्मिती झालेली दिसून येते.

### ३.९.९ चातुर्य व मुर्खपणांचे कल्पनाबंध:

प्राणीकथा, पशुकथा आणि विशेषत: नीतिकथांतून माणसांच्या, प्राण्यांच्या चातुर्याच्या, साहसाच्या हकिकती कल्पिलेल्या असतात.

बुद्धिमान आणि मूर्ख, मूर्ख राजा, मूर्ख सावकार, लहान भाऊ बुद्धिमान, मूर्ख जावई, बायकोची हुशारी, चातुर्याने सुटका करुन घेणे किंवा निसटणे अशा प्रकारच्या कल्पनाबंधातून कथा आकारास आलेल्या दिसतात.

### ३.९.१० फसवणूक किंवा धोका यांचे कल्पनाबंध:

लोककथांमध्ये अनेक पात्रांच्या वाट्याला फसवणूक आलेली असते. काही पात्रे लबाडी करतात. दुसऱ्यांना धोका देतात. उदा. बायकोने नवऱ्यास फसवणे, व्यभिचारी पत्नी, कपटी मित्र, धोक्याने पकडणे, विश्वास घात, राजपुत्र लहान भावाला फसवतो, राजकन्या बापाला फसवणे, सावत्र भावाला फसवणे, वेश पालटून निघणे, राजकन्येने पुरुष वेषांत वावरणे, असे कल्पनाबंध आहेत.

### ३.९.११ भाग्योदयाचे कल्पनाबंध:

राजपुत्राचा भाग्योदय होणे, शंकराच्या कृपेने भाग्य उजळणे, भुतांच्या कृपेने धनलाभ, नावडतीचे मूल भाग्यवान, राज्यकन्येबरोबर अर्ध्या राज्याची प्राप्ती असे कल्पनाबंध हे लोककथांत येतात.

### ३.९.१२ पुरस्कार व दंड कल्पनाबंध:

सोनेरी केसांच्या माणसास शोधून काढण्यासाठी पुरस्कार, राजाच्या प्रश्नांची उत्तरे न दिल्यास दंड, दुर्लभ वस्तूच्या प्राप्तीमुळे राजाकडून बक्षीस अशा कल्पनाबंधातून लोककथांची निर्मिती साधलेली दिसून येते.

### ३.९.१३ कौर्याचे कल्पनाबंध:

देवीला मुलगा बळी देणे, सवतीचे क्रौर्य, सावत्र मुलाचा सावत्र आईने त्याग करण्यास भाग पाडणे. बायकोच्या इच्छेखातर भावाने बहिणीला मारणे, कर्तृत्वाचे श्रेय घेण्यासाठी लहान भावाचे खून करणे असे कल्पनाबंध लोककथांच्या निर्मितीत साह्यभूत ठरतात.

### ३.९.१४ काम, प्रेम, विवाह:

पऱ्यांच्या मनात मानवी तरुणाविषयी कामवासना निर्माण होणे, राक्षसकन्यांचे राजपुत्रावर प्रेम, सावकाराच्या मुलीचे प्रधान पुत्रावर प्रेम, कुरुप कलावंत राजपुत्राचे राज्यकन्येशी लग्न,

फळ खाल्ल्याने पुत्र प्राप्ती, डाळिंबातून मुलगी असे कल्पनाबंध आहेत. त्यामधून लोककथांची निर्मिती केलेली दिसून येते.

मराठी लोककथांमध्ये काही कल्पनाबंध लोकप्रिय झालेले आहेत.

१. सत्वपरीक्षा-चिलया बाळ कथा, राजा हरिश्चंद्र- तारामती कथा.

२. मरीआईचा फेरा होणे.

३. मानवावरील संकटसमयी देवांनी धावून येणे- ध्रुवबाळ कथा

४. लाकडाचा घोडा आकाशात उडणे- राजा विक्रम.

५. माणसाचे पशूंशी लग्न होणे- गदर्भगंधर्व कथा.

६. मनुष्यवाणीत पक्षी बोलणे, त्यांनी भविष्य कथन करणे- शुक्र बहात्तरी.

७. माणसाचे प्राण्यात रूपांतर होणे.

८. विशिष्ट फळ खाल्ल्याने मूल होणे- राम जन्म कथा

९. नावडत्या राणीचे मूल भाग्यवान निपजणे.

१०. भविष्यवाणी होणे : कंसवध

११. देवीला बळी देणे.

१२. सावत्र आईने सावत्रमुलाचा छळ करणे.

१३. जादूच्या काडीने हवे ते प्राप्त करुन घेणे.

१४. हुशार बायको, मूर्ख नवरा.

१५. साहसी राजपुत्र. इत्यादी.

## ३.१० लोककथा संरचना

कथाबीज, कथानक, पात्र, वातावरण, निवेदक, निवेदन पद्धती आणि भाषा हेच लोककथेचे घटक असतात.

### ३.१०.१ कथाबीज:

कथेत कोणता तरी जीवनानुभव कल्पकतापूर्णतेने आविष्कृत झालेला असतो. त्यालाच त्या कथेचे कथाबीज असे म्हणतात. कथाबीजातून कथेच्या कलात्मक अनुभवविश्वाचा जन्म झालेला असतो. कथेच्या बीजातून वा अनुभवार्थातून कथेतील घटना, कथानक, पात्रे, वातावरण हे घटक निर्माण होतात आणि ते कथासृष्टीची निर्मिती करतात. म्हणून कथाबीज कथा घटकांना एकात्म करते असे म्हटले जाते.

### ३.१०.२ कथानक:

कथानक हे विशिष्ट अंगाने घटनांची एक मालिकाच असते. कथेमधील पात्रे आणि घटना विशिष्ट अंगांनी कथानकाची उभारणी करतात. पात्रे घटना घडवितात आणि घटना पात्रांनाही घडवितात. कथानक आकारात येते. कथानक, त्यांचे स्वरुप यानुसार लोककथा ओळखल्या जातात. कथेत निवेदक असतो किंवा बाहेरचा निवेदक असतो. त्याच्या निवेदनातून कथानकाची उभारणी होत असते. लोककथेच्या कथानकात प्रधान व गौण अशा दोन्ही प्रकारच्या घटना घडतात. या दोन्ही प्रकारच्या घटनांच्या अर्थपूर्ण गुंफणीमधून कथानक पूर्णत्वास जात असते. कथानक पूर्णत्वास नेणारा कथानकातील महत्त्वाचा घटक म्हणजे काळ होय. कथा विशिष्ट काळातच घडत असते; म्हणजे कथानकाचा आरंभ, मध्य, शेवट अशा तीन अवस्थांत कथेचा काळ व्यापलेला असतो. हा काळ कथेचा आरंभ आणि शेवट यांना एकत्र करुन कथा संरचित करतो.

### ३.१०.३ घटना:

घटना आणि पात्रे हे गोष्टींचे प्रमुख घटक आहेत. घटना व पात्रे परस्परांना घडवीत कथानकाची उभारणी करतात. पात्रे आपल्या कृतींनी घटना घडवीत असतात. तर घटना ही पात्रांना घडवीत असतात. पात्रांच्या कृतींमुळे जेव्हा घटना निर्माण होतात, तेव्हा ते पात्र त्या घटनेचा कर्ता म्हणून वर्तत असते. घटनांच्या गुंफणीमधून कथेमध्ये कथानक रचले जाते. घटना ह्या विशिष्ट काळी व स्थळी घडत असतात. ह्या घडलेल्या घटनांचे निवेदन करणारा कोणीतरी निवेदक असावा लागतो. निवेदक घटनांचे निवेदन करताना घटनांची आपल्या विशिष्ट दृष्टीने गुंफण करतो. या गुंफणीमागे कोणतेतरी संघटना तत्त्व असते. काळक्रम, कार्यकारणभाव, संभवनियता आदी तत्त्वानुसार घटनांची गुंफण होऊन कथानक आकाराला येते. काही वेळा आकस्मिक, अकारण, अकल्पित घटना घडत असतात.

### ३.१०.४ पात्र:

लोककथेतील पात्र कथासंहितेचा एक अंगभूत घटक असते, पात्र कथानक घडवीत असते आणि मानवी भावजीवनाशी आपला संबंध जोडीत असते. या अर्थाने कथेतील पात्राला एक विशिष्ट स्वभाव आणि स्वरुप प्राप्त झालेले असते. उदा. उर्वशी, अहिल्या, राजा विक्रम, नागदत्त श्रेष्ठी, सुकेत श्रेष्ठी ही मराठी लोककथांतील पात्रे विशिष्ट स्वभावाची संकेतरुप पात्रे आहेत. लोकमानसातील विशिष्ट वृत्तीची ती द्योतक आहेत. कथेत विशिष्ट कार्य करण्यासाठी ती निर्माण झालेली असतात. ही पात्रे वाचक-श्रोत्यांच्या अनुभवाचा विषय बनत असतात. पात्रांच्या वृतिप्रवृत्तींचे, कृतींचे अर्थ लावून वाचक, श्रोता ती पात्रे समजून घेत असतात. यादृष्टीने कथागत पात्रांना जरी कथेबाहेर स्थान नसले, तरी या पात्रांना कथेप्रमाणेच समूहजीवनातही विशिष्ट प्रकारचे कार्य असते.

### ३.१०.५ वातावरण:

लोककथा कोणत्याही प्रकारची असली तरी शेवटी ते एक कल्पनानिर्मित विश्व असते. या विश्वात पात्रे विशिष्ट परिस्थितीत, विशिष्ट वातावरणात विशिष्ट प्रकारच्या कृती करीत असतात. पात्रांच्या या कृतींना एक काल्पनिक, भौगोलिक अशी आधारभूमी कथेत प्राप्त झालेली असते. ती वास्तवाचा आभास निर्माण करीत असते. त्यात घडणाऱ्या घटना

प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांसारख्याच असतात. तशाच कित्येकदा वास्तवापासून दूर असणाऱ्या पण कथागत वास्तवात योग्य वाटणाऱ्याही असतात. कथागत पात्रांचा व्यवहार ज्या परिस्थितीत व ज्या पद्धतीने घडत असतो, त्यामुळेच ती पात्रे व त्यांचे विश्व आपल्याला पटत असते, ते वातावरण या घटकामुळेच होय. या अर्थाने वातावरण हा घटक कथेत महत्त्वाचे कार्य बजावत असतो.

### ३.१०.६ निवेदक:

एक होता राजा. त्याला दोन राण्या होत्या. एक होती आवडती. एक होती नावडती. आवडती होती अहंकारी. नावडती गरीब बिचारी. आवडतीचा भपकारा नावडतीचा पुंगी पसारा.

- लेकुरवाळ्या बायका. कथा तुमी आयका. कथा आहे व्रताची. इडापिडा टाळण्याची. उतू नका. मातू नका. घेतला वसा टाकू नका. गाईला प्यारे वासरू तसे मायला लेकरू. कथा अशी गांजल्या जिवाची.

- एका गावात एक शेतकरी राहात होता. त्याने खूप काबाडकष्ट करुन संसार केला. इगूत निगूत केली. पैसा अडका जोडला.

वरील तिन्ही निवेदने मराठी लोककथांत आलेली आहेत. ही निवेदने पाहाता असे दिसते की, कथेतील निवेदक श्रोत्यांना विशिष्ट दृष्टीने कथा सांगत आहे. त्याने जो अनुभव घेतला आहे तो श्रोत्यांना सांगावयाचा आहे. म्हणून तो विशिष्ट आवाज वापरुन सांगत आहे. कथा सांगण्याची प्रत्येक निवेदकाची एकच शैली नाही. तीनही कथांत तीन प्रकारच्या शैली आहेत. परंतु एक गोष्ट प्रकर्षाने दिसते, की ज्या अर्थी निवेदक विश्वासाने काही सांगू पाहात आहे त्या अर्थी त्याला कथागत विश्वातील सगळं काही ठाऊक आहे. म्हणजे तो सर्वसाक्षी व सर्वज्ञ निवेदक आहे. अर्थात प्रत्येक कथेतील निवेदक असा एकाच पद्धतीने काही सांगेल असे नाही. एखाद्यावेळी तो कथेचे कथानक, पात्रे, प्रसंग यांच्याकडे समरसून आतून पाहिल. तर कधी तटस्थ वृत्तीने बाहेरुन पाहिल. तर कधी तो वेगळ्या मूल्यदृष्टीने कथेकडे पाहिल. स्वत:च्या विचारप्रणालीने स्वत:च्या विशिष्ट श्रद्धाभावाने कथा सांगेल. याचा अर्थ कथेत निवेदक विविध प्रकारचे असतात. कथेगणिक निवेदकाची भूमिका वेगवेगळी असू शकते. पुन्हा हा निवेदक एकाच आवाजात कथा सांगत नाही. तो कधी कधी बोली भाषेतून बोलतो. संहितीकरण झालेल्या कथेतून तो प्रमाणभाषेतून बोलतो. विशिष्ट शब्द, वाक्ये विशिष्ट पद्धतीने वापरून बोलतो. विशिष्ट लकबीमुळे त्यांची विशिष्ट अशी शैली तयार होते. म्हणूनच लोककथांना विविध शैली प्राप्त झालेल्या असतात.

कथेतील निवेदक हा स्त्री किंवा पुरुष असतो. पण याच्याशी कथेचा काही संबंध असतो का? तर तसा संबंध असतो. हा निवेदक कोणत्या प्रकारच्या संस्कृतीचा पुरस्कार करतो, तो कोणता दृष्टिकोन स्वीकारतो, कोणती विचारप्रणाली स्वीकारतो याला महत्त्व असते. निवेदकाच्या दृष्टिकोनाचा, विचारप्रणालीचा कथेवर परिणाम होत असतो. कथेतील निवेदन वर्णनात्मक, संवादात्मक, भाष्यात्मक असू शकते. निवेदन पद्धतीच्या आधारे निवेदक कथेची गुंफण करतो.

लोककथेचा लौकिक लेखक नसतो. लोककथा ही संपूर्ण समूहमनाची निर्मिती असते. ललित कथेत लौकिक लेखक असतो. आणि कथेतही एक गर्भित लेखक असतो. लोककथेच्या बाबतीत असे नसते. लोककथेत समूहमन हे पुरुष वा स्त्री भूमिकेतून कथा कथन करीत असते. लोककथेचा श्रोता विशिष्ट सांस्कृतिक जीवनाचा एक अविभाज्य घटक असतो. विशिष्ट कथा कशी समजून घ्यायची त्यासंदर्भातील ज्ञान त्या श्रोत्याला असते. याचा अर्थ लोककथा सांस्कृतिक पर्यावरणातच बांधील राहाते असे नाही. ती कथा समरुप मानवी समूहाची असते.

## ३.११ लोककथेची भाषा

लोककथा हे संपूर्ण काल्पनिक विश्व असते आणि ते भाषेच्या आधारानेच अस्तित्वात आलेले असते. ग्रंथनिविष्ट वा संहिताबद्ध लोककथा वाचक वाचतो वा मौखिक कथा श्रोता श्रवण करतो, ऐकतो तेव्हा त्याच्या मनात कथागत एका काल्पनिक विश्वाची प्रतिमा निर्माण होते. असे हे काल्पनिक विश्व वाचकांच्या वा श्रोत्यांच्या मनात निर्माण करणे हे लोककथेच्या भाषेचे महत्त्वाचे कार्य असते. “तालबद्ध गद्याचा व्यवस्थित विचार झाल्याशिवाय लोककथांच्या कथनशैलीचे नीट आकलन होणार नाही. जिला चूर्णाप्रमाणे वृत्ताचा गंध नाही. पण खुद्द गद्याच्याच बांधणीतून विशिष्ट नाद अंकुरित होत आहेत. विशिष्ट आंदोलनात्मक गती प्रतीत होत आहे. आणि ते गद्य म्हणताना स्वरही गद्याची मर्यादा ओलंडून विशिष्ट गद्याची लबक धारण करतो. ते गद्य उघड गीताप्रमाणेच श्राव्य गद्य असते.” हे दुर्गाबाई भागवत यांचे भाषेविषयीचे मत लक्षणीय ठरावे.

दुर्गाबाई भागवतांच्या मते, लोककथेची भाषा ही तालबद्ध लोकगद्याची असते. ‘अटंग्या बनात बटंग्या डोंगरात एक नगरी होती. गोदागंगा वाहत होती. माणसं सुखी होती. गोदेच्या काठावर पोरी पाणी भरीत होत्या. घागरी घरी रिचवित होत्या.’ अशी तालबद्ध भाषा वापरलेली दिसून येते. (नागवंशी सातवाहन कथा)

‘ऐका ऐका कहाणी. कहाणी आहे पुराणी. कहाणी त्यागाची. कहाणी दानधर्मांची. धर्म म्हणजे त्याग. हाच धर्म पण लोकांना कळत नाही. कळते पण वळत नाही.’ (त्याग हाच धर्म) ह्या उदाहरणांवरुन लोककथेची भाषा, त्यातील तालबद्धता अधोरेखित झालेली दिसून येते.

वरील कहाण्या एका विशिष्ट ठेक्यात सांगितल्या जातात. कुठे थांबायचे, कुठे श्वास घ्यायचा. कुठे सूर उंच लागायचा. कुठे संथपणे हळूहळू कथन करायचे. संभाषणाचा भाग अविर्भावांनी व मुद्राभिनयाने कसा नाट्यपूर्ण करायचा हे सर्व जसे काही ठरल्याप्रमाणे असते.

लोककथा सांगताना वापरलेली एक विशिष्ट धाटणी असते. त्या धटणीतूनच अशा प्रकारचे लोकगद्य, लोककथा जन्माला येत असते. तरीही लोकभाषा ही साधी, व्यवहारी, वास्तवाचा निर्देश करणारी असते. ती स्थलाचा, अवकाशाचा, भौगोलिक परिसराचा निर्देश करीत असते. भाषा व्यावहारिक असली तरी ती कथेतील कल्पित स्थळ आणि अवकाश निर्माण करण्याचे कार्य करीत असते. अटंग्या बनात व बटंग्या डोंगरात वसलेल्या नगरीचे ‘स्थळ’ निर्माण करते.

लोककथामध्ये जो विषय वर्णिलेला असतो त्याचे महत्त्व स्पष्ट केलेले असते. तसेच स्वरुपही स्पष्ट केलेले असते. कथेत गतिमान संवादवाक्ये असतात. ती पात्रमनातील भावना, विचार, विकार साकार करीत असतात. थोडक्यात कथेच्या भाषेतून वर्णन, निवेदन, संवाद व चिंतनपर भाष्य प्रकट होते आणि त्यातून कथेचे विश्व साकारते.

## ३.१२ लोककथेचे कथात्म ललित साहित्याला योगदान

लोकांनी लोकांसाठी लोकांच्या भाषेतून निर्माण केलेले साहित्य हे लोकसाहित्य होय. लोकसाहित्याची निर्मिती लोकसमाजातूनच झालेली असते. त्यामुळे लोकसाहित्याची भाषा ही लोकसमाजाच्या कल्पित साहित्यविश्वाला साकारणारी भाषा असते. लोकसाहित्य ही समूहमनाची निर्मिती असते. साहजिकच प्रत्येक व्यक्तीचे अनुभवविश्व निराळे असते आणि समूहाचे अनुभव निराळे असतात. म्हणूनच लोककथेने ललित साहित्याला कोणत्या गोष्टी बहाल केल्या आहेत हे पाहता येईल.

मूळ संस्कृत भाषेतील पंचतंत्र, जातककथा यात जी सरळता व सुश्राव्यता आहे. मालाकथांमध्ये जी तालबद्धता आहे, ती प्रथम भाषांतरित मराठी लोककथेत आली आणि तिथून ती ललित साहित्यात आली आहे हे लक्षात घेतले पाहिजे. लोककथांतील कल्पनाबंध, कथाविशेष कथनपर ललित साहित्याने सहजपणे आपल्यात सामावून घेतले आहेत, लोककथांमधील आशयाचीही उसनवारी मराठी कथनपर ललितसाहित्याने केल्याचे दिसून येते. मराठी कथा, नाटक, काव्य या वाङ्मयप्रकारांचा प्रारंभ हा लोकवाङ्मयातच सापडू शकतो, असे नेहमीच म्हटले जाते. या संदर्भातील अभिजात वाङ्मय व ललितवाङ्मय यांच्या मूळ प्रेरणा भारतीय लोकसाहित्यात दडलेल्या आहेत असे डॉ. विटंरनिझ याने म्हटले आहे.

लोकसाहित्यात परिकथा व त्यातील कल्पनाबंध त्यांचे रचनाविशेष, त्यांतील निवेदन कौशल्य स्वीकारुन मराठीत परिकथा किंवा त्यासारख्या कथा लिहिल्या गेल्या आहेत. दोहोंच्या कथारुपात साम्य असले तरी मूळ लोककथा प्रकारांवर आधारुनच त्या लिहिल्या गेल्या आहेत. आधुनिक मराठी लघुकथाकारांनी लोककथेची सोबत सोडलेली नाही. वि. सं. खांडेकर, गंगाधर गाडगीळ यांनी रुपककथा लिहिल्या. जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांत, अण्णाभाऊ साठे यांच्या कादंबऱ्यात लोककथांतून आलेली लोकतत्त्वीय दृष्टी आणि गूढता, लोकमानसाची गूढतेकडे असणारी ओढ स्पष्टपणे दिसून येते.

मराठी कथेच्या प्रारंभीच्या काळात 'लिलाचरित्रां'तच लोकतत्त्वांचा संचार झाला आहे; आणि दृष्टान्तकथांतील दृष्टान्तात आधुनिक लघुकथेची बीजे सामावलेली आहेत हे कोणीही अमान्य करणार नाही. उदा. विष्णुशास्त्री बापट यांनी प्रकाशित केलेला 'बालोपदेश कथा' हा संग्रह मुलांस शिक्षोपदेश व्हावा म्हणून परम प्रीतीने नजर केला. या गोष्टींच्या अखेरीस तात्पर्य येते. त्या कथांचे स्वरुप नीतिकथेचे असून ज्याचे लेखन लोककथांच्या अंगाने झाले आहे.

रा. ब. मोरोबा, कान्होबा विजयकर यांनी लिहिलेला 'घाशिराम कोतवाल' या कथासंग्रहाचा आदर्श हा लोककथेचाच आहे. या साखळी कथांचे स्वरुप हे कादंबरी सारखेच आहे. तसेच वामन चोरघडे यांच्या अनेक कथांच्या निवेदनाचा ढंग कहाणीचा आहे. पुनर्जन्म, कष्टाची

कहाणी, महायात्रा, म्हातारीची गोष्ट यासारख्या त्यांच्या कथा लोककथेच्या धर्तीवरच्या असल्याचे लक्षात येते. द.मा.मिरासदार यांच्याही कथनशैलीवर लोककथेतील कहाणीच्या शैलीचा प्रभाव ठळकपणे जाणवतो.

## ३.१३ लोककथेचा समाजाशी अंतर्लक्ष्यी, बहिर्लक्ष्यी संबंध

लोकवाङ्मयातून लोकसमूहाची वैशिष्ट्ये, भावभावना, समजुती, रुढी यांचे प्रकटीकरण अपरिहार्यपणे होत असते. त्यातून कुटुंबव्यवस्था, कौटुंबिक व्यक्तीचे परस्पर संबंध, समाजातील विविध जातीजमातींचे परस्परसंबंध व एकमेकांबद्दलची मतमतांतरे यांचे सहजरित्या दर्शन घडते. यावरुन लोककथांचा समाजाशी असलेला संबंध कळतो.

जन्म, उपनयन, विवाहसंस्कार, मृत्यू, दहन आणि विधिवैकल्ये यासंबंधीच्या वैविध्यपूर्ण संस्काराचे स्वरुप लोककथांतून कळते. त्याचबरोबर या लोककथांमधून माणसांचे भवितव्य ब्रह्मदेव ठरवतो. माणसाचे दैव पूर्वकर्मानुसार जन्मल्याबरोबर निश्चित होते. यासारख्या समजुती समाजात रुढ असल्याचे निदर्शनास येते. व्रतकथांमधून विविध देवता आणि विशिष्ट प्रकारच्या देवदेवता यांचे समाजातील स्थान कळते. या देवदेवतांना कौल लावून शुभाशुभाचा विचार केला जातो. दानधर्मांचे महत्त्व, परोपकाराचे फळ, पतिव्रता धर्मांची थोरवी, अतिथ्यधर्माचे पालन यासारख्या अनेक गोष्टींचा प्रसार हा लोककथांतून झालेला दिसून येतो. लोककथांमधून प्रकटणारे अनुभवविश्व लोकमाणसाला वळण लावण्याचे काम करतात.

लोककथांमधून मानवी नातेसंबंधांचे तसेच नात्यांमधील संघर्ष वा सौख्य यांचे कलात्म चित्रण झालेले आढळते. त्यामुळेच लोककथांचे समाजाशी असलेले अंतर्लक्ष्यी बहिर्लक्ष्यी संबंध हे स्पष्ट होतात.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न. तुम्ही ऐकलेल्या कोणत्याही लोककथेचे स्वरुप, विशेष नोंदवा.**

## ३.१४ सारांश

एकूणच सदरील घटकामध्ये आपण लोकसाहित्यातील लोककथा प्रकाराची परंपरा व तिच्या स्वरुप-विशेषांबाबत चर्चा केली. लोककथेचा विचार करत असताना तिच्या

उगमस्थानाविषयीचे अभ्यासकांचे म्हणणे पाहून तिच्या भारतीय व मराठी परंपरेचा विचारही आपण यात केला. तसेच विविध प्रकार, तिचे वैशिष्ट्ये, आशयसूत्रे, कल्पनाबंध, संरचना या बाबींचाही विचार-आपण इथे केला.

आधुनिक ललित कथासाहित्याचे मूळ आपल्याला या लोककथातून दिसते. कथा संरचनेचा बंध आजच्या लिखित कथावाङ्मयातून दिसतो. तसेच लोककथेचे समाजाशी असलेले जोडलेपण हा महत्त्वाचा विशेष ललित कथावाङ्मयाच्या भरभराटीस पोषक ठरलेला दिसतो. एकूणच मौखिकतेपासून लिखित साहित्याच्या प्रवासातील लोककथा या आद्यबिंदू ठरतात. तिच्या अभ्यासातून कथावाङ्मयाचे स्वरुप व महत्त्व ध्यानात येते.

## ३.१५ संदर्भग्रंथसूची


भागवत, दुर्गा : ‘लोकसाहित्याची रूपरेखा’, वरदा प्रकाशन पुणे.

मांडे, प्रभाकर : ‘लोकसाहित्याचे अंत:प्रवाह’, गोदावरी प्रकाशन, अहमदनगर.

व्यवहारे, शरद : ‘लोकवाङ्मय : रूप स्वरूप’, रजत प्रकाशन, औरंगाबाद.


## ३.१६ स्वयंअध्ययन

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. लोककथा म्हणजे काय ते सांगून लोककथेचे स्वरुप विशद करा.

२. मराठी कथेचे उगमस्थान आणि उत्पत्ती यासंबंधी चर्चा करा.

३. मराठी लोककथेचे प्रमुख प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. मराठी लोककथांच्या कल्पनाबंधाची चर्चा करा.

२. मराठी लोककथेचे मराठी साहित्याला योगदान.

३. लोककथेची भाषा

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कान्होबा विजयकर व रा. ब. मोरोबा यांनी लिहिलेल्या कथा-संग्रहाचे नाव काय?

२. ‘भारत हाच लोककथेचे मूळ आहे’ असे प्रतिपादन कोणत्या अभ्यासकाने प्रथम केले?

३. पंचतंत्रातील कथा या कोणत्या स्वरुपाच्या कथा आहेत?

*****

# ३ आ

## ‘मराठवाड्यातील लोककथा’

### (लोक शैलीतील एका साहित्यकृतीचा प्रकारलक्ष्यी अभ्यास)

मराठवाडा परिसरातील ‘मराठवाड्यातील लोककथा’ या डॉ. यु.म.पठाण संपादित लोककथा आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी ह्या कथांचे लोककथा प्रकारानुसार गट केलेले आहेत. उदा. दंतकथा, अद्भूत कथा, बोध कथा इत्यादी. याचा अभ्यास या घटकात आपण करणार आहोत.

**घटक रचना**


३.आ.० उद्देश

३.आ.१ प्रास्ताविक

३.आ.२ लोककथा : स्वरूप आणि वैशिष्टे

३.आ.३ ‘मराठवाड्यातील लोककथा’

३.आ.३.१ दंतकथा

३.आ.३.२ अद्भुतकथा

३.आ.३.३ स्वभावदर्शनपर लोककथा

३.आ.३.४ व्रतकथा

३.आ.३.५ निसर्गकथा

३.आ.४ सारांश

३.आ.५ संदर्भग्रंथसूची

३.आ.६ स्वयंअध्ययन


## ३.आ.० उद्देश

१. मराठवाड्यातील लोककथांचे स्वरूप समजून घेणे.

२. मराठवाड्यातील लोककथेचे प्रकार स्पष्ट करणे.

३. या लोककथांचा आशय समजून घेणे.

४. या ग्रंथ समाविष्ट लोककथांचे कल्पनाबंध समजून घेणे.

५. या लोककथांची संरचना समजून घेणे.

६. लोककथांची भाषा, वातावरण यांचे विवेचन करणे.

७. मराठवाड्यातील लोकजीवन, लोकसंस्कृती, लोकरूढी आदी समजून घेणे.

## ३.आ.१ प्रास्ताविक

भारतीय लोकसाहित्य हे भारतीय संस्कृती इतकेच पुरातन आहे असे विधान केल्यास ते वावगे ठरणार नाही. भारतीय साहित्यामध्ये कथनात्म साहित्याला महत्त्वाचे स्थान आहे. कारण भारतीय कथावाङ्मयाने वेगवेगळ्या पद्धतीने जगावर प्रभाव टाकलेला आहे. बौद्ध आणि जैन संप्रदायांनी धर्मप्रसाराच्या कार्यात लोकांना उपदेश करताना 'दृष्टान्त' म्हणून भारतीय कथांचा वापर केलेला आहे. उदा. जातककथा. जेथे जेथे वरील संप्रदायांचा प्रसार झाला तेथे तेथे लोककथा जाऊन पोहोचलेली दिसून येते.

भारतीय लाकसमूहाची कथाप्रियता व त्यामुळे कथा, गीतांना प्राप्त झालेले देवता स्वरूप त्यांना वेगळे अस्तित्व प्राप्त करून देण्याची प्रवृत्ती, या गोष्टी लक्षात घेतल्या तर लोकसाहित्याकडे विशेषत: कथासाहित्याकडे पाहण्याची भारतीय लोकसमूहाची दृष्टी समृद्ध भाविकाची का झाली हे स्पष्ट होते. कथा-कथन केले, गीत गायन केले तर पदरी पुण्य पडते, मंगलाचा लाभ होतो इत्यादी कल्पना भारतीय लोकसमूहात पूर्वीपासूनच रूढ आहेत. त्यामुळे कथा-कथनाकडे भारतीयांचा ओढा दिसून येतो.

धार्मिक आचरणामध्ये भारतीय लोकसमूहाने लोकसाहित्याच्या लोकविधी, लोककला, लोकगीते, लोककथागीते, म्हणी, लोकोक्ती, लोकनाटके इत्यादी अंगाचा वापर केलेला दिसून येतो. त्यामुळे आपले भारतीय लोकसाहित्य धर्मकल्पनांशी निगडित झालेले दिसून येते. भारतीय लोककथेतील व्रतकथा, दैवतकथा व तत्सम लोककथा या दृष्टीने विशेष लक्षणीय ठरतात.

## ३.आ.२ लोककथा स्वरूप आणि वैशिष्टे

**लोककथांचे मूळ:**

भारत ही लोककथांची जागतिक जन्मभूमी मानली जाते. सर्व लोककथांचे मूळ हे 'सूर्यकथा' ह्या जगातल्या सर्वच देशांत व भाषांत आढळून येतात. भारतीय लोकसमूह हे कथाप्रिय मानले जातात. भारतीय लोकसमूहांना धार्मिक व ऐतिहासिक आणि अन्य विषयांचे ज्ञान देण्यासाठी (ऋत्विज्ञ) कथा सांगितल्या जात असत. वैदिक वाङ्मयातही धार्मिक विधी-विधाने, समाजसंस्कृती आणि देवदेवतांच्या संदर्भात अनेक कथा प्रचलित आहेत. त्याचबरोबर महाकाव्ये, महानाट्ये, संवादसुक्ते, बौद्धायन, हरिवंश, विष्णूपुराण, कथासागर, पंचतंत्र, अरेबियन नाईटस्, बृहतकथा, हेतोपदेश, वेताळपंचविशी, सिंहासन बत्तीशी, शुकसप्तती, बौद्धकथा, जैनचूर्णी अशा कितीतरी प्राचीन कथाग्रंथाच्या संदर्भांच्याद्वारे भारतीय लोककथांची समृद्ध परंपरा साकार होते.

**लोककथांचे वर्गीकरण/प्रकार:**

मराठी लोककथांचे स्वरूप व वैशिष्ट्ये लक्षात घेऊन खालीलप्रमाणे लोककथांचे वर्गीकरण केलेले आहे:

**१. दैवतकथा**

**२. परिकथा किंवा अद्भूत कथा.**

**३. उत्पत्तीकथा-स्पष्टीकरणात्मक कथा**

**४. दंतकथा किंवा आख्यायिका**

**५. बोधकथा किंवा प्राणिकथा**

**६. हास्यकथा**

**७. वीरकथा-पराक्रम कथा**

**८. अनुभव कथा. इ.**

**लोककथेची वैशिष्टे:**

सर्वच लोककथांमध्ये अद्भूतरम्यता, अलौकिक व्यक्तिजीवन, वैचित्र्यपूर्ण प्राणिजीवन अशी काही समान वैशिष्ट्ये आढळतात.

**१. लोककथांचा सामान्य विशेष म्हणजे तिच्यात भरून राहिलेली अद्भूतरम्यता होय. ही अद्भूतरम्यता विविध प्रकाराने येते.**

**उदा.**

अ) देव, दानव, राक्षस, यक्ष, परी यांचा संचार हा कथांतून होतो.

ब) जडवस्तूंना मनुष्यवाणी प्राप्त होणे किंवा जडवस्तूनी चमत्कार करणे.

क) मनुष्येतर सजीव पदार्थांकडून अद्भूत वर्तन घडणे.

**२. दुसरा विशेष म्हणजे अलौकिक व्यक्तिजीवन होय.**

लोककथांमध्ये सामान्य माणसांचा वावर असतो. या सामान्य माणसांबरोबर यक्ष, पऱ्या, चेटकिणी, मत्स्यकन्या, नागकन्या यांच्या बरोबरीने अद्भूत देहगुण असलेल्या मानवी व्यक्तींचा लोककथेत वावर असतो. वैचित्र्यपूर्ण असे प्राणिजीवन कल्पिल्याने लोककथांची रंजकता वाढते व अद्भूत रसांची निर्मिती होते.

३. लोककथा ही कोणत्याही एका कथारूपातून (प्रकार) साकार होते.

४. लोककथेच्या मुळाशी असते तो लोकमानस. जीवनदर्शन, लोकस्वभाव यातून व्यक्त होणारे प्राचीन संस्कृतीचे अवशेषरूप लोककथेतून प्रकट होते.

५. लोककथेतून मानवी, अतिमानवी (अतिंद्रिय) अशा विविध प्रकारच्या व्यक्ती, प्राणी, संमिश्र अवस्था असलेली पात्रे (व्यक्तिरेखा) आढळून येतात. काही गौण पात्रेही असतात.

६. लोककथेत कल्पनाबंधाचा वापर केलेला असतो. हे कल्पनाबंध अनेक कथांमध्ये सारखे असू शकतात. कथेची रचना मात्र वेगळी असते.

७. कथा घटना (प्रसंग) हा लोककथेतील महत्त्वाचा घटक मानला जातो.

८. बऱ्याच कथांमध्ये कथाबीज समान असते. त्यांना मूलकथा म्हणतात. कथाबीजाभोवतीच्या घटना (प्रसंग) कल्पनाबंध, व्यक्तिरेखा (पात्रे) ह्या प्रदेशपरत्वे, देशपरत्वे बदलू शकतात. मात्र मूलकथांमध्ये कथाबीज बदलत नाही.

९. कथेतून वातावरण निर्मिती, वर्णने, चित्रमयता यांचा सुरेख वापर केलेला असल्याने ती काव्यसुलभ होते.

१०. कथेची निवेदनशैली ही कथानिवेदनाचे भाषिक-सौंदर्यपूर्ण अंग मानले जाते.

११. कथाहेतू हा लोककथेचा महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. हेतूकथा ही श्रद्धाशील असते.

भारतात आणि महाराष्ट्रात कथावाचन, कथाकथन, कीर्तन, लोककथा, गीतगायन, पोथीपुराण कथावाचनाचे सप्ताह आणि लोककला व लोककलावंत यांचे सादरीकरण याद्वारे या लोककथा जनमानसात प्रचलित राहिल्या आहेत. त्यांचा प्रसार आणि प्रचार होत राहिलेला आहे. शाहिर, गोंधळी, भाट, सूत-मागध चारण, लवकुशी, दशावतार, नमन-खेळे जाखडी याद्वारे लोककथांचे आणि लोककथागीतांचे संकलन, संवर्धन आणि जतन केलेले दिसून येते.

म्हाताऱ्या स्त्रियांनी (आजीबाई) लोककथांचा खजिना गोष्टींच्या माध्यमातून पुढच्या पिढ्यांना देत अनौपचारिक शिक्षणाचा मार्ग जतन केलेला आहे. रामायण, महाभारताच्या तसेच पुराणग्रंथातील अनेक कथांच्या संवर्धन, संरक्षणाचे काम लोककथांच्यामुळे होत आले आहे. त्यातूनच लोकरामायण, लोकमहाभारतातील वेगळेपण लोकसंस्कृतीचा वेगळा असा ठसा उमटवणारे ठरते आहे. मराठी लोककथांचा अभ्यास करावयाचा तर भारतीय परंपरेतील वरील सर्व कथांचा व्यापक विचार केला जातो. वेद, पुराणे, उपनिषदे, ब्राह्मणग्रंथ, आरण्यके, जातककथा, जैनकथा, पंचतंत्र, इसापनिती, वेताळपंचविशी, अरेबियनस् नाईटस्, बिरबलकथा, लोकचरित्रातील दृष्टांतकथा इत्यादी सर्व प्रकारच्या कथांचा व विविध भाषेतील प्राचीन कथांचा मागोवा घ्यावा लागतो. पिढ्यान्पिढ्या प्रादेशिक, भाषिक सांस्कृतिक आदान-प्रदान करण्याची प्रक्रिया खूप मोठी आहे. त्याचा प्रभाव मराठी लोककथा निर्मितीवर झालेला आहे.

मराठी लोककथेला आर्षमहाकाव्याची परंपरा लाभलेली आहे. गावा-गावातून, राना-वनातून, शिवारातून व डोंगरदऱ्यातून भटकत राहाणं हा तिचा स्वभाव आहे. लोककथेला आजपर्यंत देश, प्रांत, धर्म, जात यांच्यापैकी कोणाच्याच सीमारेषा पडल्या नाहीत. लोककथा ही जशी प्राचीन आहे तशीच ती प्रवाही आहे. लोककथा प्रवाही असल्याने ती भटकंती करत जगभर प्रसार पावली आहे. जागतिक लोककथांची जन्मभूमी भारत आहे हे मॅक्समूलर आणि थिओडर बेनफे यांनी मान्य केले आहे. एकूणच भारतीय भाषांतील व सर्व प्रदेशातील लोककथा ह्या भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधित्व करतात असे दिसते.

मानवता जशी विश्वात्मक तशीच लोककथा विश्वात्मक बनलेली दिसून येते. भारतात कथाकथनाची प्राचीन परंपरा आहे. सूत, भाट, चारण, भागवतकार यांची एक परंपरा चालत आलेली आहे. त्यामुळे लोककथांचे कथन व श्रवण ही प्रक्रिया अखंडितपणे सुरू आहे.

## ३.आ.३ मराठवाड्यातील लोककथा

बहि:शाला शिक्षण मंडळ, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांनी संपादित केलेले 'मराठवाड्यातील लोककथा' हा लोककथांचे संग्रह लोकसाहित्याच्या अभ्यासकांना मार्गदर्शक ठरणार आहेत. 'मराठवाड्यातील लोककथा' लोककथा संग्राहकांच्या सहकार्याने डॉ. पठाण यांनी लोककथा संग्रहित केलेल्या आहेत.

प्रस्तुत संग्रहातील लोककथा मराठवाड्याच्या प्रातिनिधिक लोककथा आहेत, असे नाही पण तरीही या लोककथांमधून मराठवाड्यातील एकसंध संस्कृती, जीवनपद्धती, मूल्ये साकार झालेली आहेत. तसेच काही कथांमधून जीवनाविषयी वाटणारे कुतूहल प्रकट झालेले आहे.

समाजमनाचे कंगोरे, तेथील लोकांच्या स्वभावातील गुणदोष, चालीरिती, प्रचलित समजुती, ऐतिहासिक घटना, भौगोलिक परिसर इ. गोष्टींचा मूल्यांमध्ये समावेश केलेला दिसतो. ही मूल्येच या लोककथांमध्ये भरपूर प्रमाणात आढळतात. त्याचा शोध घेणे आवश्यक आहे.

प्रस्तुत 'मराठवाड्यातील लोककथा' संग्रहात एकूण २९ लोककथा आहेत. अभ्यासाच्या सोयीसाठी या कथांचे प्रकारनिहाय गट केलेले आहेत.

**दंतकथा:**

तिरका नंदी बैयील, तेरचे तुरंटे, फुलारणीची गोष्ट, जोगाई, कयाधू.

**अद्भूत कथा:**

सटवीचा लिखा, ब्राह्मणी व तिची सात मुले, ऋण, फुलारणीची गोष्ट, सटवी अक्षार, पैशाचं झाड, लक्ष्मीचा टिळा, आसरा मायींचा ढव, तीन बहिणी, चतुरा.

**स्वभावदर्शनपर कथा:**

येडा नाऱ्या, धूर्तपत्नी, चतुर ब्राह्मण पैसा पडला च...च, खरा पुण्यात्मा, तानाजी देशमुख, पैशाचं झाड, श्रीसंतबुवा महाराज, मिस्किंदबुवा, माहेर.

**व्रतकथा:** पुषी आईतवारची कहाणी.

**निसर्गकथा:** सोयरिक, चिखली.

लोककथांचे वरील वर्गीकरण लक्षात घेता असे दिसते की, ह्या लोककथांपैकी काही लोककथा ह्या एकापेक्षा अधिक प्रकारात समाविष्ट होणाऱ्या आहेत.

## ३.आ.३.१ दंतकथा

**तेरचे तुरंटे**, फुलारणीची गोष्ट, तिरका नंदी बैयील, जोगाई, कयाधू ह्या कथा दंतकथा प्रकारात मोडणाऱ्या कथा आहेत. पण **'तेरचे तुरंटे'** ही कथा दंतकथेपेक्षा चमत्काराच्या घटनांनी अधिक भरलेली आहे. संतराम आणि त्याची पत्नी ह्या भूतपात्रांच्या कृतीतून

चमत्कार प्रतीत होतो. तत्कालीन समाजात भूता-खेतांवर विश्वास ठेवला जात असे हे शामराव व भास्करराव यांच्या पळून जाण्याच्या घटनेतून स्पष्ट होते.

**'फुलारणीची गोष्ट'** ही लोककथा एका ऐतिहासिक घटनेवर आधारलेली दंतकथा आहे. काशीबाई ह्या स्त्री पात्राची विठ्ठलभक्ती आणि तिचे सामर्थ्यच प्रतीत होते. पाटलाच्या मळ्यातील जळलेली गंजी, कोटी दुसऱ्या दिवशी पूर्ववत होणे हा चमत्कार आहे. त्यामुळे कथा अद्भूतरम्यतेकडे वळते.

प्रस्तुत कथेत अद्भूतता असली तरी त्या कथेतून ग्रामजीवन, शेतीसंकृती आदीचे दर्शन घडविले आहे.

**'तिरका नंदीबैयील'** कथेत शंकराच्या पिंडीसमोरील बैलाची मान तिरकी का झाली याची दिलेली कारणमीमांसा ही दंतकथेला जन्म देते. चारा खाताना तिरकी मान करून बैल खिडकीतून पाहतो. तेव्हापासून त्याची मान तिरकी होते.

**'कयाधू'** या दंतकथेतील हिरण्यकश्यपूच्या वधानंतर विलाप करणाऱ्या त्याच्या पत्नीला श्रीनृसिंहाने 'नदीरूपाने तू जिवंत राहशील अशा दिलेल्या वरामुळे झालेली नदीची निर्मिती व नरसी ब्राह्मणी गावात हिरण्यकश्यपूचा असलेला वाडा ह्या दोन्ही ऐतिहासिक घटना या दंतकथेला आधारभूत ठरतात.

**'जोगाई'** कथेत जोगाई म्हणजेच अंबेजोगाईची 'योगेश्वरी' देवी व परळीच्या 'वैजनाथ' यांच्या अधुऱ्या, मोडलेल्या विवाहाची ही कहाणी दंतकथेचे रूप धारण करते. पहाटेला कोंबडा आरवल्याने वैजनाथ माघारी वळतो; तर विरहाकूल योगेश्वरी आरवणाऱ्या कोंबड्याला आपटून मारताच फुलांचा मंडप दगडी होतो. तसेच कोंबड्याचा दगड होतो. ह्या चमत्काराने भरलेल्या घटना आहेत. ह्या लोककथेतून आणखी एक गोष्ट अधोरेखित होते की, देव-देवता सुद्धा संकेतांचे, नितीनियमांचे पालन करीत असत.

थोडक्यात वरील दंतकथा ह्या केवळ दंतकथा नसून त्या नीतीनियम, संकेताचे, चमत्कारांचे दर्शन घडवितात.

## ३.आ.३.२ अद्भूतकथा

**सटवीचा लिखा:**

प्रस्तुत अद्भूतकथेत दैववादाचा कल्पनाबंध वापरलेला आहे. माणसाच्या नशिबात/दैवात जे असते तेच घडते. दैव, विधिलिखीत कोणालाच बदलता येत नाही, ह्या लोकसंकेतावर आधारलेली ही लोककथा आहे. गावपाटील आपल्या मुलीचे खालच्या जातीच्या व अप्रतिष्ठीत वेसकरांच्या मुलांशी होणारे लग्न टाळण्यासाठी नवऱ्या मुलाला सटवीचा हारतुरा आणायला सांगतो.

पाटलाच्या या कृतीमधून जातीयता, प्रतिष्ठा ह्या गोष्टींबरोबच वेसकराच्या मुलाचा परस्पर काटा काढण्याची खलवृत्ती प्रकट झालेली आहे. तर सटवीचा हारतुरा आणणारा वेसकराचा मुलगा भुजंग, मारूती यांच्या व पिंपळवृक्षाच्या समस्या सोडवितो, ही कृती स्वहीताबरोबर इतरांचे कल्याण साधण्याची भूतदयावादी वृत्ती स्पष्ट करते.

**'सटवी अक्षार'** ह्या कथेतही चमत्कार, दैववाद आणि तांबुलाने (पानाची पिंक) गर्भधारणा होणे हे कल्पनाबंध आलेले आहेत. "लिहिले जे भाळी ते सुटेना कधी काळी" ह्या लोकसंकेतावर आधारलेली ही कथा आहे. परपुरूषाच्या खाल्लेल्या पानाच्या तांबुलाने सखीच्या मुलीची गर्भधारणा होणे, त्यानंतर तिच्याच मुलाशी तिचा विवाह होणे ह्या दोन्ही घटना वरील लोकसंकेताला बळकटी प्राप्त करून देतात. पण त्याकरीता योजलेल्या क्लृप्त्या मात्र चमत्काराने युक्त आहेत. कथेच्या शेवटी सटवीच्या मुलीने व नवऱ्या मुलाने आत्महत्या करणे, ह्या कृतीतून त्या दोन्ही पात्रांच्या मनात सामाजिक, नैतिक मूल्ये आणि विवाह विषयक संकेत याविषयी असलेली चाड व्यक्त होते. त्यामुळे ही कथा बोधाकडे वळते.

**'पैशाचं झाड'** कथेत ब्राह्मणाला राजाच्या कष्टामधूनच मिळालेल्या पैशाचं दान हवे असल्याने राजा परनगरीत कष्ट करून मिळविलेल्या पैशाचे दान करतो. ही राजाची कृती राजाच्या श्रमप्रतिष्ठा, कर्तव्यनिष्ठा व दानशूर वृत्तीवर प्रकाश टाकते. पण राजाने दिलेल्या चार आण्याचे झाड तयार होते. ही घटना अद्भूततेला जन्म देते.

मृत माणसे जिवंत करणे हा कल्पनाबंध असलेली **'ब्राह्मण व तीची सात मुले'** ही कथा निखळ अद्भूतरम्य कथा आहे. ब्राह्मणाच्या सुनेची मारलेली सात मुले देवकन्या आणि नागकन्या ह्यांनी जिवंत करणे ही घटनाच अद्भूत आहे.

मृत बालके, माणसे जिवंत करण्याचा कल्पनाबंध **'ऋण'** कथेतही वापरलेला आहे. ब्राह्मण हे पात्र भविष्यवेत्ता असल्याने आपली दहाही अल्पजीवी मुले मारून टाकतो. त्यातून त्याची दूरदृष्टी व्यक्त होते. पण अकरावे मूल जिवंत ठेवतो, तेव्हा पत्नी मात्र दहा मुलांची अभिलाषा व्यक्त करते. तेव्हा ब्राह्मण दहा मुले जिवंत करतो. या घटना प्रसंगातून ब्राह्मण पती-पत्नीच्या स्वभावावर प्रकाश पडतो. तसेच कथेत अद्भूत वातावरण निर्मिती होते. भविष्यात होणारे दु:ख टाळण्यासाठी वर्तमानात मुलांना संपविणे व अकरावे मूल दीर्घायुषी असल्याने ते न मारणे ह्यातून ब्राह्मण या पात्राचा विवेकी स्वभाव साकार झाला आहे.

**'नशीब'** या कथेत अद्भूतरम्यतेचा/चमत्काराचा व नशीबाचा असे दोन कल्पनाबंध आलेले आहेत. त्यातूनच त्यांची रचना झालेली आहे. प्रस्तुत कथेतील गोसावी या पात्राने छोट्याशा चुकीसाठी छोट्या मुलाचा घोडा बनविणे हा चमत्कार आहे. पण या घटनेतून गोसावी पात्राची क्रुरता, अविचारीपणा अधोरेखित होतो. गरीब ब्राह्मणाच्या मुलाने (उत्सुकतेपोटी) गोसाव्याने सूचना देऊन नववी खोली उघडणे ही घटनाच कथेला चालना देते. नवव्या खोलीतील रूपांतरित घोडा व गरीब मुलाचे मानवी भाषेतील संभाषण ही घटना चमत्कारिक आहे. गुहेत बसल्या जागेवरून गोसाव्याने घोड्यावर बसलेल्या मुलासह घोडा मागे आणणे व मुलाने लिंबू कापून दोन तुकडे फेकणे व घोडा पुढे जाणे ह्या सर्व घटनामध्ये चमत्कार भरलेला दिसतो.

पुढे तो मुलगा घोड्याच्या सांगण्यानुसार त्या घोड्याचे गाढव बनवितो व एका नगरीत येतो. तिथे पाचव्या राजकन्येसाठी गरीब 'वर' शोधणे सुरू असते कारण ती राजाच्या प्रश्नाला 'सर्व वैभव नशिबाने मिळाले' असे सांगते. पण ह्यामुळे राजा पाचव्या राजकन्येचे लग्न ह्या 'गरीब' ब्राह्मण मुलाशी लावतो. ह्या घटना-प्रसंगामधून राजाच्या आत्मलुब्ध दुराग्रही स्वभावाबरोबरच राजकन्येच्या ठामपणाचे, निग्रही स्वभावाचे दर्शन घडते.

कालांतराने वृद्ध झालेला राजपुत्र नसलेला राजा राज्याची वाटणी आपल्या चार जावयांमध्ये करून देण्याचे ठरवितो; पण त्याकरीता प्रत्येकाने एखादा पराक्रम करून दाखवावा अशी अट घालतो. पहिले तीन जावई आपल्या पत्नीचे स्त्रीधन खर्चून खोट्या पराक्रमाचे सोंग वटवितात. तर चौथा जावई स्वत:ला पाठीवर डागून घेतो. व सोन्याचा ससा आणतो. पण ह्या चौघा जावयाच्या खोटेपणावर पाचवा जावई राजासमोर प्रकाश टाकतो. खोटेपणा उघड करतो. तेव्हा राजा गरीब जावयाच्या हुशारीवर खुश होऊन त्याला सर्व राज्य देतो, तेव्हा पाचवी राजकन्या आपल्या नशिबानेच हे वैभव मिळाले असे राजाला सांगते. नशीब व आत्मश्रेष्ठता, आत्मप्रौढी यात नशीबच श्रेष्ठ ठरते असा बोधच या कथेतून केला आहे.

**लक्ष्मीची शिळा:**

प्रस्तुत कथा चमत्काराच्या कल्पनाबंधावर आधारलेली आहे. पूर्वीचे हैद्राबाद शहर हे आजच्या इतके मोठे नव्हते पण तिथली प्रजा खाऊन-पिऊन होती. राज्यात एकीकडे सुख-समृद्धी होती, पण अन्याय-अत्याचारही चालू होते. त्यामुळे लक्ष्मी राज्यातून निघून जाते. लक्ष्मीचे आगळेवेगळे रूप पाहून राज्याच्या सिमेवरचा पहारेकरी भीतभीत अडवितो. व सीमेवरच लक्ष्मीला थांबवून पहारेकरी राजाची परवानगी आणण्यास जातो. ह्या पहारेकऱ्याच्या कृतीमध्ये कर्तव्यदक्षता, प्रामाणिकपणा, एकनिष्ठा दडलेली दिसून येते.

राजवाड्यात आलेल्या पहारेकऱ्याने राजास राज्यातून लक्ष्मी निघून चालल्याची बातमी देतो तेव्हा राजाच त्या पहारेकऱ्याची हत्या करतो. कारण पाहरेकरी परत जाईपर्यंत लक्ष्मी सीमेवरच थांबून राहील असा राजाचा अंदाज असतो. वरील घटनेतून राजाच्या धूर्त पण निर्दयी, अविवेकी स्वभावच स्पष्ट होतो. राजा जेव्हा आपल्या लवाजम्यासह सीमेवर जातो तेव्हा तिथे लक्ष्मी नसते. त्या जागी एक उंच उभी शिळा असते. ही कथागत चमत्काराची घटना आशयसूत्राच्या विस्तारास मदत करते.

**आसरामायीचा ढव:**

माणसाने केलेला कुठलाही अतिस्वार्थ हा व्यर्थ जाणारा असतो. हा बोधच प्रस्तुत कथेद्वारे केलेला आहे. त्यामुळे या कथेत चमत्काराचा/अद्भूततेचा कल्पनाबंध असला तरी तो बोधाकडे वळलेला दिसून येतो. पिंपळगावातील दुधानदीमधील आसरा मायीच्या डोहात आसरामायीचे सोन्याचे देऊळ आहे. त्यामुळे तो डोह आटत नाही; पण ज्या दिवशी देवीच्या मंदिराचा कळस दिसेल त्यावेळी पृथ्वीवर दुष्काळ पडेल असा समस्त लोकांचा समज आहे. लोकमानसाचे दर्शन ह्या कथेत घडते. आसरामायदेवीची पिंपळनेर गावावर कृपादृष्टी होती. त्यामुळे गावातील लग्नकार्याला यजमानाने हव्या असलेल्या भांड्याची चिठ्ठी डोहाच्या काठावर ठेवली की दुसऱ्या दिवशी सूर्योदयापूर्वी डोहाच्या काठावर भांडी ठेवलेली असत. लग्नकार्य आटोपले की पुन्हा सर्व भांडी त्या डोहाच्या काठावर नेऊन ठेवावी असा एक अलिखित नियमच होता.

पण गावचा पाटील मात्र तो नियम मोडतो, स्वार्थाने आंधळा झालेला पाटील घरच्या लग्नकार्यासाठी आणलेली भांडी परत करीत नाही. त्यामुळे गावकऱ्यांनी लग्नकार्यासाठी भांड्याची चिठ्ठी डोहाच्या काठावर ठेवली तरी भांडी काठावर येणे बंद झाले. पाटलाच्या अतिस्वार्थाचा परिणाम गावकऱ्यांना नाहक भोगावा लागला.

**तीन बहिणी:**

प्रस्तुत कथा ही देवता निर्मितीची कथा आहे. लोकांच्या मनातील भक्तीभाव, श्रद्धाभाव, यांच्यामुळे गावोगावी अशा देवता निर्माण झालेल्या दिसतात. जालना तालुक्यातील सोमाठाणा गावातील तीनही अविवाहीत बहिणी पुढे लोकमानसाच्या श्रद्धेतून देवतारूप झालेल्या दिसतात. मोठी व मधली बहिण अनुक्रमे पाणी व सरपण आणायला टेकडीवर जातात. पण त्या परत न येता त्या टेकडींवर ध्यान धारणा करीत बसतात. गावात ही बातमी पसरल्यावर लोकं त्यांचे दर्शन घ्यायला येऊ लागतात. एका भल्या पहाटे त्या दोन्ही बहिणी निधन पावल्याचे समजते. पुढे गावकरी मोठ्या टेकडीवर मोठ्या बहिणीचे स्मारक उभारतात व छोट्या टेकडीवर मधल्या बहिणीचे स्मारक उभारतात व तिथे जत्रौत्सव सुरू करतात. या दोन्ही घटनांमागे लोकमानसच दिसून येते.

तिसरी बहिण दोन्ही बहिणींची वाट पाहत घरी राहिली. पुढे ती मरण पावल्यावर सोमठाणा गावातील ब्राह्मण तिच्या मूर्तीची प्रतिष्ठापना घरी करतो. थोडक्यात, लोकश्रद्धेतून ही देवतांची निर्मिती झालेली दिसून येते.

**फुलारणीची गोष्ट:**

या कथेत अद्भूतरम्यतेचा व श्रद्धेचा असे दोन कल्पनाबंध आलेले आहेत. प्रस्तुत कथेतील फुलारीण म्हणजे काशीमाईच्या पंढरपूरला वारीला जाताना घडलेल्या चुकीमुळे पाटलाची कोठी व गवताची गंजी जळणे, पाटलाने काशीमाईला अद्वातद्वा बोलणे, त्यावर काशीमाईने निघून जाणे आणि दुसऱ्या दिवशी सकाळी सगळ्या गोष्टी पूर्ववत असणे. या सगळ्या घटनाप्रसंगाची उभारणी वरील दोन्ही कल्पनाबंधातून झालेली आहे. तसेच आपली चूक उमगल्यानंतर वारीहून परतल्यावर काशीमाईची क्षमा मागणे, तिचा सत्कार करणे या घटनाप्रसंगातून मानवी स्वभावाचे पैलू साकार होतात. पुढे आपल्या गावी काशीमाईचे निधन झाल्यावर गावकऱ्यांनी तिच्या स्मरणार्थ हरिनाम सप्ताह सुरू करणे ही कृती लोकमानसातील श्रद्धेचे, भक्तीभावाचे दर्शन घडवितात.

**चतुरा:**

'चतुरा' ही ब्राह्मणकन्येच्या-'चतुरेच्या' चातुर्यावर आधारलेली लोककथा आहे. निलकान्तच्या अटीमुळे अनेक राजकन्यांना सुळावर चढावे लागते, म्हणून 'चतुरा' मुदत घेते. निलकान्तच्या पणाचा विढा उचलते. पण त्याचवेळी तीन वर्षाची आणि एकेक कृती अत्यंत चातुर्याने करते. परिस्थितीचा फायदा घेऊन ती एकेक कृती करत जाते. वाळलेल्या भोपळ्यांचा सांगाडा बनवून रात्रंदिवस पोहायला शिकताना पहारेकऱ्यांचा विश्वास संपादन करते व नगरीत येते. कलावंतीणीकडे गाणे शिकण्यासाठी आल्यावर तिने गाण्याच्या संदर्भात घातलेल्या अटी तसेच राजकुमार निलकान्त गाणे ऐकायला येतो. तेव्हा त्याच्याशी न बोलणे, चेहरा न दाखविणे या घातलेल्या अटी तिच्या चातुर्याच्या द्योतक आहेत. कारण या अटीमुळे तो चतुरावर अधिक लुब्ध होतो असे दिसते. त्याने देऊ केलेले राज्य न स्वीकारता फक्त राज्यमुद्रांकित अंगठी घेणे, पौर्णिमेच्या रात्री दोघांनीच नौकाविहाराला जाणे. ह्या सर्व कृतींमागे तिची एक दूरदृष्टी दडलेली दिसून येते. तीन वर्षांची मुदत संपल्यानंतर ती मुलासह राजवाड्यात हजर होते व ते मूल हे निलकान्तचेच आहे हे

राजमुद्रांकित अंगठी व कलावंतीण यांच्या मदतीने सिद्ध करते. हे चातुर्य तिला राजाची राणी बनण्यास मदत करते.

## ३.आ.३.३ स्वभावदर्शनपर लोककथा

मानवी स्वभाव आणि त्यांच्या स्वभावातील विविध पैलूंचे दर्शन या कथासंग्रहातील काही कथांमधून घडते. काही कथा ह्या जगावेगळ्या अशा स्वभावाचे दर्शन घडविणाऱ्या तर काही कथा स्वभावदर्शनाबरोबर मूल्यदर्शन घडविणाऱ्या आहेत.

**येडा नाऱ्या:**

प्रस्तुत कथेतील नारायण हे मुख्य पात्र असून वेडसर आहे. त्यामुळे लोकांनी त्याचे 'येडा नाऱ्या' असे नाव ठेवलेले आहे. काही माणसं ही दुसऱ्याचे बोलणं प्रमाण मानणारी असतात, ही माणसे स्वबुद्धीचा वापर करताना दिसत नाहीत तर काही माणसे 'ऐकावे जनाचे करावे मनाचे' या वृत्तीची असतात, त्यामुळे स्वत:च्या बुद्धीला आणि मनाला पटणाऱ्या गोष्टी करीत असतात.

येडा नाऱ्या हा पहिल्या वर्गात मोडणारा, विचार न करणारा, भाबड्या स्वभावाचा आहे. त्यामुळे येडा नाऱ्या लग्नानंतर माहेरी गेलेल्या बायकोला आणायला जातो तेव्हा आईने सांगितलेली गोष्ट प्रमाण मानतो. आईच्या बोलण्याचा वाच्यार्थच लक्षात घेता. सासुरवाडीला 'लवुन भजुन जाय बरं' असे आई सांगते त्याप्रमाणे तो शेतातून जाताना वाकून जातो. आईच्या बोलण्यातला व्यंगार्थ घेऊन- सासूरवाडीला जाताना वाटेत कोणाशी न भांडता, सगळ्याशी नम्रतेने वागत जा हा अर्थ लक्षात न घेतल्याने नाऱ्याला राखणदाराचा मार खावा लागतो. राखणदाराने हा हू आवाज काढत जा असे सांगितल्याने तो आवाज काढीत जातो तेव्हा ससा पकडणारे फासे पारधी त्याला मारतात. अशा काही आणखी घटना घडतात आणि नाऱ्याला मात्र फुकट मार खावा लागतो. पण नाऱ्या ह्याचा विचारच करीत नाही. सासुरवाडीला नाऱ्याला पाहुणचार म्हणून धिरडं केलेले असते. पण आईने सांगितले म्हणून तो कमी खातो. भूक लागते म्हणून तो शिक्याचा पाक काढायला जातो. तर सगळा पाक अंगावर सांडतो. त्यामुळे कापूस अंगाला चिकटतो. तो अंगावरचा कापूस निघावा म्हणून म्हशीच्या गोठ्यात जातो. तर दूध काढायला आलेल्या सासूला (मामीला) म्हैस व्यायली असे वाटते व ती म्हैशीचे वासरू उचलायला येते तेव्हा नाऱ्या आपण आहोत असे सांगतो. या गंमती-जमती नाऱ्याच्या स्वभावामुळे घडतात. घरी आल्यावर नाऱ्या बायकोला धिरडं करायला सांगतो पण त्याला त्या पदार्थाचे नाव येत नसल्याने बायकोला मारतो. तेव्हा शेजारच्या बायका येतात आणि 'पाठीचे धिरडे' केले असे म्हणतात. तेव्हा नाऱ्या ओरडतो व हेच करायला सांगितले होते असे म्हणतो. तेव्हा मात्र बायका नाऱ्याला हसतात. ह्या सगळ्या घटना नाऱ्याच्या स्वभावाचाच परिपाक आहे.

**धूर्त पत्नी:**

प्रस्तुत कथेत गुंडोबाच्या पत्नीचा धूर्तपणा साकार झालेला आहे. वैजनाथच्या पूजेवर एका ब्राह्मणास जेवण वाढण्याचा नित्यनेम बंद करण्यासाठी गुंडोबाची बायको एक डाव आखते. वैजनाथने घरी पाठविलेल्या ब्राह्मणास ती पाणी देते व नंतर ती त्या ब्राह्मणास एक खोटी

गोष्ट सांगते की, आपला नवरा घरी आलेल्या ब्राह्मणास दाव्याने बांधून मुसळाने ठेचतो. त्याबरोबर भिक्षुक ब्राह्मण घाबरून पळू लागतो. तितक्यात गुंडोबा घरी येतो. तेव्हा गुंडोबाची पत्नी भिक्षुकाला मुसळ व दावे न दिल्याने तो निघून गेला असे खोटे सांगते. त्यावेळी गुंडोबा मुसळ व दावे घेऊन धावू लागतो. तेव्हा त्या ब्राह्मणास गुंडोबाच्या बायकोचे म्हणणे सत्य वाटू लागते व तो जोरात धावू लागतो. तो थांबत नाही. ह्या घटना प्रसंगातून गुंडोबाच्या पत्नीचा धूर्तपणा अधोरेखित झाला आहे.

**चतुर ब्राह्मण :**

प्रस्तुत कथेतील चतुर ब्राह्मण पोटापाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी घरदार सोडतो. पण कुठेच सोय लागत नाही म्हणून शेवटी तेलाच्या घाण्यावर कामास राहतो. घरी पाठविलेल्या खुशालीच्या पत्रात 'अधांतरी नित्य माझं गमन असतं, अखंड पात्रात भोजन करतो. बहुतेक सर्व गाठीस आले. एकवटल्यावर भेट होईल, असे लिहितो.' ह्यातच त्याचे चातुर्य लपलेले दिसते. हे पत्र वाचून घरच्यांना तो सुखासमाधानात आहे असे वाटते. त्याच्या मजकुराचा अर्थ 'तो पालखीतून फिरतो व सोन्याचांदीच्या पात्रात भोजन करतो, भरपूर द्रव्य कमावले, रग्गड पैसा घेऊन घरी घेऊन येईल' असा घेतात. पण तो चतुर ब्राह्मण काही घरी येत नाही. तेव्हा घऱची मंडळी राजा सातवाहनामार्फत त्याचा शोध घेतात. त्यानंतर त्या ब्राह्मणाने पत्रात लिहिलेल्या मजकुराचा नेमका अर्थ सातवाहन राजा समजून घेतो. ब्राह्मणाचे बुद्धिचातुर्य पाहून राजा त्या ब्राह्मणास आश्रित म्हणून आपल्या पदरी ठेवून घेतो. माणसाचे चातुर्य माणसाच्या कसे कामी येते हे या कथेतून स्पष्ट केले आहे.

**पैसा पडला च...च**

प्रस्तुत कथेत पटाईत, लोभी, ऐतखाऊ वृत्तीवर प्रकाश टाकलेला आहे. एक भिक्षूक स्वत: काही न करता दुसऱ्याकडून सर्व कामे करवून घेणे, हव्या त्या गोष्टी मिळविणे यात खूप पटाईत होता. श्रीमंत धनिकाकडे जेवून, त्याच्याकडून भरपूर दक्षिणा मिळवून तो भिक्षूक धनिकाबरोबरच दुसऱ्या गावी जाण्यास निघतो. प्रवासात तो भिक्षूक दक्षिणा, श्रीमंत धनिकाचे उपरणे अत्यंत हुषारीने मिळवितो. शेवटी श्रीमंत धनिकाला त्या भिक्षूकाची ब्राह्मणाची चीड येते. त्याची फजिती करण्यासाठी त्याला गाढव देतो. तो भिक्षूक गाढवावर बसल्याबरोबर नोकर गाढवावर चाबूक मारतो. त्याबरोबर गाढव उधळते आणि भिक्षूक (ब्राह्मण) खाली आडवा पडतो. ब्राह्मणाच्या ऐतखाऊ, लोभी स्वभावाचा परिणाम त्याला असा भोगावा लागतो.

**खरा पुण्यात्मा:**

ह्या कथेत वैजनाथ शिवमंदिरातील पुजाऱ्याच्या स्वप्नात येऊन शंकर सर्व पंडितांमधून पुण्यात्मा शोधण्यास सांगतो. वैजनाथच्या मंदिरात सर्व गोळा झालेल्या एकेका पंडिताच्या हातात पुजारी शंकराच्या पायाजवळील सुवर्णपात्र देतो. पण ते सुवर्णपात्र हातात देताच काळवंडू लागते. कोणाच्याच हातात उजळून निघत नाही. एक दिवस वैजनाथच्या दर्शनासाठी घरदार, पैसाअडका याचा त्याग करून एक शेतकरी येतो. शिवदर्शनाला येताना तो अन्नपाणी न घेता चालत आलेला असतो. मंदिराजवळ येताच आपल्या अंगावरील फाटकी घोंगडी आणि शिदोरीसाठी आणलेली भाकरी तो कुष्ठ रोग्यांना देतो.

पुजाऱ्याबरोबरच मंदिरात जातो. तो शिवदर्शन घेतो. शंकराच्या पायावर तो शेतकरी नतमस्तक होताच ते सुवर्णपात्र अधिक तेजाने उजळते. तेवढ्यात आकाशवाणी होते. 'पुण्यात्मा ते सुवर्णपात्र तुझंच आहे'. परमेश्वरी आकाशवाणी, निष्काम भक्तीमार्ग या कल्पनाबंधातून कथारचना झाली असून निष्काम भक्तीचे महत्त्व अधोरेखित झालेले आहे.

**तानाजी देशमुख:**

प्रस्तुत कथेत सचोटी, प्रामाणिकपणा, निस्सिम भक्ती याचबरोबर चमत्काराचेही दर्शन घडते. प्रामाणिकपणे, सचोटीने वागणाऱ्या तानाजी देशमुखाला कचेरीतील अफरातफरीच्या संशयाने होणारी अटक सहन होत नाही. अंबड देवीचे दर्शन घेण्यास जाताना तो देवीच्या मंदिराजवळील विहिरीत उडी घेतो. शिपाई धावत जातात. पण त्याचे शवही सापडत नाही. पण थोड्या वेळाने तानाजी देशमुखासारखा तोंडावळा असलेली एक व सर्व सौभाग्य लेणं धारण केलेली स्त्री विहिरीतून बाहेर येते. ही घटना म्हणजे एक चमत्कार असतो. नंतर ती स्त्री मातापुरास जाते. व देवीच्या पायांना मिठी घालून 'निष्कारण आरोप झाले, जगण्याची इच्छा नाही, मायाबाई पोटात घे' अशी आळवणी करते. त्याबरोबर अंबड डोंगराचा कडा कोसळतो व "तानाजी देशमुख शिव झाला अशी गर्जना होते." निस्सिम भक्त, प्रामाणिक, कुटुंब वत्सल तानाजी देशमुख अब्रुसाठी आत्मत्याग करतो.

**संतबुवा महाराज:**

प्रस्तुत कथेत माणसाच्या अतिउत्साही स्वभावावर प्रकाश टाकला आहे. परभणी जिल्ह्यातील जिंतूर गावातील श्री. संतबुवा महाराज यांच्या बसण्याच्या गादीखाली हात घातला की पैसे सापडत. म्हणून त्यांचा शिष्य माधवबुवा गादी उचलतो, त्याला पैसे सापडतात. पण त्यानंतर मात्र कधीच पैसे सापडले नाहीत. गादीखाली हात घातला की नेहमी सापडणारे पैसे हा चमत्काराचाच भाग आहे. पण माधवबुवाच्या अतिउत्साहीपणाने सगळा घात होतो.

दुसऱ्या एका घटनेत नृहसिंहाचे उपासक असलेल्या संतबुवांना स्वप्नात येऊन 'मी तुझ्या गावी येईन, तू गाडी घेऊन ये." असा दृष्टांत दिला. कारण वार्धक्यामुळे श्रीसंतबुवांना जिंतुरहून चार क्षेत्र येथे जाणे शक्य होत नव्हते. श्रीसंतबुवांना चिपाडाच्या गाडीतून येताना नृसिंह महाराजांनी मागे वळून न पाहण्याची अट श्रीसंतबुवांना घालतात. पण मध्येच ते उत्सुकतेपोटी मागे वळून पाहतात तसे ती चिपाडाची गाडी मोडते. तेव्हा नृसिंह महाराज तिथेच राहतात. ही घटना अतिउत्साही स्वभावाचे दर्शन घडविते.

**माहेर:**

माणसाच्या ठिकाणी असलेला स्वार्थ, हव्यास माणसाच्या नाशास कसा कारणीभूत ठरतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे माहेर कथा होय. पाहुणा दरवर्षीप्रमाणे दिवाळीच्या सणाला सुभद्रेच्या माहेरी जाण्याऐवजी त्यावर्षी सुनंदाच्या माहेरी जाण्याचा बेत सुनंदाला बोलून दाखवितो. सुनंदाला माहेरच नसते. पण नवऱ्याला नाही कसे म्हणणार म्हणून ती दोघं बैलगाडीने निघतात. वाटेत जंगल लागते. वडाच्या झाडाखाली एक वारूळ दिसते. सुनंदा नवऱ्याला (पाहुण्याला) गाडी थांबवायला सांगते. व स्वत:ला संपविण्याच्या इराद्याने वारूळापाशी जाऊन त्यात हात घालते. पण योगायोगाने सुनंदाचा हात सापाच्या

डोक्यावरील बेंडाला लागतो आणि ते फुटते. त्यामुळे वेदनामुक्त साप तिच्या इच्छेखातर भाऊ होतो. तिला माहेर देतो. सुनंदाही नवऱ्यासह पाच दिवस माहेरी राहाते. घरी परतल्यावर पाहुणा (नवरा) सुभद्रेसमोर सुनंदाच्या माहेरच्या पाहुणचाराची स्तुती करतो. तेव्हा सुनंदा सुभद्रेला सर्व हकिगत सांगते. तेव्हा धनाच्या लोभाने सुभद्रा जंगलात जाऊन त्या वारूळात हात घालते व सर्पदंशाने मरण पावते. हे सुभद्रेने स्वार्थापायी आपले मरण ओढवून घेतलेले असते.

## ३.आ.३.४ व्रतांच्या कथा

व्रतांच्या कथा ह्या व्रताचे स्वरूप स्पष्ट करणाऱ्या, माहिती देणाऱ्या असतात. पण त्याचबरोबर व्रताशी संबंधित चमत्कारांचेही दर्शन घडवितात असे दिसून येते.

**पुषी आईतवाराची कहाणी:**

प्रस्तुत कथेत व्रताच्या कल्पनाबंधाबरोबर चमत्काराचा कल्पनाबंध आलेला आहे. राजकन्येच्या मळापासून तयार झालेले मळाचे झाड कोणी राजपुत्र मात्र ओळखू शकत नाही. पण वाघ मात्र राजा-राणीचे मळाच्या झाडाविषयीचे बोलणे चोरून ऐकतो व नंतर वाघ ब्राह्मणरूप धारण करून येतो व ते मळाचे झाड ओळखतो. या घटनांमधून प्राण्यांना मानवी भाषा समजते. तसेच प्राणीही मानवी रूप धारण करतात. तेवढी शक्ती त्यांच्यापाशी असते. हे स्पष्ट होते.

राजकन्येचे वाघाबरोबर लग्न होते. पण ती दु:खी राजकन्या वाघाच्या भुकेच्या वेळी तलावाच्या काठावर बसते. तिथे भेटलेल्या बाईच्या सांगण्यानुसार सतत चार वर्षे राजकन्या सूर्यनारायणाचे व्रत पुषी आईतवारी करते. व्रताच्या वेळी ती मुकी राहाते. पाचव्या वर्षी एका पहाटे आंघोळ वगैरे आटोपून धुणी धुण्यासाठी राजकन्या नदीवर जाते. तिथे आलेल्या वाघावर पाण्याचे शिंतोडे उडताच त्याचे शरीर माणसासारखे होते. तो राजबिंडा, राजपुत्र दिसू लागतो. हा व्रतामुळे चमत्कार घडतो. गावकरी राजपुत्राचे स्वागत करतात. राजकन्याही व्रताचे उद्यापन करते. पुढे ती दोघे सुखासमाधानाने राहतात. अन्य व्रतकथासारखी ही व्रताची सुफल कहाणी आहे.

**मुर्गेश्वराची कहाणी:**

सिल्लोडला पेशव्याचे ढापरे नावाचे सरदार राहात होते. तिथे चोर, दरोडेखोर यांचा उपद्रव सुरू होता. पण सरदार ढापरे यांनी महादेवाची प्रार्थना केली आणि मग महादेवाच्या कृपेने तो उपद्रव कमी झाला. पुढे सरदार ढापरेना दुर्धर असा आजार होतो. तेव्हा ते पुन्हा शंकराची एकनिष्ठतेने भक्ती करतात. तेव्हा प्रत्यक्ष महादेव स्वप्नात येऊन दृष्टांत देतो व आपले वास्तव्य केळगांवच्या किल्ल्याजवळच्या दरीत आहे असे सांगतो. ढापरे सरदार दरीत जाऊन लिंगाच्या ठिकाणी साफसफाई करतात. मग अनुष्ठान करतात. आजारातून पूर्ण बरे होतात. त्यानंतर तिथे ते मंदिर बांधतात. अशा प्रकारे तिथे मुर्डेश्वराचे देवस्थान निर्माण होते.

## ३.आ.३.५ निसर्गकथा

**सोयरीक:**

आटपाट नावाच्या जंगलातील गावात मारवेल आणि कुसळीच्या होऊ न शकलेल्या लग्नाची गोष्ट आहे. वयात आलेली माखेल, तिच्या भोवती पिंगा घालणाऱ्या वाऱ्याला ती जुमानत नाही. ती सरळ माखेलकडे जाते व आपल्याशी लग्न करशील का अशी विचारते. पण माखेल तिच्याकडे बघायला तयार नसतो. तो- 'सध्या लग्नाची तिथी नाही, मार्गशीर्षात बघू' असे सांगतो. त्यामुळे अपमानीत झालेली कुसळी आपल्या जातवाल्याबरोबर लग्न करून मोकळी होते. कालांतराने थकलेला, कुरूप दिसणारा माखेल कुसळीकडे जातो व लग्नासंबंधी विचारू लागतो तेव्हा कुसळी 'वाढलेल्या अंगाचा फताड्या तोंडाचा कोन मेल्या.'' असे विचारून त्याचा अपमान करते. व आपले लग्न झाल्याचे सांगते. माखेल परत जातो.

**चिखली:**

गणेशपूर नावाच्या गावाचे नाव चिखली कसे झाले त्याची ही कहाणी आहे. एक कलावंतीण स्त्री गणेशपूर गावातून हत्तीवरून प्रवास करीत असते. त्यावेळी वाटेत एका चिखलात हत्ती रूततो. त्यावेळी ती कलावंतीण स्त्री रागाने हे गणेशपूर गाव कसले ही तर चिखली असे म्हणते. या कथेत गावाचे नाव कसे तयार झाले त्याची ही कथा आहे.

एकूणच या संग्रहामध्ये वेगवेगळ्या आशय व्यक्त करणाऱ्या कथा समाविष्ठ झालेल्या आहेत. आशयानुसार त्यांचे वेगवेगळे प्रकार यातून अभ्यासता येतात.

## आपली प्रगती तपासा

**प्रश्न- तुम्ही ऐकलेल्या कोणत्याही प्रदेशातील कथेचे प्रकारनिष्ठ विश्लेषण करा.**

## ३.आ.४ सारांश

एकूणच सदरील घटकामध्ये आपण मराठवाड्यातील लोककथांचा अभ्यास केला. या सर्व कथांमध्ये लोककथेतील विविध कल्पनाबंधाचा आढळ आहे. तसेच त्या विविध विषयांना हाताळणाऱ्या आहेत. काही कथांमध्ये नीतीबोधाची शिकवण आहे तर काहीमध्ये मानवाच्या विविध स्वभावांचे दर्शन घडविलेले आहे. तसेच व्रतकथा, निसर्गकथा, दंतकथा यातून मनोरंजना सोबतच मानवी जीवनातील महत्त्वाच्या संस्कारांचे, सामाजिकीकरणाचे तत्त्वही सांभाळलेले दिसते. अद्भुतम्यता हा या सर्वच कथांमधील विशेष आहे.

प्रस्तुत 'मराठावाड्यातील लोककथा' संग्रहातील ज्या एकोणतीस लोककथा आहेत त्या एका प्रकारच्या नाहीत. त्यांच्यामध्ये वैविध्य आहे. या मराठवाड्याच्या प्रातिनिधिक लोककथा आहेत असे नाही पण त्या कथांमधून मराठवाड्याची सामाजिक, सांस्कृतिक

पार्श्वभूमी स्पष्ट होते. त्याबरोबरच तिथली संस्कृतिमूल्ये, प्रदेश वैशिष्ट्येही साकार होताना दिसते.

या लोककथांचे आणखी एक विशेष म्हणजे या लोककथा विविध गीतांनी सिद्ध होतात. या लोककथांमध्ये भाषेचा केलेला वापर हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. प्रांतपरत्वे व जातिपरत्वे ही भाषा बदलेली दिसते. मराठवाड्यापुरता विचार केला तर असे दिसते की, टापू-टापूतील, मंडळामंडळातील बोलण्यात खूप भिन्नता असते. एकाच भाषेची पालटणारी रुपे या लोककथांमध्ये आढळतात. उदा. गुंता, विटाळ, व सुतक हे शब्द. एक शब्द रुढ व इतर थोडे अपरिचित असे आढळतात. काही कथांत वाक्यरचना ह्या तेलंगी-मराठीच्या सीमेवरच्या आहेत. उदा. मी कित्ती हाका मारलो पण त्यानं जेवायला येईना. इत्यादी.

एकूणच विविध प्रकारचे कल्पनाबंध, आशय या कथातून दिसतात. तसेच विषय वैविध्यामुळे या सर्व कथा वाचनीय व श्रवणीय ठरतात.

## ३.आ.५ संदर्भग्रंथसूची

डॉ. भागवत, दुर्गा : 'लोकसाहित्याची रूपरेखा', वरदा प्रकाशन, पुणे.

डॉ. कुबल, रमेश : 'लोकसाहित्याचे अंतरंग' शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर.

पठाण, यु.म. (संपा.) : 'मराठवाड्यातील लोककथा', बहि:शाल शिक्षण मंडळ मराठवाडा विद्यापीठ 1962.

## ३.आ.६ स्वयंअध्ययन

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) लोककथांमध्ये त्या – त्या प्रदेशाची म्हणून गणली जाणारी संस्कृतीमूल्ये प्रकट होतात हे विधान मराठवाड्यातील लोककथांच्या आधारे स्पष्ट करा.

२) मराठवाड्यातील लोककथा या संग्रहातील कथा वैविध्य स्पष्ट करा.

३) मराठवाड्यातील लोककथा या कथा संग्रहातून मराठवाडा सामाजिक, सांस्कृतिक मूल्यांचे, प्रदेशाच्या वैशिष्ट्यांचे कितपत दर्शन घडते ते सांगा.

**ब) टीपा लिहा.**

१) संग्रहातील अद्भुतरम्य कथा

२) 'चतुरा' कथा विशेष

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) 'मराठवाड्यातील लोककथा' हा संग्रह कोणी संपादित केला आहे?

२) 'येडा नाऱ्या' कथेतील नाऱ्या कोणत्या पदार्थाचे नाव येत नाही म्हणून बायकोला मारतो?

*****

**नमुना प्रश्नपत्रिका**

**एम. ए. भाग - २ सत्र - III,**

**अभ्यासपत्रिका क्र. ११.२- लोकसाहित्य**

**परीक्षा गुण विभागणी**

**१. अंतर्गत परीक्षा- ४० गुण**

**२. सत्रांत परीक्षा – ६० गुण**

**सूचना:**

१. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

२. अंतर्गत पर्याय लक्षात घ्या.

३. प्रश्नांसमोरील अंक गुण दर्शवितात

प्रश्न १. लोकसाहित्याची संकेत व्यवस्था सांगून लोकतत्त्वे म्हणजे काय ते स्पष्ट करा. **(१५)**

**किंवा**

लोकसाहित्य म्हणजे काय ते सांगून लोकमानस ही संकल्पना स्पष्ट करा.

प्रश्न २. लोकसाहित्याच्या अभ्यासाच्या प्रमुख संप्रदायाची ओळख करून द्या. **(१५)**

**किंवा**

लोकसाहित्याच्या विविध अभ्यास पद्धतींचा आढावा घ्या.

प्रश्न ३. मराठी कथेचे उगमस्थान आणि उत्पत्ती यासंबंधी चर्चा करा. **(१५)**

**किंवा**

'मराठवाड्यातील लोककथा' या संग्रहातील कथा वैविध्य स्पष्ट करा.

प्रश्न ४. लोकसाहित्याची व्याख्या देऊन लोकसाहित्याची संकेतव्यवस्था म्हणजे काय ते सांगा. **(१५)**

किंवा

मराठी लोककथेचे प्रमुख प्रकार सोदाहरण स्पष्ट करा.

*****